चाळीस पैसे
१५ मार्च १९६६

# माणूस

तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे





## हे सुरसरिते सिंधू !

जिच्या काठावर आमच्या प्राचीनतम वेदर्षीनी ऋचांची पहिली सामगायने गायिली, जिच्या पुण्यसलिलांही आपल्या संध्यावंदनातील अर्घ्ये दिली आणि जिला अत्यादराने वेदातील देवतांमध्ये स्थान देऊन तिच्यावर सुंदरांतील सुंदर सूक्ते रचली त्या तुला, हे अंबितमे, नदीतमे, देवितमे, सिंधू आम्ही कधीही विसरणार नाही.

— सावरकर




वर्ष पाचवे : अंक विसावा : १५ मार्च १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## या अंकात

गेल्या अंकात प्रकट केल्याप्रमाणे श्री. शाम तारे यांचा श्रीमती गुडमन यांच्या कथेचा अनुवाद या अंकात प्रसिद्ध होत आहे.

श्री. मोरेश्वर तपस्वी हे नाव मराठी भाषिकांना अपरिचित नाही दिल्ली नभोवाणीवरून त्यांचा आवाज सर्वांनी ऐकलाच असेल. त्यांचा 'मिझो' प्रश्नावरील लेख या अंकात आहे. पुढच्या अंकासाठी 'पंजाबी सुभा' हा विषय त्यांनी निवडलेला आहे.

'कुलूपवती भव' हा प्रा. मधुसूदन गोखले यांचा कुटुंबनियोजनावरील लेख मागे १५ सप्टेंबर १९६५ च्या 'माणूस' अंकात प्रसिद्ध झाला होता. तो त्यावेळी बराच गाजलाही होता. या विषयावर प्रा. गोखले यांचा 'कँपकडून कँपकडे' हा नवीन लेख पुढच्या अंकात प्रसिद्ध होत आहे.

— सं.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# देश-विदेश

## □ लष्करी क्रांत्यांची लाट

लष्करी उठाव ही आफ्रिकन राजकारणातील एक अत्याधुनिक फॅशनच झाल्यासारखी दिसते. या विशाल खंडातल्या कुठल्या ना कुठल्यातरी कोपऱ्यात लष्करी उठाव झाला नाही, असा शांत महिना विरळा. विशेषतः गेल्या दोन-तीन महिन्यांत आफ्रिकेत एकामागून एक झपाट्याने होत गेलेल्या क्रांत्यांमुळे पुन्हा एकदा आफ्रिकन राजकारणातील अस्थिरतेकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधले आहे.

गेल्या डिसेंबर महिन्यापासून कांगो, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, छाड, दाहोमी, अप्पर व्होल्टा आणि नायजेरिया या आफ्रिकन देशांत क्रांत्या झाल्या. गेल्या तेवीस फेब्रुवारीला घानामध्ये झालेल्या राज्यक्रांतीने तर या सर्वांवर कळस चढविला. आफ्रिकन स्वातंत्र्याचा आणि आफ्रिकन एकतेचा प्रणेता मानला जाणारा घानाचा अध्यक्ष क्वामे एन्क्रुमा आपल्या राज्यात सारे काही ठाकठीक आहे, याची खात्री करून घेऊन मोठ्या विश्वासाने लांबच्या परदेशवारीवर असतानाच त्याच्या मागे ही क्रांती झाली. पेकिंगच्या विमानतळावर चिनी अध्यक्ष लिऊ शाओची आणि पंतप्रधान चौ एन् लाय हसतमुख क्वामे एन्क्रुमाचे शाही इतमामाने स्वागत करीत होते, त्याच वेळी इकडे घानाची राजधानी आक्रा येथील एन्क्रुमाच्या अध्यक्षीय निवासस्थानाचे रक्षक क्रांतिसैन्याशी शेवटची हातघाईची लढाई हारीत होते. आपल्या पदच्युतीची वार्ता एन्क्रुमाला कळली तेव्हा तो म्हणाला, "पण मी अजूनही घानाचा अध्यक्षच आहे." चिनी यजमानांनीही आपल्या पाहुणचारात काही उणे ठेवले नाही.

नायजेरिया आणि इतर आफ्रिकन राष्ट्रांतील क्रांत्यांपेक्षा घानाच्या क्रांतीमुळे धक्का बसला, याला कारण क्वामे एन्क्रुमाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याच्या पदच्युतीचा एकंदर आफ्रिकन राजकारणावर होणारा परिणाम. एक समर्थ बलिष्ठ शास्ता म्हणून एन्क्रुमाने सर्वत्र लौकिक कमाविला होता. परंतु अपार आत्मविश्वासाने आणि काहीशा प्रौढीनेही आपली प्रतिमा स्वतःच त्याने आपल्या देशात फार वाढवून

घेतली होती. स्वतःचा पक्ष सोडून इतर राजकीय पक्षांची दडपशाही, त्याचे समाजवादी धोरण, स्वतःला प्रतिकूल असलेल्या लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांना, शिक्षणतज्ज्ञांना, न्यायालयांना सावत्र वागणूक, त्याच्या धोरणामुळे होत चाललेली आर्थिक घसरगुंडी आणि त्याने वर चढविलेल्या अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, यांमुळे घानाची बरीच जनता त्याच्यावर नाराज होती. म्हणूनच क्रांतीच्या दुसऱ्याच दिवशी एन्क्रुमाने स्वहस्तेच उद्घाटन केलेले आपले प्रचंड पुतळे ठिकठिकाणच्या जमावाने स्वयंस्फूर्तीने पाडले.

परंतु त्याच्या पदच्युतीचे परिणाम त्याच्या स्वतःच्या देशापेक्षा इतर आफ्रिकन राजकारणावरच जादा झालेले दिसतात. १९४७ पासून आफ्रिकन राजकारणात क्वामे एन्क्रुमाने बरीच प्रतिष्ठा मिळविली होती. पश्चिम आफ्रिकेत वसाहतवादविरोधी लढ्यांना, आफ्रिकनांच्या स्वातंत्र्ययुद्धांना स्फूर्ती देणारा नेता म्हणून तो गणला जात होता. साऱ्या आफ्रिका खंडाचे प्रश्न एकत्रित विचारात घेण्याची क्षमता त्याच्यात होती आणि म्हणूच आफ्रिकन एकतेसाठी झटणाऱ्या नेत्यांमध्ये त्याचे नाव प्रामुख्याने होते. परंतु त्याचे साम्यवादाकडे झुकणारे धोरण आणि अगदी शेवटी शेवटी चिनी साम्यवादाकडे त्याची निष्ठा झुकत असल्याची लक्षणे, यामुळे त्याच्या नेतृत्वाविषयी आफ्रिकन राष्ट्रांमध्ये मतभेद होते. त्याच्या पदच्युतीमुळे हे अधिक स्पष्ट झाले.

ऱ्होडेशियाच्या प्रश्नावर ब्रिटनशी संबंध तोडण्याचा आफ्रिकन राष्ट्रांनी निर्णय घेतल्याबरोबर तो प्रथम कुणी अमलात आणला असेल, तर एन्क्रुमाने आणि टांगानियाच्या ज्युलियस न्येरेरेने. ऱ्होडेशियाविरुद्ध त्वरित लष्करी कारवाई इतर राष्ट्रांनी करावी, असा डॉ. एन्क्रुमाचा आग्रह होता. त्याच्या पदच्युतीमुळे आफ्रिकन राष्ट्रांच्या ऱ्होडेशियावर आर्थिक लष्करी दबाव आणण्याच्या कार्यक्रमात एकदम शिथिलता येणे अपरिहार्य आहे. तशी चिन्हेही दिसू लागली आहेत.

याच सुमारास आफ्रिकन ऐक्य-संघाच्या (ऑर्गनायझेशन ऑफ युनिटी) आदिस अबाबा येथे भरलेल्या परिषदेवर घानाच्या क्रांतीची छाया पडली. किंबहुना घानाची क्रांती हाच या परिषदेतील मतभेदाचा मुख्य मुद्दा बनला. इजिप्तसकट आठ आफ्रिकन राष्ट्रांनी घानाच्या नव्या क्रांतिकारक राजवटीच्या प्रतिनिधींबरोबर परिषदेत बसण्याचे साफ नाकारले आणि परिषदेतूनच काढता पाय घेतला. केनया, माली, गिनी, टांझानिया, युनायटेड अरब रिपब्लिक सोमालिया, अल्जीरिया आणि मारितानिया या राष्ट्रांनी आपापले प्रतिनिधी परिषदेतून परत बोलाविले आणि मग आफ्रिकन ऐक्य-परिषदेला अर्थच उरला नाही.

घानात क्रांती झाली, तेव्हा घाना हेरखात्याचा पूर्वीचा प्रमुख खोव अमिहिया लंडनला होता. देशोदेशी राज्यक्रांत्या घडवून आणण्यात पटाईत असलेल्या अमेरि-

केच्या सेन्ट्रल इंटेलिजन्स एजन्सीत त्याने शिक्षण घेतले होते. घानाच्या क्रांतीची वार्ता लंडनमध्ये कळली, तेव्हा त्याने आपणहून वार्ताहरांना सांगून टाकले की, या क्रांतीचा बेत माझाच आणि खरी किल्ली मीच फिरवली आहे. त्यामुळे घानाची क्रांती अमेरिकेनेच घडवून आणल्याचा सर्वत्र बभ्रा झाला. परंतु स्वत: खोत तीन मार्चला आक्रात उतरला, तेव्हा मात्र क्रांतिकारकांनी त्याला पटकन पकडून तुरुंगात टाकले.

तेव्हा घानाच्या क्रांतीमुळे व क्वामे एन्क्रुमाच्या पदच्युतीमुळे आफ्रिकन राजकारणाची अस्थिरता व दुफळी एकदम वर आली आहे. बहुसंख्य आफ्रिकन राष्ट्रांना राजकारणाचे प्रौढत्व अद्यापि आले नाही, हेही वारंवार होणाऱ्या राजक्रांत्यांवरून दिसते. दहा वर्षांपूर्वी साऱ्या आफ्रिकेत वारे होते ते स्वातंत्र्याचे, लोकशाहीचे. आताचे नवे वारे आहे लष्करी शासनाचे, राज्यक्रांत्यांचे. आफ्रिकन राष्ट्रे एकत्र येऊन जागतिक राजकारणात आपला एक स्वतंत्र प्रबळ गट निर्माण करतील, ही अशी मध्यंतरी चिन्हे दिसत होती, तीही आता अस्पष्ट होऊ लागली. हजारो जमाती, त्यांचे परस्परांतील वितुष्ट आणि असंख्य भिन्न भाषा आणि संस्कृती यांमुळे साऱ्या आफ्रिकेत ऐक्य निर्माण होणे कठीणच आहे.

केवळ राज्यक्रांत्यांच्याच बाबतीत बोलायचे झाले तर फक्त आफ्रिका खंडालाच नावे ठेवता येणार नाहीत. आशिया आणि दक्षिण अमेरिकेतील देशही आफ्रिकेच्या मागे नाहीत. नुसता गेल्या पाच वर्षांचाच इतिहास पाहिला तर एकेका खंडात पन्नास यशस्वी लष्करी राज्यक्रांत्या झालेल्या दिसतील. अयशस्वी होऊन तातडतोब ठेचल्या गेलेल्या लश्करी क्रांत्या तर शेकड्यांनी सापडतील. लॅटिन अमेरिकेत तर पाच-दहा वर्षांपूर्वीचा काळ असा होता की, दर आठवड्याला कुठे ना कुठे लष्करी क्रांती ठरलेली. लॅटिन अमेरिकेतल्या कुठल्या तरी देशातली लष्करी क्रांती हा अमेरिकन चित्रपट–निर्मात्यांचा आवडता विषय.

आपल्या सभोवार जरी नजर टाकली तरी लष्करी हुकूमशाहीची कितीतरी उदाहरणे दिसतात. अगदी जवळचे ब्रह्मदेश आणि पाकिस्तानही. नुकतेच सिलोनमधल्या लष्करातल्या एका गटाने आखलेला क्रांतीचा बेत सरकारने हाणून पाडला आहे. अजून त्या दृष्टीने सिलोनी लष्कराची साफसफाई चालूच आहे.

आफ्रो-आशियन आणि लॅटिन अमेरिकन नवोदित राष्ट्रांची ही दुर्दशा पाहता त्या मानाने आपण भारतीयांनी स्वत:बद्दल अभिमान बाळगला पाहिजे. आजूबाजूच्या लष्करी क्रांत्यांच्या आणि हुकूमशहांच्या गदारोळात एकटी भारतीय लोकशाही निष्ठावानपणे टिकून आहे. तसे पाहता भारतीय राज्य काही रामराज्य आहे, असेही कुणी म्हणणार नाही. परंतु काही किमान मूल्ये, काही किमान निष्ठा आणि राजकीय समज आपल्यात मुरला आहे, एवढे निश्चित.

## □ बंडाचा बीमोड

राज्याराज्यांचे अन्नधान्य प्रश्नांवर, नद्यांच्या पाणी–वाटपावर, शक्ति–वाटपावर, सीमाप्रश्नांवर आपापसातील वैमनस्य वाढत असतानाच पंजाबी सुभ्यासारखे आणि नागालँडसारखे प्रश्न पुन्हा खरजेप्रमाणे उठावेत, हे देशाचे दुर्दैव होय. देशाच्या ऐक्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करून घटक–राज्ये केवळ स्वतःच्या हिताकडे अधिक लक्ष देण्याच्या वृत्तीची बनू लागली आहेत. ही अधोगती रोखण्यासाठी पुन्हा पुन्हा परकीय सत्तेचे आक्रमणच होणे आवश्यक असेल, तर ते आपल्याला परवडणार नाही. केंद्रीय सरकारने राज्यावर अधिक जरब बसवून एकूणच देशाच्या हिताच्या काय गोष्टी आहेत, हे शिकविण्याची वेळ आली आहे.

केंद्रीय सरकारची ढिलाई आणि राज्या-राज्यांचा अनुनय करण्याचे धोरण नागालँडमध्ये सरकारच्या फार अंगलट आले आहे. १९६२ मध्ये नागालँडचे जे स्वतंत्र राज्य केले, ते पन्नाशीतच केले असते तर तोवर जी भूमिगत नागांची चळवळ फोफावली, ती फोफावली नसती. भारतीय संघराज्यात राहूनही बरेच अधिकार नागांना देण्याची जी तयारी सरकारने आता दाखविली, ती मागेच दाखविली असती, तर नागा ती स्वीकारण्याच्या तयारीत होते. तसे जरी झाले नसते आणि तेव्हाच मूळ धरीत असलेल्या भूमिगत नागा चळवळीवर सरकारने कणखरपणे बडगा उगारला असता, तर मिझोंचे हे लफडे इतक्या थराला गेलेही नसते. इंदिरा गांधींनी मोठ्या इतमामाने बंडखोर मिझो पुढाऱ्यांचे स्वागत केले तरी कशाला, हाही प्रश्न उद्भवतो. कारण संपूर्ण स्वातंत्र्य हाच हेका बंडखोरांचा दिसतो. हा आग्रह कुठल्याही सरकारला स्वीकारणे शक्य नाही. अशा परिस्थितीत बोलणी करण्यासाठी कुठलाच मुद्दा उरत नाही.

जेथे देशाच्या एकतेचा आणि सार्वभौमत्वाचा प्रश्न येतो, तेथे दया दाखवून चालत नाही. नागालँडमधील जनतेला, विशेषतः सुशिक्षितांना भारतीय राष्ट्रात राहण्याचे महत्त्व पटत आहे. बंडखोरांना खुद्द नागालँडमधील जनतेचा पाठिंबा नाहीच. अशा वेळी त्यांना दडपून काढणे हाच एकमेव मार्ग होय. आता एकदा दंडा हाती घेतल्यावर मिझो–चळवळीची पाळेमुळे खणून काढल्याशिवाय भारत सरकारने स्वस्थ बसू नये. एकदा धडा मिळाला की, इतरत्र काही अशा प्रवृत्ती असल्याच तर त्याही वठणीवर येतील.

परंतु मुख्य मुद्दा हा आहे की, देशातल्या कुठल्याही भागात स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची भावनाच निर्माण होता कामा नये. तशी निर्माण होण्यासाठी नागालँडप्रमाणे सरकार आणि देशानेही वावच ठेवता कामा नये.

• • •





# सावरकर-पर्व

श्री. ग. माजगावकर

सावरकर गेले. सावरकर–पर्व सुरू झाले आहे.

एक जुना प्रसंग आठवतो. रत्नागिरीहून सावरकर सुटलेले होते. १९३७–३८ चा सुमार असावा. समाजवादी विचाराच्या कार्यकर्त्यांनी सावरकर–सत्काराचा एक कार्यक्रम योजला होता. प्रास्ताविक भाषण करताना सभेच्या संयोजकांनी सांगितले की, 'हा सत्कार १९०८ सालच्या सावरकरांचा आहे. ब्रिटिशांशी झुंजणारे १९०८ चे सावरकर आम्हाला मान्य आहेत. हल्लीचे, १९३८ चे हिंदुत्वाचे पुरस्कर्ते सावरकर आम्हाला मान्य होण्यासारखे नाहीत ...'

आणि केतकीच्या बनातून सळकन् बाहेर येणाऱ्या पिवळ्याधमक नागाने फणा काढावा, तसे विषयाच्या ओघात, सत्काराला उत्तर देताना सावरकर चमकून म्हणाले, '१९०८ साली सावरकर जे कार्य करीत होते, ते त्या वेळीही कोणाला मान्य होत नव्हते. 'माथेफिरू' म्हणूनच त्या वेळीही त्याची गणना होत असे. आज आपल्याला १९०८ च्या सावरकरांना मान्यता द्यावीशी वाटते. ठीक आहे. १९०८ चे सावरकर मान्य व्हायला, १९३८ साल उजाडावे लागले! १९३८ चे सावरकर मान्य व्हायला, कदाचित १९६८ साल उजाडेल! कोणी सांगावे! मी आज जे सांगतो त्याची सत्यता १९६८ साली कदाचित आपल्याला पटेलही...'

६८ साल अद्याप दूर आहे. ३८ चे सावरकर काय होते आणि ते मान्य होणे याचा अर्थ काय होतो, हे नंतर पाहूच. पण १९०८ च्या सावरकरांना मान्यता देणे, याचा तरी नेमका अर्थ काय आहे? सावरकरांची प्रखर देशभक्ती व स्वातंत्र्यप्रीती मान्य असणे याला तसा काहीच अर्थ नाही. अग्नीची उष्णता, सुवर्णाची कांती मान्य करण्यासारखेच हे प्राथमिक आणि अनावश्यक आहे. या उष्णतेची अधिक चिकित्सा हवी. धातूची पुढची परीक्षा हवी. सावरकरांनी देशस्वातंत्र्यासाठी जो सशस्त्र क्रांतीचा मार्ग अनुसरला, त्याची इष्टानिष्टता, योग्यायोग्यता व यशापयश निश्चित करणे हा खरा 'मान्यते'चा अर्थ आहे.


# क्रांतिपक्ष व लोकपक्ष

याबाबत सावरकरांचा सशस्त्र क्रांतिपक्ष आणि गांधीजींचा अहिंसापक्ष या दोन्ही विरोधी पक्षांच्या आग्रही व एकांतिक भूमिका इतिहासाला मान्य होण्यासारख्या नाहीत. भारताला अहिंसेनेही स्वराज्य मिळालेले नाही आणि सशस्त्र युद्धात ब्रिटनचा पराभव झाल्यामुळे भारत स्वतंत्र झाला, हेही प्रतिपादन बरोबर नाही. सशस्त्र आणि निःशस्त्र या दोन्ही मार्गांनी प्रथमपासून भारताचा स्वातंत्र्यलढा सुरू होता व महायुद्धामुळे खिळखिळचा झालेल्या ब्रिटनला आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या दडपणाखाली भारताला स्वातंत्र्य देऊन निघून जावे लागले, असे एकूण आपल्या स्वातंत्र्ययुद्धाचे स्थूल चित्र आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास काँग्रेस हा एकमेव संघटित लोकपक्ष देशात अस्तित्वात असल्याने स्वराज्याचे प्रत्यक्ष माप या पक्षाच्या पदरात पडणे स्वाभाविकच होते. यश कोणी हस्तगत केले, हा प्रश्न नाही. संयुक्त महाराष्ट्राचा लढा लढले कोण ? सत्ता गेली कोणाकडे ? असे नेहमीच घडत असते. जो हजीर तोच वजीर ठरत असतो. तेव्हा सशस्त्र क्रांतिपक्षाच्या वाट्याला वजिरी आली नाही, हा काही या पक्षाच्या 'चुकी'च्या मार्गाचा पुरावा नाही. शेवटी यश हे संधीवर योग्य वेळी झडप टाकल्याने मिळत असते. प्रयत्नाशी त्याचे नाते असले, तरी ते गणिताइतके सरळ व अनिवार्य नसते. क्रांतिपक्षाच्या पराक्रमामुळे व प्रयत्नामुळे स्वराज्य जवळ आले, पण हा पक्ष संघटित नसल्याने, त्याला लोकमताचा फारसा पाठिंबा नसल्याने, स्वराज्याच्या अंतिम वाटाघाटीत या पक्षाला स्थान मिळविता आले नाही. क्रांतिपक्ष आणि लोकपक्ष यांची टिळकांनंतर भारतीय राजकारणात झालेली पूर्ण फारकत याला कारणीभूत आहे. केवळ लोकपक्ष–जनतेचा केवळ निःशस्त्र प्रतिकारी पक्ष–कितीही संघटित आणि बहुसंख्य असला तरी केवळ आपल्या बळावर कधीही स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट करू शकत नाही. अशा लोकपक्षाच्या सामर्थ्यावर व त्याने लढविलेल्या निःशस्त्र अहिंसक लढ्यांवरच केवळ गांधीजींची श्रद्धा; तर दुसऱ्या टोकाला सावरकर–भगतसिंगादि क्रांतिकारकांचा 'निर्धारी अल्पसंख्ये'च्या पराक्रमावरच केवळ विश्वास ! सावरकरांनी हा 'अल्पसंख्ये'चा सिद्धांत या शब्दांत मांडला आहे. ते लिहितात, "प्रत्येक देशास पारतंत्र्यातून सोडवून स्वतंत्र करण्याचे कार्य अंती तेथील निर्धारी नि वीर्यशाली अशा यथाप्रमाण अल्पसंख्येलाच करावे लागते." (समग्र सावरकर वाङ्मय, खंड ३, पृ. ६०) या दोन्ही भूमिका अर्थातच एकांतिक आहेत. निर्धारी अल्पसंख्य ही आघाडीची हल्लफोडी करणारी तुकडी मानली तरी मुख्य सैन्याने पाठोपाठ चाल ही केलीच पाहिजे. क्रांतिपक्षाला लोकमताचे पाठबळ नसले, संघटित लोकपक्षाची एक भूमिगत शाखा म्हणून क्रांतिपक्ष वावरत नसला




' निर्धारी अल्पसंख्येचा अग्रणी '

तर योगायोगाने स्वातंत्र्य लाभले तरी ते अस्थिरच राहते. वरचेवर राज्यक्रांत्या, उठाव आणि लष्करी बंडांचे घातचक्र देशात सुरू होते आणि क्रांतिपक्षाचे उग्र आंदोलन लोकपक्षाचे पाठीशी नसले तर लोकपक्ष हा अखेरीस मवाळांचा मेळावा ठरून शत्रूवर योग्य तेवढे दडपण आणण्यास असमर्थ ठरतो. ही जोड जमवावीच लागते. ती जमल्याशिवाय कार्यसिद्धी होऊ शकत नाही. टिळकांजवळ ही समन्वयाची दृष्टी होती, वेळप्रसंग पाहून सर्व मार्ग हाताळण्याची चतुरस्रता होती. एकीकडे ते स्वच्छ म्हणत, " कोणतीही चळवळ लोकांच्या अनुकूलतेखेरीज सिद्धीस जात नाही.





लोक अनुकूल नसल्यास एकटा पुढारी फशी पडतो." तर दुसरीकडे क्रांतिकारकांना पाठीशी घालण्याचे, खाडिलकरांना नेपाळात पाठवून बाँबच्या कारखान्याच्या दृष्टीने काही हालचाल करण्याचे, सैनिकीकरणाचा जोरदार पुरस्कार करण्याचे त्यांचे उद्योगही चालूच असत. मवाळांचे वाटाघाटींचे मार्गही त्यांनी कधी वर्ज्य मानले नाहीत, तसेच वेळप्रसंगी लोकांची तशी ५० टक्के जरी तयारी दिसली तरी सशस्त्र बंडाचा पर्याय नजरेआड केला नाही. शक्याशक्यतेचा विचार मात्र कधी सोडला नाही. 'साधनानामनेकता' हे नित्याचे सूत्र आणि अशी सर्व साधने काल-मानाप्रमाणे वापरून स्वातंत्र्याची चळवळ पुढे नेत असता, अगदी शेवटी ब्रिटन



सावरकर–क्रिप्स

एखाद्या संकटात सापडून ब्रिटिश साम्राज्यालाच जेव्हा बाहेरून धक्के बसतील, तेव्हाच या सर्व अंतर्गत चळवळींना यश मिळण्याची शक्यता आहे, हेही आंतरराष्ट्रीय राजकारणाचे त्यांचे भान कधी सुटले नाही. कुठलीच एकांतिकता त्यांच्या स्वभावात नव्हती. व्यवहारावरची मांड अगदी पक्की होती. टिळकांनंतर आपल्या स्वातंत्र्य-युद्धाची अशी व्यापक हाताळणी झालीच नाही. सशस्त्र आणि निःशस्त्र वेगवेगळे लढले, त्यामुळे अखेरच्या क्षणी दोन्हीकडे कमजोरी दिसली, शत्रूचे फावले. पण फारकत पडली, यश एकाच पक्षाकडे गेले म्हणून क्रांतिपक्षाचा मार्ग 'चुकी'चा

ठरत नाही, 'अनावश्यक' ठरत नाही. भारत हा ब्रिटिशांनी निःशस्त्र करून सोडलेला देश असल्याने येथे सशस्त्र क्रांतिमार्गाला वावच उरला नव्हता, हे प्रतिपादन टिकू शकत नाही. सावरकरांची सैनिकीकरणाची मोहीम, सुभाषचंद्रांची आझाद हिंद सेना, ४५ चे नाविक बंड हे सारे सशस्त्र क्रांतियुद्धातलेच टप्पे होते, हे नाकारण्यात काही अर्थ नाही. इतकेच काय, अहिंसक म्हणवणाऱ्या कॉंग्रेसने जे आंदोलन ४२ मध्ये केले ते अहिंसक तर नव्हतेच, निःशस्त्रही नव्हते, तर चक्क भूमिगत, सशस्त्र क्रांतिकारक व दहशतवादी मार्गाचा अवलंब यात केला गेला, हेही कोणी नाकारू शकणार नाही. तरीही ज्यांना भारतात 'सशस्त्र क्रांती' झालीच नाही, भारताला अहिंसेने स्वातंत्र्य'मिळाले असे म्हणावयाचे असेल, ते खुशाल तसे म्हणोत. इतिहास या दोन्ही मार्गांचे अस्तित्व सिद्ध करील, फारकतीबद्दल दोन्ही मार्गांच्या अध्वर्यूंना दोषही देईल, श्रेयाची विभागणीही यथान्याय करील.

आणि या मार्गांचे एवढे यशापयश नक्की झाले, की सावरकरांचे यातील स्थान हा वादातीत विषय आहे. ते तर क्रांतिकारकारकांचे मुकुटमणीच. ते आणि त्यांचा क्रांतिकारक पक्ष – सत्तावन ते सुभाष ही सारी परंपरा – म्हणजे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील एक गौरवशाली पर्व आहे, जे सुवर्णाक्षरांनीच लिहावे लागेल, लिहिले जाईल.

## ☐ राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया

१९३८ चे सावरकर ही १९०८ च्या सावकरांची परिणती होती. ज्या देश-स्वातंत्र्यासाठी १९०८ चे सावरकर झुंजत होते, तो देश कोणाचा, त्याची अस्मिता कोणती हे मूलभूत प्रश्न राजकारणाच्या विचित्र वळणामुळे तेव्हा निर्माण होऊन बसले होते. जो जो या देशात राहतो, तो तो या देशावर स्वामित्व सांगू शकतो काय ? घरात किडेमुंगी, पोपटमैना, नोकरचाकर, पैपाहुणा ते थेट यजमान हे सर्वजण कमीजास्त काल राहतच असतात. पण घर कोणाचे हा प्रश्न उपस्थित झाला तर बोट कोणाकडे दाखवायचे? अगदी पिढ्या दोन पिढ्या राहिला तरी नोकर तो नोकरच आणि पाहुण्याने बराच काळ मुक्काम ठोकला तरी तो काही यजमान ठरू शकत नाही. यजमानाला हे यजमानपद अर्थातच परंपरेने आलेले असते. केव्हातरी, हजारपाचशे वर्षांपूर्वी यजमानाच्या पूर्वजांनी या वास्तूवर स्वामित्व मिळविलेले असते. त्यानंतरच्या पिढ्यानुपिढ्यांनी या वास्तूचा उपभोग घेतलेला असतो, वेळप्रसंगी वास्तूच्या संरक्षणासाठी शेजाऱ्यापाजाऱ्यांशी व परक्याशी संघर्ष खेळलेले असतात, तिच्या संवर्धनासाठी आपले तनमनधन अर्पण केलेले असते. अशा सर्व असंख्य पूर्वस्मृती त्या वास्तूबरोबरच त्या यजमानाकडे आलेल्या असतात आणि हा स्मृतींचा वारसा हीच त्याच्या यजमानपदाची मूळ कसोटी राहते. हा वारसा जे आज बाळगून आहेत, ते या देशाचे पुत्र, स्वामी, मूळ घटक. ज्यांच्याजवळ हा वारसा आज नाही,





१९३८ चे सावरकर

ते अल्पसंख्य, इतरेजन. नागरिकत्वाचे समान अधिकार, विकासाची समान संधी या अल्पसंख्याकांनाही येथे मिळेलच. पण हे राष्ट्र हिंदूंचे, हिंदुसमाज हा येथील राष्ट्रीय समाज. कारण राष्ट्रीय अस्तित्वाची समान ऐतिहासिक स्मृती जतन केलेली आहे फक्त या बहुसंख्य समाजानेच. हेच सरळ सत्य रत्नागिरीहून सुटल्यावर सावरकर प्रतिपादू लागले. कर्णावतीच्या पहिल्याच हिंदुसभा अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी 'द्विराष्ट्रवाद' ही एक वस्तुस्थिती म्हणून दाखविलेली आहे, त्याचे समर्थन किंवा पुरस्कार केलेला नाही. त्यांनी हा धोका म्हणून सांगितला, की आज या क्षणी या देशात मुसलमानांचा पाच–सहा कोटी समाज असा आहे, की जो हिंदुस्थानचा समान ऐतिहासिक वारसा नाकारीत आहे; या वारसाशी ते आज समरस

झालेले नाहीत व केवळ अल्पसंख्य म्हणूनही येथे सुखान नांदण्याची त्यांची इच्छा नाही. इतकेच नव्हे, तर हिंदुस्थानात आपण एकेकाळी बहुसंख्य हिंदूंवर राज्य केलेले आहे, ते स्थान पुन्हा आपल्याला मिळाले पाहिजे, अल्पसंख्य म्हणून नव्हे तर राज्यकर्ते म्हणून या भूमीचा उपभोग आपल्याला घेता आला पाहिजे, अशी या (अपवाद वगळता) मुसलमान समाजाची आज धारणा आहे- आणि त्या दृष्टीने स्वतंत्र राज्यनिर्मितीचे त्यांचे प्रयत्न ब्रिटिशांच्या मदतीने अव्याहत चालू आहेत. हिंदुसमाजाने हे प्रयत्न हाणून पाडावेत, मुसलमान समाजाच्या अडवणुकीला व धाकदपटशाला भीक न घालता केवळ आपल्या बळावर विसंबून राहावे. कारण यजमान या दृष्टीने या वास्तूच्या, या भूमीच्या मुक्तिभुक्तीची मुख्य जबाबदारी हिंदूंचीच आहे, याच समाजाचा या भूमीशी आत्यंतिक जिव्हाळ्याचा पिढ्यानुपिढ्यांचा ऐतिहासिद्ध ऋणानुबंध आहे.

हाच तो हिंदुराष्ट्रवाद. मुळात राष्ट्रवाद ही विशिष्ट भूमीवर विशिष्ट समाजाची स्वामित्व प्रस्थापित करून पाहणारी प्रेरणा आहे. या प्रेरणेचा उगम आधुनिक आहे. पारलौकिक निष्ठेचा लोप झाल्यावर ऐहिकाचे अधिष्ठान शोधणाऱ्या युरोपीय समाजाला फ्रेंच तत्त्वज्ञ रूसो याने दिलेली ही देणगी आहे. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जो ऐहिकवादी, औद्योगिक व नागर – समाज युरोपात उदयास आला, त्याचे हे तत्त्वज्ञान. या नव्या समाजाच्या मूलस्थानी असणारी स्वामित्वाची, संचयाची प्रेरणाच राष्ट्रवादाच्याही मुळाशी असणे स्वाभाविकच आहे. म्हणूनच राष्ट्रवाद हा विशिष्ट भूमीवर विशिष्ट समाजाचे स्वामित्व सिद्ध झाल्यावरच उदयास येऊ शकतो. भूमीचा आणि राष्ट्रवादाचा संबंध अटळ आहे; कारण भूमी हाच स्वामिभावाचा सध्याच्या युगात तरी मुख्य आधार आहे. भूमीइतकी अन्य कशाच्या योगानेही समाजाची स्वामित्वधारणा व्यक्त होऊ शकत नाही. इतिहास, संस्कृती, भाषा आदि समान बंधनांनी जो समाज एकत्व पावलेला असतो, त्याचे विशिष्ट भूमीशी स्वामित्वाचे नाते जोडले जाणे हीच राष्ट्रनिर्मितीची अखेरची प्रक्रिया आहे. एकत्वाचे सर्व घटक आहेत, समान परंपरा व समान आकांक्षा आहेत, पण भूमी नाही तोपर्यंत ज्यू हे राष्ट्र नाही. पॅलेस्टाईनची भूमी लाभली आणि ज्यू–राष्ट्राचा जन्म झाला. आपली प्रक्रिया कोणती ? राम, कृष्ण, बुद्ध, शिवाजी ही परंपरा जो आपली मानतो असा समाज राष्ट्रीय समाज म्हणून ओळखणे व इतिहासाने त्याची म्हणून सिद्ध केलेल्या भूमीशी या समाजाचे स्वामित्वाचे नाते जोडणे, ही परंपरा आपली मानणारा भारतात आज फक्त हिंदुसमाजच आहे, म्हणून हिंदुसमाज हा या देशात राष्ट्रीय समाज ठरतो; या समाजाच्या म्हणून मानल्या गेलेल्या 'आसिंधू सिंधूपर्यंता' भूमीवर इतर कोणत्याही समाजाचा अधिकार पोचू शकत नाही. ही आजची वस्तुस्थिती उद्या इतर समाज या राष्ट्रीय समाजाशी समरस होऊ लागतील, परंपरांची सरमिसळ होऊन ती अधिक समावेशक होईल. ती तशी होण्यासाठी एकत्वाचे, एकात्मतेचे





संस्कार व प्रयोग करीत राहण्याची जबाबदारी या आज राष्ट्रीय म्हणून गणल्या जाणाऱ्या समाजाचीही आहेच, हे सर्व मान्यच. पण तशी परिस्थिती उद्‌भवल्यावरही परंपरा अधिक व्यापक व आज तिच्यापासून दूर राहणाऱ्यांना सामावून घेण्याइतकी समावेशक झाली तरी, तेव्हाही या राष्ट्राला 'हिंदुराष्ट्र' म्हणण्यास प्रत्यवाय नसावा; कारण निदान सावरकरांनी तरी 'हिंदू' हा शब्द स्वच्छ राजकीय अर्थानेच योजलेला आहे ! धर्माशी या शब्दाचा सावरकरांनी संबध जोडलेला नाही. राम–कृष्ण–बुद्ध–शिवाजी ही परंपरा मानणारा व या परंपरेने पुनित झालेल्या आसिंधूसिंधू भूमीशी इमान बाळगणारा तो हिंदू, ही सावरकरांच्या हिंदुत्वाची व्याख्या आहे. उद्या या परंपरेत एखादा अकबरही येऊ शकेल. पण तेव्हाही ही परंपरा हिंदू या नामाभिधानाने ओळखण्यास हरकत नाही. 'गंगा' आणि 'यमुनां'चा संगम झाल्यावर पुढे वाहत जाते ती 'गंगा' असते; जरी तिच्यात यमुनेच्या पाण्याचा रंग मिसळलेला असतो. पण जर उद्या सर्वांनाच केवळ हे नावच परंपरासमन्वयाच्या आड येते असे खरोखरच वाटू लागले तर, त्यातही बदल करण्यास हरकत नाही. ही स्वाभाविक उत्क्रांतीही सावरकरांना अमान्य नव्हती. त्यांचा आग्रह होता आशयाचा. कोणती परंपरा या भूमीची बीज परंपरा आहे हे

[पृष्ठ ६० वर चालू]

# ' मि झो रॅ म '

## एका ज्वलंत प्रश्नावरील माहितीपूर्ण लेख

लेखक : मो. ग. तपस्वी ( दिल्ली )

भारताच्या अतिपूर्वेकडील आसाम प्रांतातील एका डोंगरी जिल्ह्यात ' मिझोरॅम ' हा शब्द वन्देमातरमच्या आवेशाने निनादतो आहे. मिझो डोंगरी जमातीच्या लोकांनी स्वातंत्र्यासाठी दिलेली ती घोषणा आहे. आपल्या ' जयहिन्द ' या घोषणे-सारखाच तिचा अर्थ आहे आणि या मिझोरॅमचे प्रतिध्वनी भारतभर उठले आहेत. नागा लोकांना नागस्तान हवे, तसेच या मिझोंना मिझोरॅम हवे आहे. आता या मागणीखातर मिझोंनी चक्क बंड पुकारले आहे. हा लेख प्रसिद्ध होईस्तवर ते मोडून काढलेले असेलही. पण ते ज्यातून उद्भवले, त्या परिस्थितीचा उपशम अशक्य नसला तरी दुर्धर मात्र झालेला आहे

वास्तविक कृत्रिम फाळणीच्या अनेक पापफळांपैकीच आसामच्या या डोंगरी जिल्ह्यातील लोकांनी स्वराज्यासाठी केलेले बंड हेही एक पापफळच आहे. भारतीय राजनीतीत स्वप्नसोपान बांधण्याचा कल्पनेतून या अकारण संघर्षाची विषबीजे पेरली गेली आहेत. एक कडवट सत्य इथे सांगणे आवश्यक वाटते. ''सगळ्या आदिवासी लोकांचे स्वतंत्र, वेगळे आणि आगळे असे एक व्यक्तिमत्त्व आहे आणि आधुनिकतेच्या हव्यासापायी त्या लोकजीवनातील ते व्यक्तिमत्त्व नासता कामा नये,'' असे प्रतिपादन करणाऱ्या एलविन या पाश्चात्त्य विद्वानाच्या विचारसरणीची पं नेहरूंच्या मनावर जी विलक्षण मोहिनी पडली, त्या मोहिनीतून निर्माण झालेल्या अनेक घोटाळ्यां-पैकीच हा आसामी गिरिजनांचा यक्षप्रश्नही एक घोटाळा आहे.

### स्वतंत्र जिल्हा परिषदा

या ' स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे जतन ' करण्याच्या स्वप्नसोपानाच्या निर्मितीला पं. नेहरूंनी १९५२ मध्ये सुरवात केली. भारतीय राज्यघटनेतील सहाव्या परिशिष्टा-न्वये त्यांनी या डोंगरी जिह्याची वेगळ्या राज्याची मागणी शमवण्याकरता जिल्हा परिषदांची मुहूर्तमेढ रोवली. परंतु या जिल्हा परिषदा म्हणजे आपल्या महाराष्ट्रा-तील जिल्हा परिषदांसारख्या नाहीत. त्यांची जडण, घडण आणि अधिकार वगैरे आपल्या विधानसभेसारखे आहेत. त्या वेळी काही घटनापंडितांनी आणि कायदा-विशारदांनी ' परिणामी ही व्यवस्था आपल्या हिताची होणार नाही ', असा सल्ला पं. नेहरूंना दिला होता. पण तो त्यांनी ऐकला नाही आणि अखेर खासी, जयन्तिया, गारो, काचार, मिकीर आणि मिझो या सहाही डोंगरी जिल्ह्यांत जिल्हा परिषदा या नावाने स्वतंत्र आणि स्वायत्त स्वरूपाच्या कार्यपालिका निर्माण झाल्या.

आणखी एक फारशी माहीत नसलेली गोष्ट सांगतो. या सहाही जिल्ह्यांत मुख्य वस्ती गिरिजनांचीच असली तरी एकाही गिरिजन जमातीचे दुसरीशी साम्य नाही, चालीरीतीचे नाही, भाषेचे नाही की कशाचे नाही. त्यातल्या त्यात या मिझो जमातीचे तर इतर कुणाशी कसलेच सूत नाही. वर मी कृत्रिम फाळणीच्या पापफळांचा उल्लेख केला, तो येथे स्पष्ट करायला हवा. या जमातीचीहि भारताच्या फाळणीबरोबरच फाळणी झाली. त्यांचे काही आप्तजन ब्रह्मदेशात राहिले, तर काही पूर्व पाकिस्तानात गेले. भारताच्या अगदी आग्नेय टोकाला मिझो टेकड्यांची चिंचोळी पट्टी, पूर्वेला ब्रह्मदेश आणि दक्षिण-नैर्ऋत्येला पूर्व पाकिस्तान यांच्या दरम्यान पाचर मारावी तशी पसरलेली आहे. राजकीय नकाशावर फाळणी झाली तरी ती या मिझोंना व्यवहारात मंजूर नाही आणि आजही त्यांचे जाणे-येणे शेजारच्या या दोन्ही देशांत चालूच असते. शिवाय हे मिझो भारतामधल्या इतर कोणत्याही जिल्ह्यापेक्षा जास्त साक्षर आहेत. सबंध भारतात तेथील साक्षरतेचे प्रमाण दुसऱ्या क्रमांकावर म्हणजे शेकडा ४४ आहे. अर्थात हे शिक्षण व ही स्वतंत्र राजकीय अस्मिता मिझोंमध्ये जागवली ती ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी. नागा लोकांप्रमाणेच आधुनिक जगाचे पाश्चात्त्य आरशातून या मंडळींना दर्शन घडवण्याचा खटाटोप त्यांनीच केला. ते पापफळ गेल्या १७-१८ वर्षांत आपल्यातील बियाणे पेरून आज अनेक विषवल्लींना जन्म देऊन बसले आहे. या विषवल्ली सहाही जिल्ह्यांत वाढू लागल्या आहेत आणि त्यांच्या गुंतागुंतीतून आमच्या राजकीय क्षितिजावरहि नवी गुंतागुंत निर्माण होत आहे.

या पार्श्वभूमीवर आसामातील या 'जिल्हा-परिषद' यंत्रणेने किती भयंकर धोके निर्माण केले, याचा आढावा घेतला म्हणजे पं. नेहरूंनी जिद्दीने निर्मिलेला स्वप्नसोपान आज देशाला कुठे घेऊन चालला आहे, याची कल्पना येईल. या जिल्हा परिषदांना स्वतंत्र मुख्यमंत्री आहे, अर्थमंत्री आहे आणि चिटणीसही आहेत. त्यांचे वेगळे अंदाजपत्रक तयार होत असते. या जिल्हा परिषदा करवसुलीही करीत असतात. आपल्या कार्यक्षेत्रात बाहेरच्या कुणाला स्थायिक होऊ न देण्याचे स्वातंत्र्य त्यांना आहे. तद्देशीय गिरिजनांखेरीज इतरांना या जिल्हा परिषदांच्या क्षेत्रात स्थावर मालमत्ता घेण्याचा अधिकार नाही. स्थानिक लोकांखेरीज इतरांशी बेटी-व्यवहार वर्ज्य केला आहे. त्यातही फरक असा की तेथील पुरुष हवे तर बाहेरच्या मुली परणून आणू शकतील, परंतु बाहेरच्या पुरुषाला तेथील मुलींशी लग्न करता येणार नाही. शिवाय या जिल्हा-परिषदा आपल्या अन्तर्गत कारभारासाठी राज्य सरकारकडून फक्त 'घेण्याच्याच' मालकीच्या आहेत. 'देण्याच्या' बाबतीत सगळा आनंदच आहे. इतकेच काय, त्यांच्या क्षेत्रातील विकासकार्यासाठीदेखील या परिषदा काहीच देत नाहीत.

[ पृष्ठ ६५ वर पाहा ]



# ज्ञानबाचं गुऱ्हाळ

## • राणीच्या बागेत पांढरी वाघीण

मुंबईच्या राणीच्या बागेत लवकरच एक पांढरी वाघीण येणार आहे म्हणतात. पांढरा वाघ आणि पांढरी वाघीण हे दोन्ही प्राणी मोठे दुर्मीळ. विंध्य पर्वतातील जंगलात हा प्राणी सापडतो. हे जंगल रेवाच्या महाराजांच्या ताब्यात आहे. त्यांना वाघवाघिणीची जोडीच मागितली होती. पण सध्या पांढरा वाघ उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. तूर्त वाघीण मिळाल्यावर पांढरा वाघ तिच्या जोडीला येणार.

परवा वर्तमानपत्र सहज चाळता चाळता माझी या बातमीवर दृष्टी गेली आणि मला मोठे नवल वाटले. पांढरा वाघ सध्या मिळत नाही, हे रेवाच्या महाराजांचे म्हणणे मला तरी काही पटले नाही. पांढरा वाघ खरोखर इतका दुर्मीळ आहे काय ? मुळीच नाही. तो फक्त जंगलात सापडतो हे म्हणणे खोटे आहे आणि फक्त विंध्य पर्वताच्या अरण्यात सापडतो, ही गोष्ट तर धादांत असत्य आहे. कुणीही काहीही सांगावे आणि आम्ही आपले ते खरे मानावे म्हणजे काय ? पांढरे वाघ तर मला सध्या गावोगाव दिसत असताना इतके खोटे यांना सांगवते तरी कसे ? जंगलात कशाला धडपडायचे ? कुठेही पळा तुम्ही माझ्याबरोबर. मी तुम्हाला पांढरे वाघ दाखवतो. एक का दोन, या वाघांचे कळपच्या कळप आता सार्वजनिक जीवनात हिंडताना मला आढळले आहेत बरे ! दिल्लीत काय, मुंबईत काय, कुठेही चला. ती पाहा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँक. एक मोठा पांढरा वाघ दुसऱ्या वाघांना हुसकून लावून खुर्चीवर बसला आहे पाहा. त्याची ती नखे, दुसऱ्याला फाडून खाण्याची सवय, ती बुभुक्षित दृष्टी. आपल्यापेक्षा मोठा वाघ दिसल्यावर खाली केलेली शेपटी, यावरून नाही का तुमच्या ध्यानात येत, की जनावर अगदी जातिवंत आहे. ती पाहा जिल्हा–परिषद. या ठिकाणी तर पांढऱ्या वाघाचे एक शिबिरच भरलेले आहे. पाहा कसे गुरगुरत आहेत एकमेकांवर. कसे पंजे उगारीत आहेत.

दिवसभर डाराडूर झोपण्याची यांची सवय. किती आश्चर्यकारक आहे. हे वाघही संध्याकाळच्या पुढेच जागे असतात आणि यांच्या हालचालींना खरा वेग येतो तो रात्रीच. ती पाहा तालुका पंचायत. ती लँड मॉर्गेज बँक. त्या निरनिराळचा सरकारी कमिटचा. पांढरा वाघ नाही, असे एक ठिकाण तरी कोठे सापडणे शक्य आहे काय ? असे असताना पांढरा वाघ मिळत नाही, अशी ओरड करणे दांभिकपणाचे नाही काय ?

प्राणिसंग्रहालयाचे प्रमुख सांगतात की, हा पांढरा वाघ म्हणे दिसायला फारच सुंदर असतो; पांढराशुभ्र रंग आणि त्यावर काळे पट्टे. विशेष म्हणजे त्याचे पंजे गुलाबी असतात. इतर वाघांप्रमाणेच त्याच्या सवयी असतात. फक्त हा वाघ थोडा नाजुक असतो इतकेच. त्याला गारवाही जरा अधिक लागतो. हे वर्णन वाचूनही माझे काही समाधान झाले नाही. हे सगळेच वर्णन मी म्हणतो त्या वाघांना बरोबर जुळणारे आहे. हेही वाघ पांढरेशुभ्र असतात आणि आतून काळचा पट्टचांनी माखलेले आढळून येतात. त्यांचे तळवेही गुलाबी असतात. नसले तरी गुलाबी तळव्यांचे नाजुक हात त्यांना फार आवडतात, ही गोष्ट नक्की. टीका, देशभक्ती, प्रामाणिकपणा, नि:स्वार्थ वृत्ती या प्रकारात यांची प्रकृती थोडी नाजुकच असते. गारवा यांनाही फार आवडत असावा, कारण एअर-कंडिशण्ड रूमशिवाय दुसरीकडे कोठे ते बसतात असे दिसत नाही. इतका सगळा पुरावा दिल्यानंतर या पांढऱ्या प्राण्याच्या ' वाघपणा 'बद्दल शंका घेण्याचे काय कारण आहे, हेच मला कळत नाही. हां, एक फरक मात्र आहे. विंध्य पर्वतातले वाघ कदाचित निरुपद्रवी प्राण्यांच्या वाटेला जात नसतील. आपल्यावर हल्ला झाल्याशिवाय दुसऱ्यावर हल्ला चढवीत नसतील आणि तशीच निकराची वेळ आली तर प्राणपणाने झुंजतही असतील. आमचे हे पांढरे वाघ मात्र निरुपद्रवी प्राण्यांवर हल्ला करण्यात भूषण मानतात. आपणहून कोणावरही झडप घालतात आणि नुसतेच गुरगुरतात. झुंजण्याची वेळ आल्यावर मात्र तावडतोब धूम ठोकून आपापल्या जाळचात गडप होण्याकडे यांचा विशेष कल आहे.

हा फरक आहे खरा. आता त्यामुळे राणीच्या बागेला असला पांढरा वाघ नको असेल तर नाइलाज आहे. मी बापडा मग काय बोलणार ? पण एक गोष्ट तुमच्या कानांत सांगू का ? परदेशी लोकांच्या काही ध्यानात हा फरक येण्यासारखा नाही. रेवाच्या महाराजांनी वॉशिंग्टनला एक पांढरा वाघ मागे पाठवला आहे. मागणी आहेच. तेव्हा त्यांनी हे आमचे पांढरे वाघ उचलावेत आणि भराभर जगातल्या सगळचा प्राणिसंग्रहालयांकडे पाठवून द्यावेत. नाहीतर मी म्हणतो, ते वाघ प्राणिसंग्रहालयात जितके शोभतील, तितके दुसरीकडे कोठेच खुलून दिसणार नाहीत. तिकडच्या मंडळींचीही सोय होईल आणि इकडेही रान जरा रिकामे होईल.

## • दुष्काळ आहे, अन्नटंचाई नाही !

आपल्या देशात अन्नधान्याची टंचाई असेल, पण दुष्काळ किंवा उपासमार बिलकुल नाही, असे आपल्या पंतप्रधानबाईंचे मत आहे. लंडनच्या 'इव्हिनिंग स्टँडर्ड' या वर्तमानपत्रात त्यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. त्या मुलाखतीत हे बहुमोल विचार त्यांनी व्यक्त केले. अन्नटंचाईसंबंधी अतिशयोक्तीच्या बातम्या निष्कारण प्रसिद्ध होत आहेत, अशी इंदिराबाईंची तक्रार आहे. त्या म्हणतात–म्हणजे या मुलाखतीत–की, परदेशांतून अन्नधान्य मिळाले तर आम्हाला हवेच आहे. पण ती मदत असावी, भीक नको. भीक घेण्यापेक्षा उपासमार परवडली. मग हा अतिरंजित प्रचार का ? इंदिराजींचे म्हणणे स्वच्छ आहे. चालू वर्ष हे निवडणुकीचे वर्ष आहे. तेव्हा अन्नधान्य–प्रश्नाचे गांभीर्य विनाकारण वाढवले जात आहे.

इंदिरादेवींच्या मुलाखतीत आणि त्यांनी व्यक्त केलेल्या मतात मला तरी तथ्य वाटते. प्रांजळपणाही वाटतो. अन्नधान्याची टंचाई या देशात आहे, ही गोष्ट त्यांनी किती मोकळेपणाने आणि चटदिशी कबूल केली आहे बरे ! इतका प्रांजळपणा राज्यकर्त्यांत सहसा कधी आढळतो काय ? त्यांचेच पिताजी घ्या. अक्साई चीनचा प्रदेश चीनने बळाने हिसकावून घेतला. तेथे मोठमोठे रस्ते बांधले. सैन्य उभे केले. पण आमचे पंडितजी असे भिडस्त आणि संकोची वृत्तीचे की, तीन वर्षे काही त्यांना ही बातमी देशाला सांगण्याचे धैर्य झाले नाही. चालले आहे सगळे आनंदात तर चालू द्या; उगीच कशाला लोकांना 'डिस्टर्ब' करा आणि त्यांच्या आनंदात मिठाचा खडा टाका, असा कनवाळू विचार त्यांच्या मनात आला असेल. त्या पार्श्वभूमीवर आमच्या नव्या पंतप्रधानांचे प्रांजळ व्यक्तिमत्त्व किती खुलून दिसते ! अन्न कमी असले तरी उपासमार बिलकुल नाही, हा त्यांचा आत्मविश्वास तर फारच वाखाणण्याजोगा आहे. आणि त्या खोटे थोडेच बोलत आहेत ! उपासमार या देशात होईलच कशी ? दुष्काळ पडेलच कसा ? दुष्काळ पडायला किंवा उपासमार व्हायला आधी खायला-प्यायला भरपूर असावे लागते. खाण्याची चंगळ प्रथम उडत होती आणि आता बुवा तसे काही होत नाही, असे असले तर ती उपासमार. या देशातले लोक पहिल्यापासूनच उपासमारीला असे सोकावलेले आहेत की, आता त्यांची उपासमार आणखी काही नव्याने होण्याची मुतराम शक्यता नाही. माझा तर तर्क असा आहे की, आमच्या लोकांना उद्या भरपूर अन्न मिळू लागले आणि ते फस्त करू लागले तर देशात भयंकर रोगराई निर्माण होण्याची शक्यता आहे. तेव्हा इंदिरादेवींच्या बोलण्यात आक्षेप घेण्याजोगे मला तरी काही दिसत नाही. आम्हाला 'मदत' हवी आहे, पण 'भीक' नको आहे, हे त्यांचे उद्गार तर या देशाला गेल्या अठरा वर्षांतील बाणेदार आणि तेजस्वी परंपरेचेच द्योतक नाहीत काय ? अरे, भीक घ्यायला आम्ही काय भिकारी आहोत होय ? काय आमचे कपडे फाटलेले आहेत का

घाणेरडे आहेत ? काय आम्ही अनवाणी पायांनी हिंडतो ? काय आमच्या मुखावर तुम्हाला फजिती आणि अजिजी दिसते ? छट् ! बिलकुल नाही. आम्ही जेव्हा मदत मागायला जातो, तेव्हा आमचे मंत्री, आमचे राजदूत किती 'पाँश 'मध्ये जातात हे तुम्हाला चांगले ठाऊक आहे. मोटारीशिवाय ते सहसा हिंडत नाहीत. बड्या हॉटेल-शिवाय ते कोठे उतरत नाहीत आणि 'भीक' हा शब्द तर त्यांच्या मुखातून कधी निघतच नाही. किती ऐटीत, किती रुबाबात ते मदत मागतात. त्याला भीक कशी बरे म्हणता येईल ? एखाद्या मित्राकडे जाऊन, त्याचाच चहा पिऊन आपण जेव्हा रुबाबात दहा रुपये उसने मागतो, तेव्हा ती कधी 'भीक' होते का ? नाही ना ? मग झाले तर ! इंदिरादेवींच्या बोलण्यातला मार्मिक आशय आता तुमच्या ध्यानी यायला काही हरकत नाही. अहो, हा सगळा विरोधी पक्षाचा चावटपणा निवडणुकीचे वर्ष आहे ना ? लोक आता काय वाटल ते बोलतील !

## • पुण्यात स्त्री-कंडक्टर्स ?

कळली का तुम्हाला बातमी ? पुण्यातील बसेसमध्ये कंडक्टर म्हणून बायका येण्याची शक्यता दिसू लागली आहे. महापालिकेच्या सदस्य लीलाबाई मर्चंट या परवाच्या सभेत तसा ठराव मांडणार होत्या की, पी. एम्. टी. च्या बसेसमध्ये यापुढे स्त्री-कंडक्टर्स नेमण्यात याव्यात. ठराव पाठवलाही होता म्हणे, पण कंडक्टर म्हणून बायका कितपत काम करू शकतील, त्यात कोणकोणत्या अडचणी निर्माण होतील, याची बऱ्याच मंडळींना शंका दिसल्यामुळे त्यांनी ठराव मागे घेतल्याचे ऐकले. चौकशी केली तेव्हा कळले की, निदान आरामगाडीत तरी स्त्री कंडक्टर्स नेमण्यात यावेत, असा ठराव त्या पुन्हा पाठवणार आहेत. आरामगाडीचा काय अनुभव येतो, तो जरा पाहावा आणि मग पुढे गाडी रेटावी, असे त्यांचे धोरण आहे म्हणून समजले.

बातमी वाचल्याबरोबरच अंगावर आनंदाचे असे गोड काटे आले म्हणता माझ्या ! काही विचारू नका. नुसत्या कल्पनेनेच ते रम्य चित्र डोळ्यांपुढे कसे लख्ख उभे राहिले. महापालिकेच्या सदस्यांचीही कमाल आहे. असल्या चांगल्या गोष्टीत शंका-कुशंका कसल्या काढत बसले आहेत ! खरे म्हणजे पुणे हे सुधारणेचे आगर ( आगरकरांनीच हे 'आगर' बनवले ). असल्या गोष्टी कशा भरभर व्हायला पाहिजेत इथे ! बायकांनी नोकरी करणे ही गोष्ट काही आता नवी राहिलेली नाही. पोस्टात, बँकांत, सरकारी कार्यालयांत, दूध-केंद्रावर सगळीकडे बायका सध्या काम करीतच आहेत आणि भरपूर गोंधळ आणि घोटाळा निर्माण करून सरकारी खात्यांची परंपरा पुढे चालवीत आहेतच ना ? पोलीसमध्येही त्यांनी आपला 'चंचूप्रवेश' केलाच आहे ना ? मग बसेसनीच काय असे घोडे मारले

आहे की, त्यांना तेथे मनाई असावी ? ते काही नाही. आरामगाडी तर तूर्त आरामगाडी. पण ही गोष्ट झालीच पाहिजे !

अहो, कल्पना करा नुसती. कंडक्टराच्या पोषाखात एक रमणीय आकृती उभी आहे. कसे वाटते ? दाढी वाढलेली, मिशा वोडलेला चेहरा जाऊन त्या ठिकाणी घामाने भिजलेला कोमल मुखचंद्रमा आला तर डोळे निवतील की नाही आपले ? एरवी आपण तिकीट काढतही नाही कधीकधी. तसेच दडपून खाली उतरतो अन् एखाद्या संभाविताच्या चालीने चालू लागतो. स्त्री-कंडक्टर आल्यावर असे कधी घडेल काय ? तिला गोड शब्दांत ' उंबऱ्या मारुती ' किंवा ' पासोड्या विठोबा !' असे म्हणून दहापाच पैसे त्या नाजुक हातावर ठेवण्याची संधी आपण कधी गमावू काय ? इतके आपण पुणेकर अरसिक आहोत ? उलट आपण मोड असली तरी सबंध रुपयाची नोट देऊ. पुन्हा एकदा पैशाची देवघेव करू. ' रूप पाहता लोचनी, सुख झाले हो साजणी ' अशातला प्रकार असेल तर आपण दुसऱ्यांदादेखील तिकीट काढू. काय हरकत आहे ? तिकीट न काढता प्रवास करणे हा गुन्हा आहे. दोनदा किंवा तीनदा तिकीट काढणे हा मुळीच गुन्हा नाही बरे. स्टॉप माहीत असला तरी आपण कंडक्टरला विनंती करू—" स्टॉप आल्यावर आम्हाला सांगा हं ! " करू की नाही ?

या महापालिका—सदस्यांना काही कसे कळत नाही. माझ्यासारख्या अडाण्याला पुण्यात राहून राहून जे कळायला लागले आहे, हे या शहाण्या मंडळींना उमगू नये ना ? निदान वाहतूक-खात्याने तरी थोडी दखल घ्यावी. त्यांचाच त्यात फायदा होणार आहे. कंडक्टर म्हणून स्त्रियांची नेमणूक करताना त्यांनी जरा काळजी घ्यावी म्हणजे झाले. मग पाहा काय चमत्कार होतो तो ! ज्या बसेस कधी भरत नाहीत, त्या दुथडी भरून वाहू लागतील. ऐन दुपारीसुद्धा ही गर्दी ओसरणार नाही. काही काम असो अगर नसो, लोक भराभरा बसमध्ये चढू लागतील. काही विशिष्ट नंबरच्या बसमध्ये भलतीच गर्दी होईल. ' बसाना आपण इथं, ' असे म्हणून प्रत्येक सभ्य तरुण नागरिक तत्परतेने उठेल आणि कंडक्टरलाच बसण्याचा आग्रह करू लागेल. ' मोड नाही गडे माझ्याजवळ ' असे बस-सुंदरीने म्हटल्यावर कुणीतरी तक्रार करील काय ? ' थांबा हं आपण. जागा नाहीय् बसमध्ये ', अशी गोड विनंती ऐकू आल्यावर खाली थांबण्यात कृतकृत्यता आहे, असे वाटेल की नाही ? बस-मध्ये इकडेतिकडे हिंडताना कपड्यांचा घामट वास आणि तोंडातील तंबाखूची उग्र घाण याच्याऐवजी स्नो—पॉवडर, सेंटस् यांचा गंध बसच्या गर्दीमधून आपल्या लांब नाकापर्यंत दरवळल्याशिवाय कधीतरी राहील काय ? त्या वासाच्या धुंदीत वाजवीपेक्षा जास्तच प्रवास करावा असे प्रत्येकाला वाटेल की नाही ? मग झाले तर ! पालिकेच्या सदस्यांना एवढ्या साध्या गोष्टी कशा कळत नाहीत ? लीलाबाई ठराव मांडणार आहेत. निदान आरामगाडीला तरी हा लाभ घडू द्या. आता थोडा

हिशेबाचा घोटाळा होईल. पैसेबिसे हरवतील. नको तिथे बस थांबण्याची घंटा वाजेल आणि पाहिजे तिथे मुळीच वाजणार नाही. गर्दी वाढून चेंगराचेंगरी झाली तर डोळ्यांतल्या गंगायमुनाही दिसतील. असल्या काही गोष्टी होतील, पण झाल्या तर झाल्या, ' जनतेची सोय ' त्या मानाने केवढी होईल, याचा काही विचार !

ग्यानबा

---

## नवीन व्याख्या

**कायदा :**

आजकाल ज्याला कोणी भीत नाही व पाळीत नाही तो.

**पुरावा :**

राइएवढ्या सत्यावर रचलेला असत्याचा डोंगर.

**पक्षकार :**

स्वत:चे खोटेसुद्धा खरे व दुसऱ्याचे खरेसुद्धा खोटे असा अट्टाहास करणारा.

**साक्षीदार :**

प्रत्यक्ष वस्तुस्थिती न सांगणारा, पण नसलेली वस्तुस्थिती ठासून सांगणारा.

**न्यायालय :**

शपथेवर खोटे सांगण्याचे एक ठिकाण.

**वकील :**

सोपी व सरळ गोष्ट अवघड व क्लिष्ट करून लौकर न संपेल अशी दक्षता घेणारा.

**न्यायाधीश :**

ज्याला दोन्ही बाजू फसविण्याचा प्रयत्न करतात तो.

**न्याय :**

दोन्ही बाजूंनी निवेदन केलेल्या असत्यामधून निवडलेले कमीत कमी असत्य.

**कनिष्ठ न्यायालय :**

ज्याचा बरोबर निर्णय चुकीचा ठरविता येतो ते.

**वरिष्ठ न्यायालय :**

ज्याचा चुकीचा निर्णय बरोबर मानावा लागतो ते.

**वसंत माजगावकर**

# विचार धारे

समीर

**● अन्नान्नदशा !**

आमची आजची अन्नान्नदशा हा सर्व जगाचा विषय झाला आहे. जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. लास्की यांच्या पत्नीने गेल्या आठवडयात नव्या दिल्लीत भाषण करताना कळवळून म्हटले, "तुम्हाला अमेरिकेकडून १ कोटी ८० लक्ष टन गहू मिळणार आहे. खरं म्हणजे तुम्ही तो स्वत: उगवायला पाहिजे."......परदेशी मदत ही कधीही बिनशर्त नसते. त्यातली अट कधी उघड असते, तर कधी छुपी असते एवढेच. भारताची औद्योगिक प्रगती बरीच झाली आहे, पण खेडयापाड्यांतील अवस्था खूपच सुधारायला हवी. भारताच्या नियोजनात उद्योगधंद्यांना धक्का न लावताही शेतीला अग्रस्थान दिले पाहिजे.

अन्नप्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे लोकसंख्या: "तुमच्या भल्यामोठ्या लोकसंख्येला काय म्हणावे? दर वर्षी १ कोटी १० लक्षांची भर पडणे भारताच्या दृष्टीने चांगले नाही."

एका मोठ्या पश्चिम जर्मन साप्ताहिकाच्या उपसंपादिका डॉ. मेरियन् डॉन्हॉफ या नुकत्याच भारतात येऊन गेल्या. त्यांच्या मतेही हिंदुस्थानात शेतीकडे योग्य ते लक्ष दिले गेलेले नाही. अधिक खत तयार करण्याकडे "फारच थोडे लक्ष" पुरविण्यात आले आहे. "शेतीत अधिक प्रगती करणे तुम्हाला शक्य होते. तुम्हाला परदेशी चलन गव्हावर खर्चावे लागते, ही खेदाची गोष्ट आहे."

हेच मत अधिक तपशिलात एका डच शेतकीतज्ज्ञांच्या मंडळाने भारतभेटीत मांडले. भारताची शेतीविषयक परिस्थिती चिंताजनक असली तरी आश्चर्यकारक नाही. खतांची अत्यंत महाग किंमत, विक्रीतल्या अडचणी आणि तुलनेने धान्याची कमी किंमत या गोष्टींमुळे भाताची उपज वाढविण्यासाठी शेतकऱ्याजवळ साधनही नाही व उत्साहही नाही. त्यातल्या त्यात खतांचा व जंतुनाशक द्रव्यांचा तुटवडा दुय्यम महत्त्वाचा आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाणी-पुरवठा. सबंध वर्षभर पिकांना पाणी पुरविण्याची व्यवस्था झाली तर बहुतेक सबंध देशात एकाच्या ऐवजी दोन पिके काढता येऊन भाताची उपज दुप्पट वाढेल.

चांगली किंमत न आल्यानेही उपज कमी होते. ऊस आणि कापसाच्या लागवडीसाठी वापरलेली बरीच जमीन भातासाठी वापरता येईल. शेतीची परिस्थिती

सुधारायची असेल तर युरोप-अमेरिकेतल्याप्रमाणे धान्याची किंमत मुद्दाम वाढवली पाहिजे. पण भारताच्या एकूण आर्थिक परिस्थितीत ते शक्य नाही.

एका तज्ज्ञाने जोडलेली टीप: उंदरांचा नायनाट करून धान्याची नासाडी थांबविण्यासाठीदेखील येथल्या शेतकऱ्यांना उत्साह नाही. सरकारने दर शेपटीमागे बक्षीस दिले तर मूषकमर्दन होऊ शकेल. इंडोनेशिया व सुरीनाम या देशांत ही युक्ती खूप यशस्वी झाली आहे.

## ● अन्नाहून मोठी गरज–घर

"मी फार चांगली चांगली मुले झोपडयांतून राहताना पहिलेली आहेत. ती प्रकृतीने सुदृढ आहेत, हुशार आहेत व चुणचुणीत आहेत, पण त्यांना आयुष्यात वर येण्याची संधी मिळणार आहे का ? त्यांना राहायला स्वस्त पण नीटनेटकी घरे मिळाली तर सर्व जगाचा खूप फायदा होईल. कारण स्वस्त घर–बांधणी अन्नापेक्षाही अधिक महत्त्वाची बाब आहे," या शब्दांत भारतभेटीस आलेले एक डच-तज्ज्ञ श्री. जॅन व्हॅन एर्टिजर यांनी परवा नव्या दिल्लीत बोलताना आजच्या अनिकेत जनतेची अवस्था वर्णन केली.

घाणेरडया वस्तीत राहणाऱ्या जनतेचे "तुम्ही मन मारीत आहात. या लोकांना आयुष्यात काहीच संधी मिळणार नाही." जर जगात शांती हवी असेल तर सर्व लोकांना आत्मविश्वासाची संधी मिळाली पाहिजे. जगातल्या कोटयवधी लोकांना अशी संधी मिळत नाही. कारण ते 'चुकीच्या' परिस्थितीत जन्मले आहेत.

सर्व जगभर घरांच्या बाबतीतल्या परिस्थितीचे निरीक्षण करून श्री. एर्टिजर यांची खात्री पटली आहे की, आजच्या घटकेची गरज प्रासाद बांधण्याची नसून छोटेखानी घरे बांधण्याची आहे. "आजचे बहुतेक वास्तुकार थोडयाशा सुखवस्तू लोकांसाठी घरे बाधण्यात समाधान मानतात. साध्या माणसांकडे ते फारच थोडे लक्ष देतात." ही वृत्ती बदलली पाहिजे. वास्तुरचनेशी संबंधित लोकांच्या शिक्षणात फरक करण्याची आवश्यकता आहे.

घरांची समस्या केवळ सरकार सोडवू शकणार नाही, पण ती सरकारी मदतीशिवाय सुटणार नाही. त्यासाठी एक देशव्यापी चळवळ आरंभली पाहिजे. फारच थोडयांना परवडतील, असे स्वप्न-महाल न बांधता जागेचा उपयोग आणि खर्चाची बचत या गोष्टींकडे लक्ष ठेवून घरे बांधली पाहिजेत. "पैसा हा काही सर्वात मोठा प्रश्न नाही." सर्वात मोठा प्रश्न आहे तो संघटनेचा. हिंदुस्थानात एतद्देशीय सामग्री व कामगार यांचा पुरेसा पुरवठा आहे; त्यांचा उपयोग करणारा माणूस पाहिजे.

● ● ●

कथा

# कौल

## महादेव मोरे

दुपारची दोनची सुटी झाली, तशी तंबाखूच्या वखारीतल्या बायका भराभर बाहेर पडल्या. डोळ्यांवरील, नाकावरील, तोंडावरील, मानेवरील, छातीवरील, डोईवरील, लुगड्यांवरील तंबाखूची पिवळट तपकिरी धूस झडाझडा झाडीत घराच्या वाटेला भराभरा चालायला लागल्या. तासाभराच्या आत जेवून–खाऊन पुन्हा त्यांना कामावर यायला हवं होतं...काही आता जाऊन जेवण करून मग जेवणार होत्या. काही वचावचा घासभर खाऊन घरात सकाळपासनं सानलेलं धुणं हवेलीजवळच्या तळ्यात धुऊन येणार होत्या. काहींची थानची मुलं भुकावलेली होती, ती त्यांच्या ओढीनं त्या चाट्चाट् पाय उचलीत होत्या...

ह्या घोळक्यातच तानीमावशीही होती. आयुष्याच्या घसारतीला लागलेला तिचा जीव तंबाखूच्या कामाने व धुसकाटाने भुक्याला होता. ती लगालगा पाय उचलू लागली. दहापंधरा मिनिटांच्या अंतरावरच तिचं घर होतं. घर असं फक्त भारदस्त नावच नुस्तं होतं. दोन्ही बाजूंना मातीच्या व दोन्ही बाजूंना कुडाच्या भिंती नि वर पत्रा टाकलेला. आणि तो उडून जाऊ नये, म्हणून त्यावर मोठमोठी दगडं ठेवलेली. या मानाने ते एकुलतं एक दार मात्र थोडं मजबूत होतं इतकंच. असं हे घर होतं. तिचं स्वतःचं. तिच्या नवऱ्याचं... तिचा नवरा ! तो चार वर्षांपूर्वीच वारला होता...तो तंबाखूच्या दुकानात–खळ्यात हमाली करायचा, जुगार खेळायचा व चिक्कार दारू प्यायचा. आणि पुष्कळवेळा दारूच्या पैशासाठी तिच्याकडे मागणी करायचा...तिच्याजवळ पैसेच नसले म्हणून 'नाही' म्हटले की तो मार मार मारायचाही तिला ! तो मेला तेव्हा त्याच्या काळजाला भोकं भोकं पडली होती. दारूच्या अतिरेकाचा परिणाम ! – डॉक्टरांचा निर्णय– नाहीतर तो इतक्या लवकर मरता का ? अजून चाळीशीही ओलांडली नव्हती त्यानं !

दादला मेल्याचं दुःख तिनं मोठ्या कष्टानं पचविलं होतं...तो असून नसून सारखाच होता. मिळकत करायचा ती त्याची त्यालाच पुरेशी व्हायची नाही... शिवाय खायला आणखी तिच्याच डोंबलावर ! ती तंबाखूच्या खळ्याखळ्यांत राबायची. रातपाळ्या, पहाटपाळ्यासुद्धा चुकवायची नाही. इस्वाटा असा तिला

# तानीमावशीनं देवाला कौल लावला. देवाचं उत्तर ऐकून मात्र ती सुन्न झाली.

माहीतच नव्हता. राबण्यासाठीच तर तिचा जन्म होता ! लहानपणी आई-बाच्या येथे आणि लग्न होऊन ह्या गावी आल्यावर तंबाखूच्या खळ्यातल्या धुशीत ! स्वतःच्या मिळगतीवर ती चार पोरांचा व दाल्ल्याचा मार कसा तरी रेटीत आली होती ... दाल्ला आटपला तरी ती खचली नव्हती. सारं काही तिनं पचविलं होतं आणि निमूटपणे पुन्हा राबण्याचीच शिक्षा भोगू लागली होती...

आता पोरंही मोठी झाली होती. थोडी अधिक मिळकत करू लागली होती. थोरला सीताराम तंबाखूच्या खळ्यात हमाली करीत होता. जवळच्याच नात्यातील पोरगी पाहून गेल्याच साली त्याचं दोनाचं चार केलं होतं. पण प्वारच किच्यानप्ट निघालं ! लगीन झाल्यावर काही महिन्यांतच बायकोनं चिथवून ठेवलं अन् वेगळं झालं ! घराच्याच पुढल्या बाजूस एक छप्पर उतरून त्यानं वेगळा संसार थाटला... सीतारामच्या पाठीवरचा मारुती गवंड्याच्या हाताखाली चुन्या-सिमेंटच्या, दगडविटांच्या बुट्ट्या उचलायच्या रोजगारावर जात होता. त्याच्या-नंतरचा यशवंत एका मोटार-वर्कशॉपमध्ये आठवड्याच्या दहा रुपयांच्या पगारावर कामाला होता आणि धाकटा तुकाराम शाळा शिकत होता...

तानीमावशी घराजवळ आली. पाहते तर दार उसतंच पुढं ओढलेलं होतं. फक्त कडी घातलेली होती. सकाळचं कामाला बाहेर पडताना आपण कुलूप घातलं होतं का नाही ? तिला काहीच आठवेना... कामाला लवकर जाण्याच्या धांबड्यात विसरलंही असेल ! असा विचार करीत तिनं कडी काढली, दार ढकलून आत शिरली आणि घरात नजर जाताच तिच्या काळजात चर्र झालं ! 'अय्योऽ देवा !' म्हणत ती मटकन् खालीच बसली. हमसून हमसून रडू लागली ...

घरातली सारी भांडीकुंडी कुण्या मुरट्या चोरट्याने पशार केली होती ! अगदी दिवसाढवळ्या धाड घातली होती ! साऱ्या घरभर सामानाची इस्कटा-इस्कटी झाली होती... कुडाकडंची उतरंड भुईसपाट झाली होती... तिच्यातील काही गाडगीमडकी फुटली होती, काही थोडी शाबूत होती... गाडग्यामडक्यांतील तुरीची डाळ, नाचणं, वरी साऱ्यांची मिसळामिसळ झाली होती... लसूण व कांद्यांनी

साऱ्या घरभर धिंगाणा घातला होता आणि पांढरेपणामुळे ते ह्या साऱ्या वाताहातीत उठून दिसत होते... सणासुदीसाठी घालायच्या नेटक्या वडुत्यांची ट्रंक आदळा-आपट करून उघडण्याचा प्रयत्न झाला होता नि तो अयशस्वी ठरल्याने तसाच सोडून देण्यात आला होता... चुलीजवळच्या मंदनाचंही तळचं एक टरपाल उडालं होतं आणि आतील खरकाटं पाणी साऱ्या स्वैपाकघरात पसरलं होतं... ते आता सुकलं होतं, पण त्यामुळे सारविलेल्या भुईचे पोपडे निघाले होते... सगळीकडे विखुरलेली खरकाटी शितं खाणारं उंदराचं एक पिटुक ती आत आल्याची चाहूल लागताच भर्रदिशी कुडाच्या सांदरीत शिरलं होतं...

रडता रडता तानीमावशीनं सूर धरला. तिचा तळतळाट सुरू झाला... जमिनीवर घसाघस् तळवं घाशीत ती शिव्याशाप देऊ लागली—

" वाटुलं हुंदे हांटच्यांचं ! पीलेगाचा तडाखा आला त्येनला ! येळंच्या येळंला अन्न न्हाई, जेवान न्हाई, तिळतिळ राबून, रगात आटवून, लोकांची तंबाखूची कामं बडवून, तार घालून पै न् पैसा म्या शिल्लक टाकलाता; त्येची भांडी घिऊन सौंसार सजविला हुता ! न्हेनाऱ्यांच्या हातापायांत किडं पडू देत. धिरणी भरू दे त्येनला ! माजा गरिबाचा तळतळाट लागल्याशिवाय न्हाणार न्हाई त्येनला ! ! "

वरचे पत्रे हादरल्यासारखे घर गर्जत होतं. तिच्या आक्रोशाने दुपारचं ते शांत वातावरण अगदी तळापासून ढवळून निघालं......आक्रोश सुरू होताच बाहेरच्या शेवग्यावरचा कावळा भर्रकन उडाला. समोरच्या उकीरड्यावर घुटमळणारी, वचावचा राख उकरणारी कोंबड्याची रवण ' कॉ ऽऽ कॉक्......कॉ ऽऽ कॉक् ऽ ' आवाज करीत दूर पळाली......आणि आजूबाजूची बायाबाप्ये धावून आली......

" काय झालं ऽ ? काय झालं तान्याक्का ? काय ? " सगळ्यांनी एकच गिल्ला उसळवला......

आणि रडत रडत तानीमावशी पहिल्यापासून सारं सांगू लागली, " देवा ऽ घासभर खावावं म्हणून मी ही अशान् अशी आली......दार उघडलं...आत आलो...तर हृचो अशान असा पर्कार...ऽ ! " इ. इ. तानीमावशी सांगू लागली...

बघ्या मंडळीत तर्ककुतर्क निघू लागले...... " दिवसाढवळ्या ही अशी चोरी व्हायची म्हंजे जरा आचटच ! काय म्हंतो ? "

" तर गा ! काळ न्हाई, योळ न्हाई, रात न्हाई तर ध्या दिवसा अशी चोरी व्हाय् लागल्यावर व्हायचं कसं ? "

" आनी हृचे घरबी जरा आडंबढेंगच हाय ! समोर हृचो उच्च वाढल्याला चिक्कू, डाव्या आंगाला ही शिताफळीची, शेवग्याची झाडं......कशी मारामिट्टी झालीया बघा नुसती ! "

" तसं हृचे घरबी आळणीच हाय ! गल्लीतल्या घरांची तोंडं उगवतीकडं, तर हृचेचं मावळतीकडं त्वांड ! आणि असलं हृचे तंबाखूच्या मोसमाचं दिवस—जी ती

कामाला ढासळल्याली. कोण आसतंया ह्या दुपारच्या कारात ! चोरास्नी मग काय चांगलंच साधलं की !! "

"मी म्हंतो ऽ गावात तालेवार मान्सं का कमी हाईत ? ती सारी सोडून नित्राटकी ह्या गरिबाच्या पाठनं का लागावं–ह्या कडू बेन्यांनी ? "

"आपली वैशीच सरळ न्हाई म्हनायची, दुसरं काय ? "

अशा प्रकारे बरीच चर्चा झाली. पुष्कळच ऊहापोह झाला......अलीकडे चोर पुष्कळच 'ट्रेंड' झालेत. हा हा म्हणता तुमच्या डोळ्यादेखत ते तुमची वस्तू सहज लांबवितात. घरात माणसं असली, तरीसुद्धा मोहनजाळं घालतात आणि त्यांना गुंगीत ठेवून हातोहात माल 'गूल' करतात ! एकंदरीत काय ? तर सध्याचे दिवसच हे असे वंगाळ आल्यात् ! म्हागाई ही एक आसली जळाय् लागलीया ! सव्वा रुपय् किलो जुंधळा, दीड रुपया किलो गहू, त्यामुळं लोकं तरपासल्यात, खाऊमाऊ करायला लागल्यात ! तवा ह्या कारातनं गरिबांची काही धडगत नाही !

"....पर ही चोरी कुठल्या बेन्यानं केली ? कोण असंल त्यो माईचा पूत ?"

"मी म्हंतो–उगंच वाडंचार का ? सरळ जावून चिटचामास्तरला इचारावं, त्यो समदं रेघ न् रेघ सांगतोय !."

"त्यापरास पाटणकराकडं जावावं. त्यो असल्या बाबतीत हुकमी सांगतोय..."

असा ज्याने त्याने तानीमावशीला महत्त्वपूर्ण व मौलिक सल्ला दिला......तिचंही डोकं भिरमटून गेलं. 'हे करू का ते करू' असं तिला होऊन गेलं......तिची भूक तर कवाच मरून गेली होती......डोळं पुसत तिरमिरीनं ती उठली......माळावरच्या चिटचामास्तराकडं जाऊ लागली......

"मास्तर हाईत का घरात ?" बाहेरच उभी राहत तिनं हाक मारली.

"काय बाई ? काय म्हणता ?" आतून बाहेर येत मास्तरानं विचारलं.

यावर ती आत शिरली.आपल्या कनवटीची काही नाणी काढून तिनं मास्तरापुढे ठेवली आणि हात जोडत म्हणाली,

"हे बघा मास्तर ऽ, मी अशी ही गरीब– फाटक्या पदराची, फाटक्या हाताची......तंबाखूचं काम उपसून प्वाट जाळणारी .....तर आज दुपारचं जेवाय् आलो नि ध्या दिवसा घरातली सारी भांडीकुंडी कुटल्या चोरट्यानं न्हेल्याली ! आता ह्येला व्हैक म्हणू का व्हणार ? "

"अस्सं झालं का ! "

"व्हय्. तुम्ही जरा बघा पंचांगात–काई दूम, थांगपत्त्या लागतोय का न्हाई त्ये ! "

मास्तराने बराच वेळ पंचांग बघितलं......काही आडाखे बांधले, तोंडाने बरीच अर्थशून्य पुटपुट केली आणि शेवटी सांगितलं —

" मांडी अशी तशी कुटं लांब जायाय् न्हाईत......घीर धर बाईऽ दोन एक दिवसात काय तो तलाश लागेल ! "

एवढं सांगून मास्तराने मौन धारण केले अन् पुढ्यात ठेवलेले पैसेही खिशात सोडले......तशी थोडंफार समाधान होऊन तानीमावशी उठली आणि घराकडं आली......

तोवर एक एक करून तिची सारी पोरंही गोळा झाली होती. सीताराम मकासपणे साऱ्या पसाऱ्याकडे पाहत बसला होता. त्याची बायको जनी हनुवटीखाली हाताचा मुटका देऊन चितागती उभी होती. मारुती बांधकामावरनं तसाच घाबऱ्याघुबऱ्या परत आला होता......मोबाईलने व डिझेलने मेणचट झालेले काळेकुट्ट कपडे तसेच अंगावर असलेल्या अवस्थेत, हातातील काम अर्धवट सोडून, वर्कशॉपमधून यशवंत तसाच धावला होता......आणि धाकटा तुकारामही हातातील पुस्तके गडबडीने सावरीत धांदलीत घराकडे येऊन पोहचला होता......

सारीच धास्तावून गेली होती. आईला येत असलेले दुरून पाहताच साऱ्यांचे चेहरे आणखीन गंभीर झाले......

" काई लागला दूम ? " आई येताच मारुतीने विचारले.

" मास्तरानं सांगितलंय् दोन एक दिवसात काय त्यो छडा लागेल ! "

" मग बघ या झालं – दोन दिवस हालहवाल. ... " सीताराम म्हणाला नि अपेक्षेने आईकडे पाहिलं. " कसं ? "

" बघू या की. माजी कुटं अडकाठी हाय ?"

" त्ये कम्पलेट खरं, पर जेवाण कशात करायचं ? सगळीच भांडी तर . . . . ." यशवंतनं मुद्याचा प्रश्न काढला.

" आणायची मातीची भांडी ! काय करायचं तर मग ? " तुकाराम म्हणाला . . .

मग त्याच दिवशी मातीची ४-५ गाडगी आणली आणि त्यात स्वैपाक होऊ लागला . . . . .

दुसऱ्या दिवसापासून नेहमीसारखी तानीमावशी तंबाखूच्या कामाला जाऊ लागली.....खळ्यातल्या बारा घरच्या बारा बायकांनी अनेक प्रश्न विचारून तिचं डोकं भंडावून सोडलं...... अनेकजणींच्या त्या अनेक प्रश्नांना ती एकटी कशीतरी उत्तरं देऊन वेळ मारून नेत होती......

असेही दोन दिवस गेले. पण कसचं काय नि कसलं काय ! भांड्यांचा काहीच हालहवाला मिळाला नाही.....दूम लागला नाही.....

परत एकदा तानीमावशीसह सारं घर काळजीनं वेढलं.....आता ? काय, कसं ?

चार घरच्या चारजणी जमल्या. कुचूकुचू आवाजात खलबतं झाली.....देवाला कौल तर लावून पाहावा असं ठरलं....

"ते खरं, पर कौल कोंच्या देवाला लावावा?" तानीमावशी चौकशीच्या आवाजात म्हणाली.

"कौल लावायला माप देव हाईत — हिटणीचा मसोबा हाय; गडहिंग्लज-जवळचा काळभैरी हाय, सुरकलीजवळचा घोडंकर हाय......." हिरा जमदाडणीनं माहिती पुरवली.

"खरं तू जायची आसलीस तर घोडंकरला जा पैला." तासगाळचांची आकुबाई म्हणाली, "घोडंकर तितका काई लांब न्हाई, खर्चाबी कमी ईल नि तुजं कामबी हुईल?"

"बरं तर — तसंच करतो. बघू या काय नशिबात लिवलंय्!" तानीमावशी म्हणाली.....

दुसऱ्या दिवशी आयीतवार होता. दिवसही चांगला होता घोडंकराला जायला... तानीमावशी भल्या पहाटचं उठली.....गल्लीतल्या चाव्यांना पाणी सुटलं होतं.... भराभरा पाणी भरून तिनं सारी भराभरती केली.....आंघोळ वगैरे आटोपली.... घरातल्या देव्हाऱ्यावरचे देव पुजले.....स्वयंपाक करून ठेवला.... मग स्वतःसाठी एक–दीड भाकरी, झुणका, कांदा इ. दुपारचं जेवण बांधून घेऊन ती बाहेर पडली....एस्. टी. स्टँडकडे आली.....

अर्धापाऊण तासातच कोल्हापुराकडून आलेली व मुरगूडकडे जाणारी गाडी तिला मिळाली....आणि थोड्याच वेळात गाडी मुरगुडच्या रस्त्यावर धावू लागली..... अर्जुननगरचं जनता कॉलेज, गायकूरवाडी, निगनूर भराभरा मागे पडलं. खडकेवाडा आला. तिथल्या चिकुत्रा नदीवरून गाडी जाताच भक्तिभावाने तिने हात जोडले.... मग हमीदेवाडा तिट्ठा मागे पडला.....सोनगं, कुरुकली गावंही मागे टाकली गेली आणि काही वेळ गाडी तशीच पुढे धावली. थोड अंतर चालून जाताच कंडक्टरनं घंटा वाजवली —

"घोडंकर कोण हाय — उतरा!"

तशी तानीमावशी उठली, खाली उतरली....परत घंटा वाजली नि सायलन्सर पाइपमधून धुराचा मुशींडा टाकीत गाडी निघून गेली....

त्या दिशेनं तानीमावशीनं पाहिलं. तेथून पुढे थोड्याच अंतरावर सुरुकली गाव होतं. कुरुकली व सुरुकली गावामध्ये घोडंकरचा तिठ्ठा होता. तेथे एक वगळ होती. वगळावर एक छोटासा पूल होता. पुलाच्या पूर्वेस एका झाडाखाली मसोबा होता आणि त्याच्या खालअंगाने वगळाला लागून अशी बैलगाडीची वाट गेली होती..... बैलगाड्या जाऊन-येऊन खोल खोल अशा चाकोऱ्या पडल्या होत्या..... येथून २-३ फर्लांगावरच दक्षिणेकडल्या बाजूस सह्याद्रीचा एक फाटा खुळ्यासारखा इकडे येऊन वाट चुकला होता....त्याच्यावरच घोडंकराचं देऊळ होतं. देवळाच्या पुढली नि आजूबाजूची पांढऱ्या चाफ्याची झाडं येथूनही दिसून येत होती.....

रस्त्याकडेच्या मसोबाला दंडवत घालून तानीमावशी गाडीवाटनं घोडंकराकडे निघाली.....

डोंगरावरच्या देवळाजवळ ती पोहचली, तेव्हा दिवस बराच वर चढला होता.... साडेअकरा–बाराचा सुमार होत आला असावा..... नमस्कार करीत ती देवळात शिरली. आत जाऊन तिनं देवापुढं लोटांगण घातलं.....सोबत आणलेला निवद, नारळ, कापूर देवापुढे ठेवला. कनवटीचे काही पैसेही ठेवले.....आणि मग एका खांबाला टेकून, हात जोडून, देवाकडे एकटक पाहत बसली.....

देवळापासून आठ-दहा पावलांवर उजव्या बाजूला पुजाऱ्याचं छोटंस घर होतं.... देवळात कुणीतरी भक्त शिरल्याचं दिसून येताच उजव्या हाताच्या छोटया दारातून तो आत आला..... त्यानं देवापुढे ठेवलेले पैसे घेतले, निवद घेतला, कापूर लावला आणि नारळ फोडला... तशी तानीमावशी सावचित्ताने बसली व तसेच हात जोडून पुजाऱ्याला म्हणाली,

" कौल लावायचा हुता गा ऽ देवाला....."

" कशाबद्दल बाई ऽ ?" पुजाऱ्याने चौकसपणा दावला.

यावर तानीमावशीला घडलेलं सारं सांगावं लागलं....ह्यात आणखी बराच वेळ गेला. लांबण लावीत, विषयांतर करीत तिनं ती हकीकत सांगितली.....शेवटी म्हणाली,

".....हे आसं सगळं झालं बग बाबा !" आणि मघापासून वाहणारे डोळे पदराने पुशीत ती म्हणाली, " माजं ह्ये आसं हातावरचं प्वाट. माजी सारी राबणूकच इनारथी झाली न्हवं..... पै न् पैसा साठवून की रं समदी भांडी घेतली हुती लेकरा ! कुण्या हांटचाचं काळीज झालं आसंल माजी गरिबाची चोरी कराय ? तवा कौल लाव बाबा – बघू या तर घोडंकराचं काय म्हन्नं हाय.... भांडी गावतील का न्हाई ते तरी समजून यिल....."

" पर मौसी, आत्ता कौल लागत न्हाई–सांजपतोर थांबाय् पायजे ... आत्ता सजान् सज आलीयासच. जेव, खा नि इस्वाटा घे जरा–हुईलच तौपतोर सांज !"

" वरं बाबा ... " म्हणत तानीमावशी गुढघ्यावर हाताचा रेटा देऊन उठली. पुजाऱ्यानं ठेवलेलं नारळाचं अर्धं भकाल तिनं घेतलं नि देवळाबाहेर आली.

देवळाबाहेर ७–८ पांढऱ्या चाफ्याची व ३–४ चिंचेची झाडे होती ... ती एका चिंचेच्या झाडाखाली बसली. चिंचेचा मोहर, वाळलेली पाने व काटक्या झाडाखाली पडल्या होत्या. तिनं जागा थोडी साफसूफ केली व खाली बसली ... तिच्याप्रमाणे देवाला आलेली ५–६ भक्तमंडळी आजूबाजूच्या झाडाखाली बसली होती. एका कुटुंबवत्सल गृहस्थाची दोनतीन मुलेही आली होती. त्यांनी पांढऱ्या चाफ्याची फुले कानांवर ठेवली होती. एक काटकी घेऊन त्यात फुले टवून माळ बनवत होती. डाव्या बाजूस असणाऱ्या एका चिंचेखाली कोंबडं कापलं होतं. त्याची पिसं आजूबाजूला

विस्कटली होती आणि मास दगडावरच्या एका चुलीवर रटरटत होतं. देवळाच्या उजव्या बाजूस असणाऱ्या त्या पांढऱ्या चाफ्याखाली एक पारकट्टा होता आणि तो अनेक लाकडी हातांनी, पायांनी व घोड्याच्या आकाराच्या मुंडक्यांनी भरून गेला होता. खळ्यात तिवड्याभोवती धान्याची रास लागावी, तशी हातांची, पायांची व मुंडक्यांची एक रासच लागली होती. पारकट्यावर घोडंकराला अनेक प्रकारच्या अनेक भक्तांनी मागून घेतलेल्या नवसाची ती सांगता होती. 'देवा, माजा पाय मुरगाळलाय् व सुजलाय्. लौकर बरं कर–की तुज्या दर्बारात पाय टाकतो लाकडाचा नि कोंवडंबी देतो तुला!' असा नवस असल्यावर त्या ढिगाऱ्यात आणखी एक पाय येऊन पडत होता. तसंच हातांचं, मुंडक्यांचं...

तानीमावशी थोडा वेळ उगीच बसून राहिली. मग तिनं शेजारच्या झाडाखालच्या एका बाईला विचारलं,

"आक्कासाब ऽ–हितं पानी कुठं मिळंल, प्याला ?"

तिच्या त्या 'आक्कासाब'नं हमिदवाडाकडील गाडीवाटंकडं बोट दाखवीत म्हटलं,

"त्या बघ तिकडं–हमदंवाड्याकडं ते उंच टेकाड दिसतंय् न्हवं; तितं हाय पान्याचा झरा!"

"इत्क्या ऽ लांब!" तानीमावशीला आश्चर्य वाटलं. "हितं जवळपास कुटं...?"

"देवळाच्या मागल्या आंगाला डबरा हाय योक, पर त्येचं पानी पित न्हाईत. घाण हाय..."

एक सुस्कारा टाकल्यागत करून तानीमावशी गप्प बसली. भाकरीचं गटरं तिनं सोडलं आणि मुकाटपणे भाकरी खाऊ लागली... भाकरी खाऊन संपल्यावर मग ती पाणी प्यायला झऱ्याकडे जाणार होती...

हा हा म्हणुस्तवरका दुपार कलंडली. झाडांच्या सावल्या लांब लांब पूर्वेला गेल्या. जेवून झाल्यावर झाडाच्या सावलीत लवंडलेल्या तानीमावशीच्या डोळ्यांवर उन्हाची तिरीप पडली, तशी तिला जाग आली. तशीच ती उठली. झऱ्याकडे जाऊन चूळ भरून, पाणी पिऊन आली. देवळात गेली. पुजारी अद्याप देवळात आला नव्हता. तो येईपर्यंत ती बसून राहिली–देवाकडे पाहत... आत एका भल्या मोठ्या दगडाला लाल शेंदूर फासलेला होता. समोर दोन्ही बाजूस दोन समया तेवत होत्या आणि घोड्यावर बसलेली अनेक लहानसहान दैवकं होती... समोरच टांगलेल्या घंटा नि वरच टांगलेले दोन ढोल – मोठे.

काही वेळ असाच गेला आणि मग पुजारी आला. तशी तानीमावशी म्हणाली,

"लावतासा व्हय हो कौल ?"

"लावूया म्हंतासा ?"

"व्हय. म्हंजे मला परताय् बरं..."

"लावूया हं. बसा."

मग पुजाऱ्यानं तांदूळ मंतरलं आणि घोडंकराच्या डोक्यावर ठेवलं. कौल लावला. तशी तानीमावशीही हात जोडून बसली... असा बराच वेळ गेला, पण काहीच कौल मिळेना. डावंही पडेना, उजवंही पडेना... तानीमावशीचं मन माटमुट् करू लागलं...कौल का लागंना ? का लागंना ? – असाही आणखी काही वेळ गेला...

तशी तानीमावशी तळमळून बोलू लागली,

" का रं देवा ऽ का दिनास कौल ? काय माज्या हातनं चुकी झालीया बाबा ? काय म्या पाप केलंय् ? दे देवाऽ दे–कौल दे ! " आणि एकाएकी ती गप्प बसली– डोळ्यांत पाणी भरत, पुसत ...

आणखीही थोडा वेळ गेला... तरीहो कौल पडेना... मग न राहवून शेवटी पुजारी म्हणाला,

" अक्काऽ, आज काई लागंना कौल. काय द्येवाच्या मनात हाय समजंना ! त्येचं निवदावर चित्त गेलंय्... निवद याच्या आदी याय् पायजे हुतीस म्हंजे कौल लागला असता. सोमारी, शुकीरवारी हितं रगात सांडत ऱ्हाई. तवा त्या दिशीबी कौल लागतोय्... बघ, तुला याय् जमलं तर ! "

निराश मनाने तानीमावशी उठली. परत एकदा पाया पडून कपाळाला अंगारा लावून घेतला आणि परतीची वाटचाल चालू लागली... तिठ्ठ्यावर आल्यावर मग आणखी काही वेळ निघून गेला... अन् मग बऱ्याच वेळाने राधानगर-मरगूड-कडून एक एस्. टी. आली. तिनं हात उंचावला. गाडी थांबली. ती आत बसताच परत धावू लागली...

तानीमावशी घराजवळ आली, तेव्हा दिवेलागण झाली होती... घरापुढलं लांबट अंगण ओलांडून ती दाराकडं जाऊ लागली... एवढ्यात वेगळं राहिलेल्या थोरल्या लेकाच्या खोपटातनं येणारं कुचूकुचू बोलणं तिच्या कानांवर पडलं... आपसूकच तिचं चित्त सावध झालं... बाहेर कुडाकडंला उभी राहून, कान देऊन ती ऐकू लागली... आता तिचा ल्योक व सून खूपच रंगात आली होती....

" ... म्हंजे आज घोडंकराला गेलीया जनू ? " सीताराम विचारीत होता.

" व्हय्. कौल लावायला गेलीया ! " सुनेचा उपरोधी स्वर.

" लाव म्हणावं–कौलच लावत बस द्येवाला ! " चिरडीच्या आवाजात सीताराम म्हणत होता– " आयलाऽह्येच्या, येगळं व्हायच्या येळंला सरळ वाटणी दिनात ! करायचं काय मान्सानं मग ? तवा खाजीवलं डोस्कं नि मारला डल्ला भांड्यावर ! बसा म्हनावं बोंबलत ! हा: हा: हा:ऽ ! "

" हा: हा:ऽ हाऽऽ ! "

आत दोघं गदगदून हसत होती ... हसत होती ... आणि इकडं तानीमावशीला पृथ्वी फिरल्याचा भास होत होता... गरगर फिरल्याचा भास होत होता... ! देवानं तर हा कौल दिला नाही ? देवानं तर...? ●

## श्री. ब. मो. पुरंदरे

यांची नवी ऐतिहासिक कादंबरी


# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २



# त्याचा मृत्यू निरर्थक नव्हता

अनुवादक

शाम तारे

अँडी

" Sorrowful as it shall always be, we know that Andy's death along with his companions James and Michael, will always inspire those who believe in equality and dignity of men. They died because they wanted a better world where men do not kill because they differ in race, religion or political ideologies.... "

" . . . अत्यंत दुःखद असूनसुद्धा अॅन्डी आणि त्याच्या जेम्स् आणि मायकेल या दोन मित्रांचे मृत्यू हे मानवाची उच्च विचारसरणी आणि समता यांच्यावर विश्वास असणारांना प्रेरक शक्ती म्हणून मार्गदर्शन करतील असा मला विश्वास वाटतो. . . . "

स्वतःच्या मुलामध्ये वर्णद्वेषाच्या या मुक्तिसंग्रामात भाग घेण्याची अभिरुची जोपासणाऱ्या विसाव्या शतकातील एका आईचे . . . मिसेस् कॅरोलिन् गुडमन यांचे हे उद्गार !

वीस वर्षांचा अँन्ड्र्यू गुडमन आणि त्याचे दोन मित्र, मायकेल श्वर्नर (२४) आणि जेम्स् चॅनी (२१), मतदानांतून स्वातंत्र्य मिळू शकतं, या कल्पनेच्या पुरस्काराला पाठिंबा देण्यासाठी न्यूयॉर्क येथून मिसिसिपीच्या राज्यात येऊन दाखल झाले. या विद्यार्थ्यांच्या तेथील कार्यक्रमाचा एकच उद्देश होता—मागासलेल्या निग्रो लोकांना—समाजाला—मतदानाचा हक्क मिळवून देणे. त्यांचं हे उद्दिष्ट सफल होण्यासाठी त्यांनी अहिंसेचा अन् शांततामय सत्याग्रहाचा अवलंब केला.

. . . आणि निग्रो समाजाला मतदानाचा हक्क मिळवून देण्याकरिता झालेल्या सत्याग्रहातली एकवीस जून एकोणीसशे चौसष्ट ही एक काळरात्र . . . ! . . . ह्या रात्रीच्या शेवटल्या तासात मिसिसिपी राज्यातल्या एका निर्जन रस्त्यावर ह्या तिघा तरुणांना जाणूनबुजून ठार मारण्यात आलं. . .

त्या तिघा विद्यार्थी—तरुणांपैकी अँन्ड्र्यू गुडमनची त्याच्या आईनं लिहिलेली ही कथा. . . 'My son did'nt die in vain' या नावानं ती 'Good Housekeeping' या अमेरिकन मासिकात प्रथम प्रकाशित झाली.

या कथेच्या अनुवादाची परवानगी देताना श्रीमती गुडमन यांनी लिहिलं आहे . . .

"...I know that others have gained in strength from Andy's life and wish to honor his memory. The most profound and lasting memorial to him is the continuation on an ever-increasing scale of those activities for peace and human dignity which he held so dear...."

"...अँन्डीच्या जीवनापासून अनेकांचा धीर वाढला आहे. शांतता आणि मानवी मूल्ये यांच्यासाठी चाललेली धडपड भव्य आणि चढत्या—वाढत्या स्वरूपात सुरू ठेवणं हेच अँन्ड्रीचं सुयोग्य आणि चिरकालीन स्मारक होणार आहे. . . . . कारण हीच तत्त्वं त्यानं जिवापाड जतन करून ठेवली होती . . ."

# त्याचा मृत्यू निरर्थक नव्हता

• • •

शुक्रवार १९ जून, १९६४. आनंदोत्सवाचा अन् तेवढाच दहशतीचा दिवस. त्याच दिवशी दुपारी अमेरिकन काँग्रेसने मुलकी हक्कांचा कायदा संमत केला होता आणि त्याच रात्री सेनेटर एडवर्ड केनेडींना एक विमान–अपघात झाला होता. या दोन घटनांच्या संमिश्र वातम्या सारख्या कानावर येत होत्या; आणि त्यांतच आमचा ' अॅन्डी ' त्याच रात्री मिसिसिपीला जाणार असल्याचं त्यानं फोनवर मला सांगितलं होतं. त्यानं घाईघाईतच निरोप दिला होता. त्यांच्या गटापैकी काही मोटारी अगोदरच मिसिसिपीमध्ये सुखरूप पोचल्याचं त्यानं मला सांगितलं होतं. त्याच्या बोलण्यावरून तो अतिशय आनंदात असावा, हे स्पष्ट होतं. तरी त्याचा आवाज मला एखाद्या युद्धकालीन लष्करी संभाषणासारखा वाटला. माझी उत्सुकता वाढली होती.

रविवार हा अॅन्डीचा मिसिसिपीमधला पहिला पूर्ण दिवस असणार होता. त्या दिवशी संध्याकाळी मी अन् बॉब् (अॅन्डीचे वडील) आमच्या एका मित्राकडे वाढदिवसाच्या मेजवानीला गेलो होतो. पण माझं मात्र अॅन्डीच्या काळजीमुळे कशातच लक्ष लागत नव्हतं. साधारण ११ वाजताच्या सुमाराला आम्ही घरी आलो असू. मी त्या दिवशीची वर्तमानपत्रे चाळली अन् झोपायला म्हणून उठले; पण मला मुळीच झोप येत नव्हती. अत्यंत अस्वस्थ असल्यासारखं वाटत होतं. अर्धवट झोपेत असतानाच कसल्यातरी भयानक जाणिवेनं मी जागी झाले. तशीच उठून मी दिवा लावला अन् का कुणास ठाऊक, मी घड्याळही बघितलं. घड्याळात बारा वाजून पंचवीस मिनिटं झाली होती. (या वेळी मिसिसिपीमध्ये १०·२५ झाले असावेत. याच वेळी अॅन्डी अन् त्याच्या मित्रांना अटक केल्यानंतर सोडून देण्यात आलं होतं. कदाचित ह्याच दरम्यान त्यांचा खून झाला असावा·) माझ्या दचकून उठण्याच्या या घटनेला मी काही विशेष महत्त्व देते असं नाही. पण अशा प्रकारचा अनुभव निदान त्या वेळेपर्यंत तरी मला कधीच आला नव्हता...अन् तो पुन्हा न यावा, येणार नाही, अशी मी सारखी प्रार्थना करतेय्.

अखेर केव्हातरी मला झोप लागली होती. मी जागी झाले ती फोनच्या घंटीमुळं. या वेळी सकाळचे अडीच वाजले होते. एका मुलीच्या आवाजानं अॅन्डी आणि त्याचे दोन मित्र रविवारी दुपारी चार वाजेपासून बेपत्ता असल्याचं मला सांगितलं.

त्यानंतरच्या चोवीस तासांची आठवण म्हणजे केवळ एक अंधुक चित्रपट आहे. त्यात फोनची सारखी वाजत राहणारी घंटी, वर्तमानपत्रे आणि टेलिव्हिजन यांचे

वार्ताहर आणि समाचारासाठी येणाऱ्या असंख्य मित्रांचे चेहेरे, याशिवाय काहीही आठवत नाही......अपुऱ्या माहितीचे......काळजीचे ते चोवीस तास अतिशय कठीण गेले. सोमवारी रात्री मी अन् बॉब् आमच्या दोघा मित्रांना भेटलो. श्री. मार्टिन पॉपर आणि हेन्री वूल्फ हे दोघेही कायदेपंडित आहेत. बेपत्ता झालेल्या या विद्यार्थ्यांना शोधण्यासाठी सर्व खटपट केली जात आहे, याची खात्री करून घेण्यासंबंधी आम्ही त्यांच्याशी बोललो. आमच्या चर्चेतून निष्पन्न झालेला निर्णय थोडा धाडसाचा होता. आम्ही ठरवलं की, या प्रकरणात प्रत्यक्ष अध्यक्ष जॉन्सन यांनी स्वतः लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आमच्या मित्रांनी एक क्षणही न दवडता काही फोन केले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मी, बॉब्, श्री. पॉपर आणि नाथन् श्वर्नर (मिकी–मायकेल श्वर्नरचे वडील–मिकीसुद्धा बेपत्ता झाला होता.) असे चौघे वॉशिंग्टनच्या वाटेवर होतो. वॉशिंग्टनला पोचल्याबरोबर आम्ही आमच्या विभागाच्या प्रतिनिधींना भेटलो आणि त्यांनी आम्हाला डेप्युटी ॲटर्नी जनरल श्री. निकोलस कॅझेन्बाश याच्याकडे नेले.

श्री. कॅझेन्बाश यांनी ताबडतोब त्या वेळचे ॲटर्नी जनरल रॉबर्ट केनेडी यांच्याशी आमची मुलाखत करूण दिली. आम्ही अध्यक्षांचे सल्लागार श्री. ली. सी. व्हाईट यांच्याशी मुलाखतीची वेळ ठरविण्यास जात असतानाच कुणीतरी येऊन, " अध्यक्ष आताच तुमची भेट घेतील," अशी सूचना दिली अन् आम्हाला अध्यक्षांच्या खोलीत नेण्यात आले.

अध्यक्ष जॉन्सन टेलिफोनवरून काही संभाषण करण्यात गुंतले होते. 'त्यांची मोटार सापडली,' असंच काहीतरी ते फोनवरून सांगत होते.

मी कुठे आहे, ते विसरून मला पुढे धावत त्यांच्या टेबलाजवळ जाऊन विचारावंसं वाटत होतं, " लवकर सांगा ! ह्या मुलांचं काही बरंवाईट तर झालं नाही ? "

" आणखी माहिती मिळाल्यानंतर मला ताबडतोब कळवा," असं बोलून अध्यक्षांनी हातातला रिसीव्हर खाली ठेवला आणि ते आमचं स्वागत करण्यासाठी उठून उभे राहिले. अध्यक्ष इतके उंच असतील, याची मला कल्पनाच नव्हती. मी आश्चर्यचकित झाले होते. जेव्हा हस्तांदोलनासाठी त्यांनी हात पुढे केला, तेव्हा नेहमी छायाचित्रात दिसणाऱ्या अध्यक्ष जॉन्सनपेक्षा मला ते अतिशय निराळे वाटले...वाटलं की...हा गृहस्थ आपल्या ॲन्डीच्या दुर्घटनेशी अत्यंत संवेदनाशील आहे...मी खात्रीनं सांगू शकते की, कुठल्याही आईला, कुणीही निदान या बाबतीत तरी फसवू शकणार नाही.

पोलिसांना ती स्टेशन–वॅगन सापडली होती. याच स्टेशनवॅगनमध्ये ही मुलं सर्वात शेवटी पाहिली गेली होती. पण ती स्टेशनवॅगन पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती आणि उष्णतेमुळे तिच्या आतमध्ये शोध घेणे अजून शक्य झालेले नव्हते. त्या मोटारीत या मुलांची कदाचित राखरांगोळी झाली असेल, या

कल्पनेनेच माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली. मी कदाचित दचकलेही असेन. अध्यक्षांनी मला दिलासा देत म्हटलं होतं, "आम्हाला शक्य तेवढं सारं आम्ही या बाबतीत करणार आहोत."

अध्यक्षांनी मला अत्यंत धीर दिला होता. त्यांच्या प्रत्येक शब्दातून त्यांची संवेदना व्यतीत होत होती–त्यांना स्वतःला या घटनेबद्दल जिव्हाळा असल्याचं दिसत होतं...त्यानंतर तीन तासांनी आम्ही न्यूयॉर्कमधील मित्रांचा गराडा पडलेल्या आमच्या घरी येऊन पोचलो, तेव्हा व्हाईट हाउसमधून दोनदा फोन आल्याचं समजलं......आणखी पाच मिनिटांतच फोनची घंटी पुन्हा खणखणली. या वेळी अध्यक्षांचा आवाज मी ऐकला. पोलिसांनी मोटारीत शोध घेतल्याचं अन् त्यामध्ये ही मुले नसल्याचं त्यांनी मला सांगितलं......कदाचित अॅन्डी अन् त्याचे मित्र जिवंत असण्याचा संभव होता.

नंतरचे ४४ दिवस आम्ही इतर सर्व कल्पना असूनही याच आशेवर काढले होते. आशेचा किरण दाखविणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे मी प्राणपणानं आकर्षित होत असे. एकदा टेलिफोनवर एका माणसाच्या आवाजानं, "अॅन्डी ब्रूकलिनमधल्या एका हॉटेल-मध्ये असून, पंधरा हजार डॉलर्स दिल्यास त्याला परत केलं जाईल," अशा शब्दांत मला निरोप दिला होता. तो पुन्हा फोन करणार होता. त्यानं परत फोन केला, तेव्हा आम्ही त्याला अॅन्डीला विचारून त्याच्या आजोबांचं आणि आत्याचं टोपणनाव कळवायला सांगितली. कंटाळवाण्या सुरात त्यानं फोन बंद केला होता. पुन्हा त्यानं फोन केला अन् रागातच तो म्हणाला, "जर माझ्या वडिलांना माझ्यापेक्षा ही रक्कम जास्त वाटत असेल, तर मी कुठल्याही प्रश्नाला उत्तर द्यायला तयार नाही, असे अॅन्डी म्हणतो." अर्थातच ह्या आशेवर विश्वास ठेवण्यात काहीच अर्थ नव्हता.

एक दिवस अॅन्डीच्या नाटकात कामे करणाऱ्या मित्रांचा संच आम्हाला भेटायला आला. त्यांपैकी एक निग्रो कलाकार मला धीर देत म्हणाला, "मी सांगतो तुम्हाला, अॅन्डी जिवंतच असला पाहिजे. ते गोऱ्यांना तरी खचितच ठार मारणार नाहीत." त्यानंतर अनेक दिवस ह्याच एका विचारानं माझा पिच्छा पुरवला होता. पण अॅन्डीच्या रंगामुळे समाधान किंवा शांती शोधू लागणाऱ्या माझ्या मनाचा मीच द्वेष करू लागले होते आणि तरीही पुनःपुन्हा मनात विचार येई, 'खरंच, ते गोऱ्यांना ठार मारतील का?' आणि मीच म्हणायचे, 'मुळीच नाही.' पण पुन्हा विचारांचं तुंबळ युद्ध सुरू होई आणि मला वाटे, 'कदाचित खरंही असेल; ते गोऱ्यांनासुद्धा ठार मारतील.'

एक दिवस मी जोनाथन् (माझा मोठा मुलगा) ला म्हणाले, की अॅन्डीचा मृत्यू झाला आहे, हे आपल्याला मान्य करावं लागेल. पण जोनाथन्‌ला ते पटलं नव्हतं. "आपल्याला काहीच माहिती नसल्यामुळे आपण असं म्हणू शकत नाही," असं तो विश्वासानं म्हणाला होता.

चार ऑगस्टला बॉबचा वाढदिवस होता. त्या रात्री आम्ही मित्रांच्या अत्याग्रहावरून लिंकन सेंटरमधील एका कार्यक्रमाला जायचं ठरवलं होतं. ॲन्डीच्या घटनेनंतर सर्वसाधारण जगात येण्याचा हा पहिला प्रयत्न आम्ही करीत होतो. त्या घटनेची तीव्रता विसरायचा हा प्रामाणिक प्रयत्न होता आमचा.

कार्यक्रम सुरू होऊन काही मिनिटेच झाली असतील, इतक्यात थिएटरच्या दारातून एकजण बॉबला इशारा करून बोलावीत असलेला मी पहिला..... ॲन्डीबद्दलची बातमी आली असावी असं मला एकदम वाटलं. त्या माणसाच्या निर्विकार चेहेऱ्यावरचे ते गूढ भाव तीच बातमी दर्शवीत होते.

टॅक्सी करून घरी परत येत असतानाच त्यानं आम्हाला सारी हकीकत सांगितली होती. डॅव्ही (माझा लहान मुलगा) घरी एकटाच असताना व्हाइट हाउसमधून फोन आला होता. ॲन्डी आणि त्याच्या मित्रांची प्रेतं सापडल्याचं फोनवरून सांगण्यात आलं होतं. डॅव्हीनं एका मित्राला आम्हाला बोलवायला म्हणून पाठवलं होतं.. ...

मी घरी आले. डॅव्ही समोर बसला होता. मी डॅव्हीकडे बघितलं.. त्यानं नजर वर केली.. शब्द फुटण्याइतका अवसर मिळायच्या आतच त्यानं मला घट्ट मिठी मारली...आमच्या दोघांच्याही तोंडातून शब्द फुटत नव्हता...आसवांच्या सरीवर सरी ओघळत होत्या...आश्चर्य आणि आशा यांचा एक प्रदीर्घ प्रवास समाप्त झाला होता...सारं काही संपलं होतं...पुन्हा कधीही न मिळण्यासाठी......

व्हाइट हाउसमधला एक प्रवक्ता मला अन् बॉबला म्हणाला होता, "मिसीसिपीची ही दुर्घटना म्हणजे मुलकी हक्कांबद्दलच्या झगडयाला मिळालेली एक कलाटणी आहे. मुक्ततेच्या आंदोलनात यापेक्षा कितीतरी कमी यश पदरात पाडण्यासाठी कधी कधी हजारोंचे प्राण देण्याची पाळी येते." पण व्हाइट हाउसमधून हा संदेश मिळण्याअगोदरच मला ॲन्डीनं अन् त्याच्या मित्रांनी केलेलं बलिदान अनाठाई नव्हतं, असं वाटत होतं. ॲन्डी अन् त्याचे मित्र बेपत्ता झाल्यानंतर काही दिवसांनी मला आलेल्या पत्रात आमच्या एका मित्रानं लिहिलं, "मी नैजेरियात असताना ही बातमी ऐकली. मी नावं ऐकली नव्हती; पण मला स्वतःला निग्रोविरुद्ध भयंकर कायदे केलेल्या एका श्रीमंत देशातला असूनही स्वतःचाच संशय येऊ लागला... आणि नंतर तीन अमेरिकन तरुणांच्या निर्घृण हत्येची ती भयंकर बातमी आली. क्षणार्धात सारं काही पार बदलून गेलं. संपूर्ण राष्ट्र त्या वार्तेच्या दाबाखाली होतं. त्या मुलांची नावं मुळीच महत्त्वाची नव्हती, पण प्रत्येकाला दोन गोरे आणि एक काळा, असे विद्यार्थी एकमेकांबरोबर मरण पत्करताहेत, हे माहिती होत होतं. प्रत्येकजण मला आवर्जून सांगत होता—

"गोरे लोक काळ्या लोकांबरोबर अशीही जबाबदारी पत्करतात, हे आम्हाला खरोखरच माहिती नव्हतं—माहिती नव्हतं."

आफ्रिकेतूनच नव्हे,तर मिसिसिपीमधून आलेल्या पत्रांतूनसुद्धा असाच सूर निघत होता. फिलाडेल्फियातून आलेल्या पत्रांत एका आईनं म्हटलं होतं, " आमच्या शहराच्या इतक्या जवळ अशी घटना घडावी, हे अजूनही मनाला पटत नाही. सुन्न होऊन बसण्यापलीकडे इलाज चालत नाही......पण मला हे समजत नाही, की अ‍ॅन्डीसारखी ही समाजस्थिती सुधारण्याची तळमळ असलेली मुलं न्यूयॉर्क सोडून मिसिसिपीपर्यंत का येतात ?......पण हा प्रश्न आपल्या मनाला शांत करू शकणार नाही, असं मला वाटतं...आपली मुलं वयानं अन् बुद्धीनं वाढत असतात. त्यांनी एकमेकांच्या अनुभवांची देवघेव-अर्थातच शांततेनं—का करू नये ?—मग त्यांचे विचार खुशाल निराळे असोत. "

या तीन विद्यार्थ्यांच्या मृत्यूनं केवळ प्रामाणिक गोऱ्यांच्याच मनात घर केलं असं नाही, तर एकांतवासातील आपल्या 'गेट्टो 'मध्ये राहणाऱ्या निग्रोंच्यादेखील मनात त्यांनी कायमची जागा घेतली. उत्तर कॅरोलिनामधून आलेल्या अशाच एका पत्रातला भाग मी उद्धृत करते.

" आपल्या अ‍ॅन्डीनं उगाचच बलिदान नाही केलं ... पण केवढी किंमत दिली त्यानं आपल्या आयुष्याची ... मी तुम्हाला टेलिव्हिजनवर बघताच माझ्या मनात आलं, " आम्हाला मदत करणारे हे लोक अमेरिकन आहेत, ही गोष्टच केवढी आनंदाची आहे ... गोरे अमेरिकन — जे द्वेषाऐवजी प्रेम वाढविण्यात गुंतले आहेत असे ... "

अ‍ॅन्डीच्या या बलिदानाची कथा गेल्या उन्हाळ्यातल्या एका संध्याकाळी सुरू झाली. मी, बॉब अन् अ‍ॅन्डी संध्याकाळचं जेवण करीत असताना गप्पा मारीत होतो. अ‍ॅन्डी हा न्यूयॉर्कच्या क्वीन्स् कॉलेजचा विद्यार्थी. तो त्याच्या कॉलेजमधील काही सभांविषयी माहिती सांगत होता. या सभा Student Nonviolent Co-ordinating Committee–SNCC–किंवा स्निक् या नावानं ओळखल्या जाणाऱ्या एका समितीमार्फत होत असत. या समितीतर्फे एका उन्हाळी कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाचे उद्देश ते धाडसाचे होते म्हणून नव्हे, तर ते अतिशय साधे आणि सरळ असल्यामुळे आश्चर्य वाटण्याजोगे होते. त्यांचे उद्देश—

१. मागासलेल्या निग्रो मुलांसाठी आणि प्रौढांसाठी समाजकल्याण केंद्रे स्थापन करणे. २. निग्रो इतिहास, तसंच लिहिणे आणि वाचणे याकरिता " स्वातंत्र्यशाळा " उभारणे आणि ३. निग्रोंची त्यांचे मताधिकार बजावण्याची भीती नाहीशी करणे, असे होते. पण या सरळ साध्या उद्देशांनाही कदाचित हिंसक विरोध होण्याचा संभव होता. आपलं बोलणं संपवून अ‍ॅन्डी म्हणाला, " मला मिसिसिपीला जायचंय. " मला त्यांचं बोलणं ' मला युद्धावर जायचंय्, ' अशा धर्तीचंच वाटलं. मी काहीच बोलले नाही—पण—

" का ?" बॉबनं विचारलं.

" कारण देशापुढचा हा सर्वांत ज्वलंत प्रश्न आहे आणि लोकांविषयी काही काळजी–तळमळ असणाऱ्यांनी या विषयाशी संबंधित नसणं कसं शक्य आहे ? " ॲन्डीनं उत्तर दिलं.

ॲन्डीबद्दलची काळजी ही जरी माझी त्याच्या उत्तरावर पहिली प्रतिक्रिया होती, तरी माझा ऊर अभिमानानं भरून आला होता. त्या वेळी ॲन्डीला निराश करण्याचा विचारही माझ्या मनाला शिवला नाही. कारण केवळ स्वत:बद्दलच्याच नव्हे, तर इतर लोकांच्याही संबंधानं–त्यांच्या भावनांच्या संदर्भात पूर्ण विचार-स्वातंत्र्य असलेल्या घरात ॲन्डी वाढला होता. प्रत्येकाला विचार करण्याचा पूर्ण हक्क हवा–त्याची आवड आणि त्याचे द्वेषविषय हे केवळ त्याच्या स्वत:च्याच विचारानं ठरवलेले असावेत–पण ह्या गोष्टी धर्म–जाती किंवा रंग यांवर मुळीच अवलंबून असू नयेत. ही कल्पना थोडीशी विचित्र आहे. पण आमच्या घरात सर्वांचंच या बाबतीत एकमत असतं. आमच्या घरातली दुसरी एक कल्पना अशी की, विश्वास हा कृतीत उतरल्याशिवाय त्याला काही अर्थच उरत नाही.

आणि आज ॲन्डी–आम्ही जतन केलेल्या–त्याच विचारांशी–एका अत्यंत भीतियुक्त पण सत्य अशा मार्गानं–वचनबद्ध होण्यासाठी निघाला होता. " ॲन्डी, तू या भानगडीत पडू नकोस ! " असं मी त्याला कशी म्हणणार होते ? मी अन् बॉबनं कित्येकवेळा मुद्दाम अतिशय मानसिक दडपणाखाली असल्याचं मुलांसमोर दाखवलं होतं. फक्त त्यांना त्या न पाहिलेल्या, न अनुभवलेल्या दडपणाची कल्पना यावी, अनुभव यावा म्हणूनच आम्ही हे सारं करीत होतो. कित्येकवेळा आम्ही नाझी-अत्याचारांविषयी बोलत असू ... कारण तोसुद्धा सगळ्यांनी विचार करण्यासारखाच एक प्रश्न होता. प्रत्येकाला त्याची आच असायला हवी, असं आम्हाला वाटत होतं. ह्या साऱ्या भयंकर पण सत्य घटना माझ्या अन् बॉबच्या पिढीनं अनुभवल्या होत्या. त्याची कल्पना आमच्या पुढच्या पिढीला–जोनाथन्ला, ॲन्डीला, डेव्हीला-असलीच पाहिजे, असं आम्हाला वाटत होतं आणि त्यावर आमचा विश्वास होता. जर माझ्या ॲन्डीला आज मिसिसिपीतली ही घटना त्याची स्वत:ची बाब, त्याच्या पिढीची जबाबदारी वाटतेय् तर मी त्याला कुठल्या तोंडानं म्हणणार होते– " नाही ॲन्डी, विश्वास कृतीत उतरवला पाहिजे असं मी म्हणाले, पण ते खोटं होतं. मी खोटं बोलले ...! माझे विचार तसे नव्हते ... मला तसं म्हणायचं नव्हतं. "

तरीही मी शब्दातीत घाबरले होते. माझ्या डोळ्यांसमोर वर्तमानपत्रांतल्या मुखपृष्ठांवरली ब्रँडीस विद्यापीठातल्या रक्तबंबाळ विद्यार्थ्यांची छायाचित्रं होती. मिसिसिपीमध्ये त्यांना बेदम मारण्यात आलं होतं. आदल्याच रात्री मिसिसिपीला गेलेल्या एका गोऱ्या विद्यार्थ्याला अतिशय क्रूरतेनं मारण्यात आल्याचं एका कार्यक्रमाच्या वेळी मी लिंकन सेंटरमध्ये ऐकलं होतं. स्वत:ची सामाजिक घडण बिघडू नये म्हणून तिचं संरक्षण करण्यासाठी समाज कुठल्या थराला जातो, हे मला

माहिती होतं आणि अॅन्डीलाही त्याची जाणीव असल्याचं मला ठाऊक होतं. सामाजिक चालीरीतींमधले हे बदल मोडून काढण्यासाठी समाज पिंजऱ्यातल्या पाखरासारखा अत्यंत आंतरिक वेदनेनं प्रयत्न करतो, विरोध करतो, याची मला जाणीव होती ... अॅन्डीच्या जाण्याला मी विरोध करणार नव्हतेच, म्हणून त्याच्या संरक्षणासाठी–उपयोगासाठी मी बँडेजेस्, औषधे वगैरे भरपूर आणून ठेवली.

या विद्यार्थ्यांना शारीरिक इजा बहुतेक होणार नाही, पण त्यांना वेगमर्यादा–रस्त्यांची अडवणूक–उनाडक्या–संशय किंवा असल्याच एखाद्या कारणासाठी अटक केली जाईल, असं सर्वसाधारणपणे वाटत होतं. याकरिता प्रत्येक स्वयंसेवकाला पाचशे डॉलर्सचा जामीन उभा करायला सांगण्यात आलं होतं. आम्ही अॅन्डीला ते पैसे निश्चितच देऊ शकलो असतो, पण उन्हाळी कार्यक्रमासाठी त्याची निवड झाल्याचं कळल्यानंतर तो अचानक सकाळी ६ वाजता उठू लागला आणि नेहमीच्या वेळेपेक्षा अगोदर घरातून बाहेर पडू लागला. परत येतानाही तो उशीर करू लागला होता. तो काय करतोय्, हे मला सांगण्याची त्याची इच्छा दिसली नाही अन् मीही त्याला विचारलं नाही. पण एका रात्री त्यानं मला जामिनाचे पाचशे डॉलर्स जमवल्याचं सांगितलं. त्याला आमच्याकडून पैसे नको होते. त्यानं एका वाहतूक–कंपनीत ट्रकमध्ये सामान भरण्याचं काम स्वीकारलं होतं. शाळेत जाण्यापूर्वी अन् नंतर तो ते काम करीत असे. अॅन्डीनं दाखवलेल्या या पुरुषार्थाचं मला अत्यंत कौतुक वाटत होतं. माझं मन समाधानानं फुलून आलं होतं.

अॅन्डीच्या लहानपणापासून वचनबद्धतेकडे वळणारं त्याचं मन मला दिसत होतं. तो माझ्याकडे दुडूदुडू धावत यायचा तोसुद्धा भावांची खोडी सांगायला नाही, तर कुणीतरी आणखी कुणाला उगीचच त्रास देतोय, हे सांगायला. माझ्या मनात अजूनही त्याचे ते बोल घुमताहेत, " आई ! हे चांगलं नाही––हे बरोबर नाही. " बरं–वाईट, चांगलं–वाईट यांच्यात तो अचूकपणे भेद करू शकत होता, ह्याची मला जाणीव होती. त्याला मी प्रोत्साहन दिलं होतं–जोपासलं होतं.

चार वर्षांपूर्वी अॅन्डी सीनिअरला असताना त्याचं मन असंच विचार करू लागलं होतं. पश्चिम व्हर्जिनिआतील आत्यंतिक दारिद्र्याच्या परिस्थितीची त्या वेळी फार मोठ्या प्रमाणात चर्चा चाले. अॅन्डी अन् राफ्लनं (त्याचा मित्र) व्हर्जिनियामध्ये आपली सुटी घालवायचं ठरवलं होतं. अमाप कोळशाच्या खाणी असूनही जगण्याची आशा नष्ट झालेल्या या प्रदेशातलं आयुष्य त्यांना स्वत: बघायचं होतं–तिथल्या जीवनक्रमाचा अनुभव घ्यायचा होता. मला अन् राफ्लच्या आईला काळजी वाटत होती; पण ह्या मुलांनी स्वत: ठरवलेल्या विषयात प्रत्यक्ष अनुभव घ्यायचं ठरवलं होतं. त्यामुळे त्यांच्या विचारांना एक दिशा मिळणार होती, वळण मिळणार होतं. त्यांनी एक आठवडा त्या प्रदेशात घालवला. अनेकांना स्वत:ची ओळख करून दिली, अनेकांशी ओळखी करून घेतल्या. ते शिकले लक्ष्यवेधी प्रश्न विचारायला अन्

त्यांची प्रामाणिक उत्तरं मिळवायला.....पण सर्वात अधिक महत्त्वाची त्यांनी स्वतःकरता माहिती मिळवली ती ही की, इतकाही दरिद्री भाग खरोखर अस्तित्वात आहे. त्यांचं जगही तितकंच सत्य आहे.

नंतरच्या हिवाळ्यात ॲन्डीनं विस्कॉन्सिन् विद्यापीठात नाव दाखल केलं आणि तो निमोनियानं आजारी झाला. आजारपणातून उठला अन् पुन्हा त्याला निमोनियानं झपाटलं. विद्यापीठाच्या डॉक्टरांनी त्याला कुठलातरी हलका अभ्यासक्रम स्वीकारायला सांगितलं अन् इतर सर्व कार्यक्रम बाद करण्याची सूचना दिली. याचाच अर्थ ॲन्डीनं यापुढे त्याच्या सगळ्यांना आवडीच्या विषयाकडे—नाट्यशास्त्राकडे—लक्ष देऊ नये, असाच होता.

अठरा-वीस वर्षे वयाच्या इतर कुठल्याही विद्यार्थ्याप्रमाणं ॲन्डीला नाटक आवडे. तो नाटकात काम करायला आकृष्ट झाला, याचं कारणही असंच होतं. नाटकामुळे त्याला स्वतःला अनेक माणसांच्या—व्यक्तींच्या अंतरंगामध्ये जाता येई. त्यामुळं त्याच्या भावना विस्तृत होत होत्या. आयुष्यांत त्याच्या कल्पनेचा अन् सत्यतेचा पसारा – दिमाख – वाढत होता. त्याच्या शांत आणि अबोल मनोवृत्तीमुळे कधी कधी तो स्वतःची जिज्ञासा आणि अनुभवाची अभिलाषा लपवीत असे. कधी-कधी तो स्वतःची अबोल वृत्ती सोडून खूप मोठ्यानं गाणी म्हणायचा.

विद्यार्थी म्हणून नाटकाचा अभ्यास सोडावा लागल्यानंतर तो घरी परत आला. त्यानं एका नाटकातील भूमिकेसाठी मुलाखत दिली अन् त्यात त्याची निवडही झाली. नंतर थोड्याच महिन्यांनंतर त्यानं क्वीन्स् कॉलेजात नाट्यशास्त्राच्या अभ्यासासाठी पुन्हा नाव दाखल केलं. त्याच्या वडिलांना अन् मला वाटणारी काळजी आता बरीचशी दूर झाली होती.

साधारणतः दोन वर्षांपूर्वी, म्हणजे त्याच्या आयुष्याचं शेवटचं वर्ष सुरू होण्याच्या सुमाराला—त्याच्यात एक बदल होऊ लागल्यासारखा वाटत होता. त्याचं नाटकाविषयीचं औत्सुक्य ओसरल्यासारखं दिसत होतं. कदाचित त्याचं लक्ष कॉलेजमधील काही चर्चाविषयांकडे लागलं असेल, असं मला वाटलं. पण काहीही असलं, तरी त्याचं मन आजकालचे लोक, समाज, त्यांचे धर्म, त्यांच्या नीतिनियमाविषयीच्या कल्पना यात रमू लागलं होतं. त्याने नाटकाऐवजी समाजशास्त्र आणि व्यक्ति–मनोविज्ञानशास्त्र यांच्या अभ्यासक्रमासाठी स्वतःचं नाव नोंदवलं आणि धडाक्यानं विविध विषयांवरचं आपलं वाचन सुरू ठेवलं होतं. त्यानंतर बोलताना तो अत्यंत आवेशानं बोलत असे. बॉबशी चर्चा करताना तो अनेक वेळा स्वतःची कणखर मतं मांडीत असे. त्याचा बॉबशी बहुधा मतभेद होई, पण ॲन्डीच्या मतांमध्येही त्याला वाटणारी समाजाविषयीची ती काळजी, कळकळ स्पष्ट दिसत असे.

अलीकडे त्याच्या बोलण्यात 'आभास' आणि 'सत्य' हे शब्द वारंवार येऊ लागले होते. नाटकांमध्ये असणाऱ्या 'आभासा'मुळे तो नाटकाकडे आकृष्ट झाला

होता आणि आता लोकांच्या–समाजाच्या अभ्यासानं त्याला 'सत्या' कडे खेचून आणलं होतं. कॉलेजमधील एका चर्चासभेहून परत आल्यानंतर एकदा तो अमेरिकन सभ्यतेतील आभास आणि सत्य यावर असाच भडकला होता. "सर्व आयुष्यभर," तो म्हणाला, "मी स्वातंत्र्य आणि समता हेच शब्द ऐकत आलो... घटनेनं प्रत्येक मानवाला याबद्दल संरक्षण कसं दिलंय् आणि अमेरिकेच्या सरन्यायालयानं त्याच घोषणेची कशी पुनरावृत्ती केलीय्...पण जर स्वातंत्र्य आणि समता या गोष्टी प्रत्यक्षात खऱ्या नसतील, तर मग नुसत्या शब्दांना अर्थच उरत नाही." त्याचं बोलणं संपलं नव्हतं. "जर वस्तुस्थिती तशी नसेल तर शब्द हे नुसते आभास आहेत." तो बोलतच होता अन् माझ्या मनातल्या आठवणींच्या धाग्यांतला एक धागा उकलत होता–"आई ! हे चांगलं नाही–हे बरोबर नाही."

मनातल्या ह्या विचारांवर लक्ष केन्द्रित केल्यानंतर ते विचार अमलात कसे आणावेत, याचा त्याला ध्यास लागला...त्याची अशीच पद्धत असायची. मिसिसिपीला जाण्याचा विचार पक्का झाल्यानंतरची गोष्ट–इंग्रजीच्या वर्गात A. E. Houseman यांच्या Athlete Dying Young या कवितेवर चर्चा चालू होती. एकाएकी अॅन्डीचं लक्ष कवितेच्या चर्चेतून उडालं अन् तो वहीवर मराभर काहीतरी लिहू लागला. तो एक कविता लिहीत होता. ती कविता म्हणजे मूळ कवितेचा उपसिद्धान्त आहे, असं तो म्हणायचा. त्यानं लिहिलेल्या कवितेत त्या मृत्युपंथाला लागलेल्या खेळाडूच्या ठिकाणी त्यानं एका निग्रो मुलाची कल्पना केली होती. त्यानं लिहिलं होतं–

चढत्यावाढत्या सूर्याच्या उष्णकठोर रूपानं
चांदण्यादेखील घाबरल्या आहेत
चांदण्या चमचमणाऱ्या घाबरलेल्या पाहून
स्वर्गाचीही त्रेधा उडाली आहे.

सान जिवांचे रडे दावि तो
मी 'काळ्यां'ची मरणे बघतो
आणि नजर अंतरात जाते
नयन बंद निःश्वास रोधतो

लालभडक दिवसाचा जबडा
शांत सुशीतल रजनी मिटते
काळाच्या जबड्याची भीति
अन् माझ्या स्वप्नांतही नुरते

पण अॅन्डीनं इतर कोणत्याही भागात काम करण्याऐवजी मिसिसिपी राज्य का पसंत केलं होतं, याचं कारण मिसिसिपी हा भाग त्यांच्या एका हुशार निग्रो

नेत्यानं — बॉब मोझेसनं — आणि उन्हाळी कार्यक्रम आखणाऱ्या त्याच्या हुशार मित्रांनी ठरवला होता. त्यांनी नेतृत्व केलं आणि अॅन्डी अन् त्याच्या पिढीतले त्याचे साथीदार त्यांना सामील झाले.

समाजाबद्दल आस्था असणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांसाठी काही महत्त्वाची कामं आहेत, असं जर जबाबदार नेत्यांना वाटत असेल, तर त्यांनी स्वतःचं नेतृत्व त्या तरुणांना देणं आवश्यक आहे. नुसतं तरुणांवर ताशेरे झाडून चालायचं नाही— कारण ते सध्या त्यांना उपलब्ध असणाऱ्या गोष्टींमधूनच उपयुक्त कार्य करण्यावर लक्ष केन्द्रित करीत आहेत. त्यांना नवी क्षेत्रे उघडून देण्यासाठी, त्यांच्याशी सहकार्य करायला आणि त्यांना हवी असलेली सुसंगत कार्यशलाका—जी मिसिसिपी—कार्यक्रमाच्या नेत्यांनी त्यांना दिली — त्यांच्या हाती द्यायला हवी आहे. ही कारणं जर खरोखरीच महत्त्वाची असतील, तर तरुण पिढी त्यासाठी परिश्रम – प्रसंगी बलिदानही करायला तयार होते, हा अनुभव आहे. मिसिसिपीच्या उदाहरणानं हे दाखवून दिलेलं आहे.

आणि अशा रीतीनं अॅन्डी घरातन निघाला. एक आठवडाभर त्यांना National Council of Churches तर्फे प्रशिक्षण देण्यात येणार होतं...माझ्या दृष्टीनं तो आठवडा खराखुरा परीक्षेचा आठवडा होता. प्रशिक्षणामध्ये मुलकी हक्कांबद्दलची मूलभूत माहिती, त्यांचा इतिहास आणि अहिंसात्मक सत्याग्रहाची तत्त्वप्रणाली यांचा सांगोपांग अभ्यास करून घेतला जात होता. आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अहिंसात्मक सत्याग्रहाची प्रात्यक्षिक तयारी करून घेतली जात होती.

या प्रात्यक्षिक तयारीमध्ये एका गटातील विद्यार्थी—खरोखरीचा शारीरिक त्रास देऊन—दुसऱ्या गटाला चिडवीत असत. मग ते त्यांना ढकलीत, टोचीत आणि प्रसंगी त्यांना जमिनीवर पाडून मारीत असत. याचबरोबर त्यांच्या तोंडून शिव्यांची लाखोली वाहिली जात असे. त्या शिव्यांमध्ये असतील नसतील त्या वर्णसंबंधीच्या सर्व शिव्यांचा समावेश असे. या कार्यक्रमाचं उद्दिष्ट अत्याचार होत असताना त्या विद्यार्थ्यांनी उलट हात उगारू नये, प्रतिकार करू नये हेच होतं. प्रतिकार करणं आवश्यकच वाटलं तरी तो हिंसात्मक असू नये, हेही या कार्यक्रमाचे एक उद्दिष्ट होतं......पण हे प्रात्यक्षिक शिक्षण सत्याची कितीही प्रमाणात कल्पना पटवणारं असलं तरी त्यात धोका नव्हता, भीती नव्हती......परंतु प्रत्यक्षात काय होईल, याचा भरवसा वाटत नव्हता...त्या दृष्टीनं हा आठवडा खरोखरच परीक्षेचा आठवडा होता......

एका सकाळी अॅन्डीनं — माझ्या मुलानं — मला शेवटचं चुंबन दिलं अन् तो स्वातंत्र्यासाठी — मुक्ततेसाठी लढायला म्हणून बाहेर पडला......मी त्याला पुन्हा कधीही जिवंत बघू शकले नाही......कोणत्याही आईला — जिनं आपला मुलगा

लढाईत गमावलेला आहे – तिला हे दुःख असह्य होतं. पण माझी भावना निराळी आहे. अॅन्डीनं लढाईत नाही, तर शांततेत देह ठेवला......त्याला ठार मारलं, तेही एखाद्या इतर देशाच्या शत्रूच्या सैनिकांनी नव्हे, तर त्याच्या स्वतःच्याच देशातल्या– त्याच्या बरोबरीच्या एका अमेरिकन लोकांच्या गटानं......

प्रथम हे विद्यार्थी बेपत्ता असल्याची बातमी आली तेव्हा आणि नंतर त्यांची प्रेतं सापडल्याचं समजलं तेव्हाही मी अस्वस्थपणे आमच्या मॅनहॅटनमधील घरामोवती शून्यमनस्क होऊन, स्वतःच स्वतःला समजावीत चकरा घातल्या आहेत...... हे माझ्या अॅन्डीचं छायाचित्र......हे त्याचं अभ्यासाचं टेबल......हे त्याचं आवडतं गीत......हे त्याचं घर . ...ही जागा जिथं त्यानं माझा निरोप घेतला......आणि आता तो कधीही न परतण्यासाठी गेलाय्......या ठिकाणी त्यानं शोध घेतला...... कसून......या पुस्तकांमध्ये......वडिलांशी – त्याच्या भावांशी – मित्रांशी आणि माझ्याशी केलेल्या संभाषणामध्ये, पण सारं कसं खासगीत......शांतपणे बोलल्यागत ......शब्दविरहित आश्चर्य त्याच्या चेहेऱ्यावरचं – त्याची जिज्ञासा दाखवीत असे– आयुष्याबद्दलची जिज्ञासा......आयुष्याचा अर्थ लावायचा त्यानं प्रामाणिक प्रयत्न केला......पण आता त्याच्याजवळ आयुष्यच नाही......तो संपला आहे......आणि आता उरला आहे फक्त भूतकाळ......तोही भविष्यकाळाशिवाय......

अशा विचारांमध्ये मी थोडा वेळ गुंग होऊन जात असे; पण लगेच सत्यतेशी पटवून घ्यावं लागतं, म्हणून मी अॅन्डीच्या मृत्यूत काही अर्थ शोधायचा प्रयत्न करी......हळूहळू एक कल्पना मूळ धरू लागली......पटू लागली......

" त्यांची हत्या करणारांच्या पायाशी पडलेल्या अॅन्ड्र्यू, मिकी अन् जेम्स् यांनी नकळतच त्यांचं – किंबहुना प्रत्येक तरुणाचं असावं, असं एक सुखस्वप्न पूर्ण केलं होतं .....त्यांनी खरोखरच हजारोपटींनी त्यांचं सुखस्वप्न पूर्ण केलं होतं."

ह्या तीन विद्यार्थ्यांच्या मृत्यूनं काळाच्या इतिहासात एक कधीही न पुसलं जाणारं चिन्ह उमटवलं होतं..... प्रत्येक-विद्यार्थी तरुणाला याच एका क्षणासाठी... चिन्हासाठी जगावंसं वाटावं, असाच त्यांचा मृत्यू होता..... असंच त्यांचं बलिदान होतं.

ह्या साऱ्या धक्क्यानं आम्हाला अत्यंत कठीण परिस्थिती दाखवलीय...... मी... बॉब अन् माझी मुलं......मोठा जोनाथन् अन् धाकटा डॅव्ही सारेच सुन्न झालो आहोत.....पुन्हा सर्वसाधारणपणानं जगात वावरण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत. गेल्या उन्हाळयांत डॅव्ही कॉलेजमध्ये दाखल होण्याच्या अगोदर आम्ही एक दिवस जागतिक प्रदर्शनाला भेट देण्यात घालवला. 'व्हॅटिकन कक्षातल्या' मायकेल एंजेलोच्या 'Piea' चा शिल्पानं मला वेड लावलं. मेरी आणि तिच्या गुडघ्याशी वाकलेला येशू.....शहीद येशू...... जणू काही तो मरण्याऐवजी शांत-सुंदर झोपेत असावा,

इतके कोमल भाव त्या येशूच्या चेहेऱ्यावर आहेत. अतीव दुःखाच्या अनुभूतीला शेवटी शांतता लाभल्यागत झालेलं त्या सुंदर शिल्पाकृतीकडे बघताना मला भासलं.

मीही माझ्या दुःखात शांतता अनुभवण्याचा प्रयत्न करतेय......ॲन्डीच्या – माझ्या मुलाच्या – मरणातून जे काही चांगलं निष्पन्न होईल, ते कदाचित त्याला स्वतःच्या आयुष्याच्या मोबदल्यात योग्य वाटेल.....अशा प्रकारच्या माझ्या भावनांमध्ये स्वतःला विसरून जाऊन, मीही माझ्या ॲन्डीच्या मरणाची सत्यता पटवून घेण्याचा प्रयत्न करतेय.......

● ● ●

## □ पोरकेपणा व बालगुन्हेगारी

लहानपणी आईबापांचे छत्र न लाभलेल्या मुलांत बालगुन्हेगारी अधिक आढळते अशी एक समजूत आहे. त्यांतही दोन मतप्रवाह आहेत. आईच्या छत्रास मुकलेली मुले गुन्हेगारीकडे अधिक वळतात, असे बौलबी यांचे मत आहे; तर बापाच्या छत्रास मुकलेल्या मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती अधिक आढळते, असे आर. जी. अँड्री यांचे मत आहे. प्रत्यक्ष अभ्यास व अवलोकनाच्या कसोटीवर यापैकी कोणते मत टिकते, ते अजमावण्यासाठी ॲलन लिटल यांनी ५०० मुलांचा अभ्यास केला. त्यात त्यांना असे दिसून आले की, आईच्या छत्रास मुकलेली मुले लौकर गुन्हे करू लागतात. वडिलांच्या छत्रास मुकलेली थोडी उशिरा यात पडतात, पण फरक लक्षात घेण्याइतका मोठा नाही. आईबापांचे छत्र असलेल्या मुलांच्या हातून घडणारे गुन्हे आणि पोरक्या मुलांचे गुन्हे यांच्या स्वरूपात काही फरक आढळतो काय, या दृष्टीनेही लिटल यांनी पाहणी केली. त्यात त्यांना असे दिसून आले की, पोरक्या मुलांपेक्षा आईबापांचे छत्र असलेल्या मुलांमध्ये मालमत्तेची मोडतोड किंवा हानी करण्याची प्रवृत्ती थोडी अधिक आढळते, पण त्यांच्या मते हा फरकही विशेष महत्त्वाचा नाही. ●

# डग्लस वॉल्टर्स

## ऑस्ट्रेलियाची नवी आशा

यॉर्कशायरमध्ये म्हणे नुसती एक शीळ घातली तरी दोनतीन नवे द्रुतगती गोलंदाज हजर होतात. गुणी तरुण खेळाडूंच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया यॉर्कशायरपेक्षाही सुखी आहे. तेथे शीळदेखील घालावी लागत नाही. नुसता ओठाचा चंबू केला तरी कसबी क्रिकेटपटूंची पलटण उभी राहाते. त्यामुळेच की काय, ऑस्ट्रेलिया नेहमी बेफिकीर असते. तुमच्या संघात सध्या अमूक प्रकारचा फलंदाज नाही, वगैरे टीकेला त्यांचे एकच उत्तर असते – सध्या नसेल, पण वेळ आली की तुम्ही म्हणता तसला खेळाडू उत्पन्न होईल. असा खेळाडू कोठून येईल ते त्यांनाही माहीत नसते, पण तो येईल अशी खात्री असते. याचं कारण म्हणजे ऑस्ट्रेलियन क्रिकेटचा इतिहास ! जेव्हा जेव्हा म्हणून ऑस्ट्रेलियाला नवीन खेळाडूची नितांत आवश्यकता भासते, तेव्हा तेव्हा ती कोणी ना कोणी पुरी केलीय.

फार जुनी कशाला, अलीकडचीच उदाहरणे पाहा ना. सलामीचा फलंदाज कोलिन मॅक्डोनल्ड निवृत्तीची भाषा बोलू लागला. तो गेल्यावर सिम्प्सनची साथ कोण करील, हा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच त्याचं उत्तर मिळालं–बिल् लॉरी. जिम बर्कच्या निवृत्तीमुळे निर्माण झालेला पेच बॉबी सिम्प्सनने आधीच सोडविला होता. मॅक्डोनल्डची उणीव लॉरीने मुळीदेखील भासू दिली नाही. वास्तविक पाहता ६१ साली इंग्लंडला तो राखीव म्हणून गेला होता, पण तो दौरा त्याने गाजविला. दहा शतके ठोकून त्याने दौऱ्यावर विक्रम केला. आज ऑस्ट्रेलियन फलंदाजीचा तो कणा आहे. तीच गोष्ट बॉब कॉपरची. हार्वे निवृत्त झाल्याने ऑस्ट्रेलिया एका जातिवंत डावखोऱ्या फलंदाजास मुकला. जवळजवळ लागलीच कॉपर उदयाला आला आणि हार्वेच्या जागेवर त्याच आत्मविश्वासाने खेळू लागला. वेस्टइंडीजमध्ये हॉल, ग्रिफिथ, सोबर्स आणि गिब्ज याच्या मारक गोलंदाजीवर सर्वात सातत्याने व बेडरपणे खेळला कॉपरच ! ऑस्ट्रेलियन संघात हार्वेची हीच भूमिका होती. ती कॉपरने बेमालूम वठविली. आता तर ऑस्ट्रेलियाचा भावी कर्णधार म्हणून त्याच्याकडे बोट दाखविण्यात येते. मेकिफ आणि रॉर्क त्यांच्या वादग्रस्त अॅक्शनमुळे क्रिकेटमधून बाद झाल्यानंतर डेव्हिडसन एकटा पडेल, दुसऱ्या बाजूने त्याला योग्य साथ मिळणार नाही, अशी भीती वाटत होती. सहा फुटांहून उंच असलेल्या धिप्पाड मॅकेन्झीने ती भीती खोटी ठरविली.

दर्जेदार फलंदाजांना ऑस्ट्रेलियात तोटा नाही. यंदा त्यांना एका तरुण, तडफदार आणि आक्रमक फलंदाजाची जरूरी होती. हात मोडल्याने कर्णधार सिम्सन पहिल्या कसोटी सामन्यात खेळू शकत नव्हता. बूथ आणि ओनील मुळीदेखील फॉर्मात नव्हते. बर्ज वयस्क वाटू लागला होता. तरुण रक्त पाहिजे. आहे कुणी असा ? ह्या ऑस्ट्रेलियाच्या हाकेला विशीसुद्धा न उलटलेल्या डग्लस वॉल्टर्सने उत्तर दिले. न्यू साऊथ वेल्सतर्फे इंग्लंडविरुद्ध त्याने एक झकास शतक काढून आपली लायकी सिद्ध केली होती. तो तरुण होता, दक्ष क्षेत्ररक्षक होता व चांगल्यापैकी मध्यमगती गोलंदाज होता. ऑस्ट्रेलियाला तरी जास्त काय पाहिजे होते ? ब्रिस्बेनला पहिल्या कसोटी सामन्यात त्याचा समावेश झाला आणि पहिल्याच सामन्यात वॉल्टर्सने शतक ठोकले. १५५ धावांत त्याने एकही झेल दिला नाही, की एकही चुकीचा फटका मारला नाही. आपल्या पहिल्यावहिल्या सामन्यात शतक काढणाऱ्या निवडक खेळाडूंच्या यादीत वॉल्टर्सचेही नाव लिहिले गेले. ऑस्ट्रेलियात फलंदाजाने शतक काढण्याचा हा विक्रम तब्बल सदतीस वर्षांनी केला गेला. तसे जिम बर्कने आपल्या पहिल्याच सामन्यात शतक लावले होते, पण ते ऑस्ट्रेलियाच्या मैदानावर नव्हे. २८ सालीही ऑस्ट्रेलियाची आजच्यासारखीच स्थिती होती. २६ सालच्या इंग्लंडच्या दौऱ्यानंतर चार्ली मॅकार्टने निवृत्त झाला होता. २८ च्या कसोटी मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांनंतर केलवे व ग्रेगरी निवृत्त झाले आणि वीस व एकोणीस वर्षांचे दोन तरुण बॅटी परजीत पुढे सरसावले. एकाचं नाव होतं डॉन ब्रॅडमन आणि दुसऱ्याचं होतं आर्ची जॅकसन ! कदाचित तुम्ही म्हणाल, ब्रॅडमन माहितीय्, पण हा जॅकसन कोण बुवा ! लारवुड, टेट, हॅमंड, व्हाइट आणि ग्रेगरी ह्यांची गोलंदाजी अक्षरशः फोडून काढून त्यानं एडलेडला आपल्या पहिल्याच कसोटी सामन्यात १६४ धावा फडकाविल्या. जाणकार त्याला ब्रॅडमनपेक्षा जास्त मान देत. दुर्दैवाने दोनतीन वर्षांतच त्याचा क्षयाने अंत झाला. नाहीतर आज कदाचित ब्रॅडमनच्या बरोबरीने त्याचं नाव घेतलं गेलं असतं.

## सावधान

त्यानंतर आज सदतीस वर्षांनी एकोणीस वर्षांच्या वॉल्टर्सने इतिहासाची पुनरावृत्ती केली. रे रॉबिन्सन या विख्यात ऑस्ट्रेलियन क्रिकेट–समीक्षकाने लिहिले–

" जगातील समस्त गोलंदाज हो ! सावधान ! एक जबरदस्त फलंदाज उदयाला आलाय. लवकरच त्याची कीर्ती ब्रिस्बेनपासून बर्मिंगहॅमपर्यंत व बार्बाडोसपासून बॉम्बेपर्यंत दुमदुमेल, याबाबत मला काडीचीही शंका नाही."

रे रॉबिन्सनच्या स्तुतीला आपण पात्र असल्याचे वॉल्टर्सने दुसऱ्या कसोटी सामन्यात सिद्ध करून दिले. पहिल्या डावात इंग्लंडने ऑस्ट्रेलियापुढे २०० धावांची

आघाडी मारली. दुसऱ्या डावात वॉल्टर्स खेळायला आला, तेव्हा ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ४ गडी बाद १७६ झाली होती. म्हणजे इंग्लंडची पहिल्या डावातील धावसंख्या ओलांडायला अद्याप २४ धावांची जरूरी होती. आल्याबरोबर वॉल्टर्सने फटकेबाजी सुरू केली. पीटर वर्ज (१२०) बरोबर त्याने पाचव्या विकेटसाठी १९८ धावांची भागीदारी केली. २३१ मिनिटे खेळून २२७ चेंडूंवर त्याने शतक पूर्ण केले. ११५ धावांवर तो शेवटी बाद झाला. पहिल्या व दुसऱ्या कसोटी सामन्यात शतक काढण्याचा विक्रम क्रिकेटच्या सबंध इतिहासात आजवर आणखी फक्त एकाच फलंदाजाने केला आहे. ऑस्ट्रेलियाच्याच बिल पॉन्सफोर्डने १९२४ च्या मालिकेत सिडने व मेलबोर्न येथे लागोपाठ दोन शतके काढली होती. हार्वर्ट सटक्लिफने २४ सालीच ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या दोन सामन्यांत दोन शतके ठोकली होती, पण त्यापूर्वी तो दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला होता. मेलबोर्नवर वॉल्टर्स दुसरं शतक लावीत असताना ते पाहायला खुद्द पॉन्सफोर्ड हजर होता हे विशेष.

सिडनेला तिसरा कसोटी सामना इंग्लंडने जिंकला. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात वॉल्टर्स एकटा झुंजला. पस्तीस धावा काढून तो नाबाद राहिला. त्याला 'स्टँड' द्यायलाच कोणी नव्हतं. या सामन्याविषयी लिहिताना जॅक फिंगल्टनने लिहिले.– "... बूथने दोन्ही डावांत वॉल्टर्सचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला, पण तसे करण्याची काहीच आवश्यकता नव्हती. आज ऑस्ट्रेलियन संघात वॉल्टर्स हा सर्वोत्कृष्ट फलंदाज आहे. दोन्ही डावांत त्याला कोणाचीही साथ मिळाली नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. कमीत कमी चौथ्या क्रमांकावर त्याला पाठवायला हवे." 'जो कधीच भोपळा काढीत नाही, तो फलंदाजच नव्हे,' हे डॉ. ग्रेसचे उद्गार खरे करण्यासाठीच की काय, चौथ्या कसोटी सामन्यात त्याने शून्य धावा काढल्या. पाचव्या सामन्यात तो फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीत चमकला. पावसाने वाया गेलेल्या या सामन्यात त्याने चार विकेटस् काढल्या. त्याशिवाय ६० धावाही फटकावल्या. इंग्लंडच्या पहिल्या डावात वॉल्टर्सने मॅकेन्झी, हॉक, सिम्पसन, स्टॉकपोल आणि चॅपेल यांच्यापेक्षा जास्त परिणामकारक गोलंदाजी करून एड्रिच, बॅरिंग्टन, स्मिथ व कौड्री या महत्त्वाच्या विकेटस् मिळविल्या.

## उत्कृष्ट पदविन्यास

जॅक फिंगल्टनला वॉल्टर्सच्या दोन गोष्टींचे कौतुक वाटते. एक म्हणजे त्याचे पदलालित्य आणि दुसरे म्हणजे त्याचे 'मॅच टेंपरामेंट.' वॉल्टर्स विकेटपाशी अगदी आरामात उभा राहतो. तो क्रिकेटमधील सर्व फटके मारतो. स्पिनर्सना खेळताना तो क्रिज सोडून पुढे यायला भीत नाही, हे विशेष. मंदगती गोलंदाजीवर नाचऱ्या पावलांनी पुढे येणाऱ्या (Dancing down the wicket) फलंदाजांची संख्या दिवसेंदिवस रोडावत आहे. क्रिजला चिकटून उभे राहणारे (flat footed)

फलंदाज लेकर किंवा गुप्तेसारख्या गोलंदाजांना पर्वणी वाटतात. मंदगती गोलंदाजावर कुरघोडी करायची म्हणजे प्रथम त्याची लेंग्थ घालवायची असते. उत्कृष्ट पद-विन्यासाच्या जोरावरच हे साधता येते. वॉल्टर्सचे अचूक पदलालित्य फिरकी गोलंदाजाची डोकेदुखी होणार यात शंकाच नाही.

त्याचा थंड स्वभाव ही मात्र दैवी देणगी आहे, असंच म्हटलं पाहिजे. ओनील एवढा जबरदस्त फलंदाज, पण कित्येकदा केवळ नर्व्हस झाल्याने त्याचा बळी गेला आहे.

एका बाबतीत वॉल्टर्स सुदैवी आहे. मॅकार्टने, मॅकेब, किपॅक्स, जॅकसन वगैरे कोणाशीही त्याची तुलना अजून तरी केली गेलेली नाही. फिंगटल्न म्हणतो, " मला वॉल्टर्स आवडतो, कारण तो दुसऱ्या कोणासारखाही नाही. "

सर्वात चांगली गोष्ट ही की, ' दुसरा ब्रॅडमन ' ही उपाधी त्याला लागली नाही. ' ब्रॅडमनसारखा फलंदाज शतकातून एखादाच होतो; ब्रॅडमनचे पीक दरवर्षी येत नसते, ' हे फिंगल्टनने सांगितलेलं कटू सत्य आता ऑस्ट्रेलियाने पचविलेसे दिसते. नाहीतर एखादा विशीचा पोरगा तडफदारपणे खेळू लागला, विक्रम करू लागला की, ' दुसरा ब्रॅडमन ' म्हणून त्याचा उदोउदो करायचा, तोंड फाटेपर्यंत त्याची स्तुती करायची आणि आपल्या कसोटीला तो उतरत नाही, हे दिसलं की निराशा लपविण्यासाठी त्याच्यावर कठोर प्रहार करायचे, हा ऑस्ट्रेलियन टीकाकारांचा खाक्या ! इयान क्रेग आणि नॉर्मन ओनील दोघेही वास्तविक उत्कृष्ट फलंदाज होते व आहेत. आपल्या परीने ते श्रेष्ठ होते; पण केवळ ते ' ब्रॅडमन ' नव्हते, म्हणून लोकांच्या मनातून उतरले. म्हणूनच वॉल्टर्सला ब्रॅडमन म्हणत नाहीत, ही आनंदाची गोष्ट आहे.

सीझनमध्ये सर्वप्रथम हजार धावा पूर्ण करण्याची पैज वॉल्टर्स यंदा अगदी थोड-क्यासाठी हरला, पण पुढल्या वर्षापासून त्याच्याशी पैज मारायला कोणी तयार होईल किंवा नाही, शंकाच आहे !

**शिरीष कणेकर**

# भिंतीच्या तुंबडया

सुधाकर राजे

## • सरकारी उंदीर

अर्जेंटिनाच्या विदेश–मंत्रालयाच्या कार्यालयात उंदरांचा फार सुळसुळाट झाल्यामुळे मूषकमर्दनानिमित्त कचेरी खास एक दिवस बंद ठेवण्यात आली, असे परवा वर्तमानपत्रात वाचले. आता जेथे सरकार तेथे रद्दी अन् जेथे रद्दी तेथे उंदीर, हे ओघानेच येते. पण अर्जेंटिनातल्या उंदरांना परराष्ट्रीय राजकरणातच विशेष स्वारस्य का ? याची अनेक कारणे असू शकतील. एक तर भारतीय विदेश–मंत्रालयाप्रमाणेच अर्जेंटाइन विदेश–मंत्रालयही घाउक प्रमाणावर निषेध–खलित्यांची पैदास करीत असेल, त्यामुळे रद्दीचे ते अमाप पीक सोडून इतरत्र जाणे कुठल्या शहाण्या उंदराच्या मनात येईल ? दुसरी शक्यता म्हणजे मानवी समाजात ज्या अर्थी दगाबाज माणसाला ‘रॅट्’ म्हणतात, त्या अर्थी हे उंदीर कुठल्यातरी परकीय देशाला फितूर होऊन पंचमस्तंभी कारवायांत गुंतलेले असावेत व अर्जेंटाइन बोक्यांनी कुणाकुणाशी संधान बांधले आहे, याची माहिती काढीत असावेत; किंवा एखादी आंतरराष्ट्रीय उंदीर–चळवळ उभारून जागतिक मांजरशाहीला शह देण्याचा अर्जेंटाइन उंदरांचा मनसुबा असेल व त्यासाठी कुठल्या देशातले उंदीर आपल्याशी हस्तमिळवणी (चुकलो, शेपटी–मिळवणी) करण्याइतके प्रगतिशील विचाराचे आहेत, हे पाहण्यासाठी विदेश–मंत्रालयाच्या गुप्त फायली (कुरतडून) पाहण्याचा उद्योग त्यांनी आरंभला असेल.

या त्यांच्या पाहणीत या उंदरांबद्दल त्यांचे काय मत झाले असेल ? भारताच्या उंदीर–समाजात गणपतीच्या उंदरापासून मर्ढेकरांच्या उंदरांपर्यंत अनेक नामांकित नेते होऊन गेले असल्याने येथील मूषक–परंपरा उज्ज्वल आहे, याची अर्जेंटाइन उंदरांना निश्चितच खात्री पटली असेल. पुराणकाळात गणपतीने व्यासमुनींकडून महाभारताचे डिक्टेशन घेतले, तेव्हा त्याचा आवडता उंदीर समोर बागडत नसता, तर महाभारताच्या कॉपीत चिकार चुका राहिल्या असत्या, अशी माझी खात्री आहे. म्हणजे मूषक नसता तर मानवाला हे अक्षरवाङमय मिळाले नसते. इतिहासकाळात शंभर चुव्वे खाऊन हाजला जाणाऱ्या बिल्लीबरोबर दिल्लीश्वराची तुलना कशी होऊ शकली ? त्या शंभर उंदरांच्या बलिदानामुळेच. आणि अर्वाचीन कालात तर सहा उंदीर एका माणसाचे अन्न खातात, असा कबुलीजबाब परवा अन्नान्नमंत्र्यांनी लोकसभेत दिला, तेव्हाच ‘दर डोई एक मत’च्या या काळात माणसाच्या डोक्यापेक्षा मूषकाच्या शेपटीला अधिक महत्त्व आहे, हे सिद्ध झाले आहे.

तेव्हा अर्जेंटाइन उंदरांना खरोखरीच बोकेबाजीचा पाडाव करायचा असेल, तर त्यांना भारतीय उंदरांशी संगनमत केल्याखेरीज तरणोपाय नाही. तेथल्या माणसांच्या मूषक–मोहिमेमुळे ज्या क्रांतिकारक उंदरांना परागंदा व्हावे लागले असेल, त्यांना भारतात राजकीय आसरा अवश्य मिळेल. कारण एकेकाळी या देशात दूध–दुभत्याच्या नद्या वाहत होत्या, त्या आता पार आटल्या असल्याने सर्व मांजरे देशोधडीला लागली आहेत.

या उंदरांनी इकडे येऊन प्रथम एक अर्जेंटाइन–भारतीय उंदरांची भाई–भाई संस्था स्थापन करावी व पुढे एक आंतरराष्ट्रीय स्नेहसंमेलन भरवावे. या जागतिक परिषदेला इसापच्या सिंहाची जाळ्यातून सुटका करणारा उंदीर, ॲलीस वंडरलँडला गेली, तेव्हा तिच्या चहापार्टीत झोपा काढणारा उंदीर, ' पुलीकॅट ' लंडनला गेली तेव्हा राणीच्या खुर्चीखाली विराजमान झालेला उंदीर, इत्यादी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बरेच उंदीर बोलावता येतील. या संमेलनात मर्ढेकरांच्या उंदरांची काव्य-स्पर्धा ठेवता येईल व अन्नमंत्र्यांच्या उंदराचे " आज देशात नांदणारी सुबत्ता " या विषयावर विद्वत्ताप्रचुर भाषण होऊ शकेल आणि या सर्व सोहळ्याचा स्वागताध्यक्ष कोण ? भारतीय साम्यवादी पक्षात डावे–उजवे झाल्यावर डाव्यांनी एका उजव्या नेत्याची ज्या उंदराबरोबर तुलना केली तो.

## ● शुभ मुहूर्त, पण सावधान !

यंदाच्या उन्हाळ्यात दिल्लीहून मद्रासकडे जाणाऱ्या स्पेशल आगगाड्या पंचांगात मुहूर्त पाहून सोडायच्या, असे उत्तर रेल्वेने ठरवले आहे म्हणे. चला, एक धास्ती मिटली. बऱ्याचशा विमान-अपघातांनंतर दोन-तीन आगगाड्यांनाही अपघात झाल्याचे वाचले, तेव्हाच अस्मादिकांनी ओळखले होते की, वाहन-योगात वक्री असलेल्या राहू-केतूंची शांती केल्याखेरीज जेहत्ते कालाचे ठायी तरणोपाय नाही.

पण काय हो, आगगाडीचा धर्म हिंदू कशावरून ? आणि ज्या आगगाड्या हिंदू नसतील, त्यांना पंचांग पाहून सोडणे म्हणजे त्यांना बळजबरीने बाटविण्यासारखेच नाही का ? हिंदुस्थानातला माणूस जर धर्मनिरपेक्ष आहे, तर मशीन का नको ? या अशा यांत्रिक जातीयवादाचा निषेध करण्यासाठी एखादी आगगाडी उतारूसकट अल्लाच्या घरी किंवा आकाशातल्या बापाकडे गेली तर ? तेव्हा मला वाटते, आगगाड्यांचे हे हिंदू कोड अधिक व्यापक करायला हवे. ते नाहीच जमले तर एक शुद्धीकरण मोहीम आरंभून यच्चयावत आगगाड्यांना हिंदू करून घेतले पाहिजे. कदाचित काही अहिंदू गाड्या बंडखोर निघाल्याच तर त्यांच्या हृदय-परिवर्तनासाठी आचार्य रेल्वे-मंत्र्यांनी देशभर रेल्वे-यात्रा करावी.

● ● ●

# ज्ञान विज्ञान

## ☐ युवकांची अभिरुची

आधुनिक औद्योगिक समाजाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे आजकालचे तरुण १५ व्या वर्षीच वयात येतात! असा निष्कर्ष चेकोस्लाव्हाकियातील क्लोमाऊक येथील पालाकी विद्यापीठातील शिक्षण–शास्त्रज्ञांनी एका पाहणीवरून काढला आहे. 'युवकांचे जीवन व त्यांची अभिरुची' हा या शास्त्रज्ञांच्या संशोधनाचा विषय आहे.

पंधराव्याच वर्षी तरुण वयात येतो, याचा अर्थ मानसिक आणि अन्य दृष्टींनी जुन्या जमान्यापेक्षा दोन–तीन वर्षे अगोदरच मुलगा वयात येतो. १८ व्या वर्षी मताचा अधिकार देणाऱ्या लोकशाही सरकारांनी या बाबतचा गंभीरपणे विचार करायला हवा.

पाश्चिमात्य संशोधकांनी असा निष्कर्ष काढला आहे, की हल्लीच्या तरुणांना राजकारणात यत्किंचितही रस नाही. जुन्या पिढीतील माणसांविषयी आजचा युवक शंकाशील आहे. आजच्या जीवनात ध्येयहीन वृत्ती, गुंडगिरी व दादागिरी जास्त आढळते. चेकोस्लाव्हाकियातील तरुणांनाही राजकारणात रस घ्यावासा वाटत नाही. सामाजिक कार्यात रस घेण्याची वृत्तीदेखील दिवसेदिवस कमी होत आहे. ब्रूनो भागात पाहणी केली असता माध्यमिक शाळांतील ७० टक्के व विद्यापीठे आणि महाविद्यालये यांमधील ३३ टक्केच युवकांना सामाजिक कार्यात भाग घ्यावासा वाटतो.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांपाशी १४ टक्के व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांपाशी २० टक्के फुरसतीचा वेळ असतो. माध्यमिक शाळांतील शिक्षण संपवून विद्यार्थी कॉलेजात शिकायला जातात, तेव्हा ते सर्व सिनेमा पाहू लागतात. ८० टक्के विद्यार्थ्यांना नाटकाचाही षौक असतो. काहींना टेलिव्हिजन जास्त आवडतो. गटागटाने गप्पा झोडणे व सहली काढणे हेही षौक आढळतात.

अभिरुची व षौक यांची क्रमवारीच लावायची झाली तर ती अशी लावता येईल– पुस्तकांचे वाचन, चित्रपट, सहली, टेलिव्हिजन व नाटक.

गेल्या पिढीपेक्षा सध्याच्या पिढीत एक नवीनच काम उद्‌भवले आहे. हे काम आहे 'प्रणयाराधनाचे'! हल्ली प्रणयाराधनात युवक–युवतींचा खूपच वेळ जातो, असे आढळून आले आहे.

हल्लीचा युवक काव्याचा आस्वाद जास्त चांगल्या रीतीने घेत असतो. ऐतिहासिक कादंबऱ्या, प्रवासवर्णने वगैरेत त्यांना कमी स्वारस्य आहे. चित्रपटांतदेखील युवक-युवतींना हलकेफुलके मनोरंजक चित्रपटच जास्त आवडतात. शास्त्रीय संगीतापेक्षा त्यांना नृत्य जास्त आवडते.

युवकांपेक्षा युवती आपला फावला वेळ अधिक चांगल्या रीतीने घालवतात, असे दिसून आले आहे. याचे एक कारण असे असू शकेल की, पुरुष–कामगार–कारकुनांपेक्षा स्त्रीला फुरसतीचा वेळ ५० टक्के कमी असतो. समाजशास्त्रज्ञांनी असाही निष्कर्ष काढला आहे की, पुरुष–शिक्षकांपेक्षा स्त्री–शिक्षिका अधिक मन लावून काम करतात. केवळ सुरक्षित नोकरी मिळावी म्हणून पुरुष शिक्षकाचा पेशा पत्करतात, तर केवळ ज्ञानदान करावे, या उत्कट हेतूने स्त्रिया हे कार्य पत्करतात.

बालकांच्या विकासासाठी स्त्रिया जीव ओतून काम करतात. शाळांमधून फक्त शिक्षिकाच असाव्यात, अशी जोरदार शिफारस चेकोस्लोव्हाक समाजशास्त्रज्ञांनी केली आहे.

## □ स्वातंत्र्यातील शिक्षण

### पंधरा वर्षांत काय साधले, काय राहिले ?

तीन पंचवार्षिक योजना संपल्या. येत्या एप्रिलपासून आता चौथी योजना अमलात येईल. शिक्षणाच्या क्षेत्रात या पंधरा वर्षांत आपण काय साधले व अजून कोणती उद्दिष्टे गाठावयाची आहेत, याचा विचार श्री. जे. पी. नाईक यांनी 'भारतातील शैक्षणिक नियोजन' (एज्युकेशनल प्लॅनिंग इन इंडिया) या पुस्तकात केला आहे. "शिक्षणाचा सर्वत्र पायाच आमूलाग्र बदलला पाहिजे," असे पंतप्रधान पंडित नेहरूंनी १९४८ साली शैक्षणिक परिषदेपुढे केलेल्या भाषणात सांगितले होते. शिक्षणाच्या सर्व अंगांचा विचार करण्यासाठी त्याच वेळी एखादे कमिशन नेमले जावयास हवे होते, पण तसे घडले नाही. फक्त विद्यापीठ-शिक्षणाचा विचार करण्यासाठी राधाकृष्णन कमिशन नेमण्यात आले. त्यानंतर काही वर्षांनी माध्यमिक शिक्षण कमिशन नेमले, पण प्राथमिक शिक्षणासाठी कमिशनच नेमले नाही. शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी एक कमिशन तिसऱ्या योजनेच्या अखेरीस नेमण्यात आले. श्री. नाईक त्याचेच चिटणीस आहेत.

आपल्या लोकशाही घटनेत सर्व प्रौढांना मताचा हक्क देण्यात आला आहे. हा हक्क योग्य रीतीने बजावला जाण्याचे दृष्टीने निरक्षरतेचे उच्चाटन करण्याच्या मोहिमेवर भर दिला जावयास हवा होता, पण या बाबतीत आपली प्रगती फारच निराशाजनक आहे. तीन योजनांचे अखेरीस देशात फक्त २४ टक्के लोकच साक्षर आहेत. पाचव्या किंवा सहाव्या योजनेअखेर निरक्षरतेचे पूर्ण उच्चाटन केले पाहिजे,

असे श्री. नाईक यांनी सुचविले आहे.

सर्व प्राथमिक शाळांचे मूलोद्योग शाळांत रूपांतर करण्याचे सरकारने ठरविले; पण तिसऱ्या योजनेअखेर फक्त २१ टक्के शाळांचेच रूपांतर पूर्ण होईल. पण हे रूपांतर पूर्ण झाल्यानेही प्रश्न सुटणार नाही. मूलोद्योग शिक्षणाबद्दलच आज ओरड आहे. या योजनेचा मूळ उद्देश बाजूलाच राहिला असून मूलोद्योग शिक्षण रद्द करावे, अशी काहींची मागणी आहे. सहा ते चौदा वयाच्या सर्व मुलांना सार्वत्रिक मोफत शिक्षण मिळाले पाहिजे हे उद्दिष्ट घटनेत मान्य करण्यात आले आहे. तिसऱ्या योजनेअखेर या वय-गटातील फक्त ६० टक्के मुले शाळेत जाणारी आहेत. घटनेतील उद्दिष्ट आणखी १५ वर्षांत तरी गाठले पाहिजे, अशी श्री. नाईक यांची सूचना आहे. तिसऱ्या योजनेअखेर /१४ ते १७ वयाच्या मुलांपैकी फक्त १६ टक्के मुले माध्यमिक शाळेत जाणारी आहेत, हे प्रमाण १५ वर्षांत ४० टक्क्यांपर्यंत वाढविले पाहिजे, असे श्री. नाईक यांना वाटते. कॉलेजशिक्षणाच्या बाबतीत तर आपण फारच मागे आहोत. कॉलेजवयाच्या मुलांपैकी फक्त २.४ टक्के मुले तिसऱ्या योजनेअखेर कॉलेजात जाणारी आहेत. हे प्रमाण पंधरा वर्षांत निदान १० टक्क्यांपर्यंत वाढवावयास हवे, असे श्री. नाईक यांनी सुचविले आहे.

## प्रसार वरच्या थरातच जास्त

शिक्षणप्रसाराचा वेग तर समाधानकारक नाहीच, पण झालेला प्रसार मुख्यत: वरच्या थरातच आहे. या दृष्टीने सविस्तर पाहणी अजून झालेली नाही. पण खेडा जिल्ह्यातील एका पाहणीत असे दिसून आले की या भागात ब्राह्मण, बनिया व पाटीडाट या तीन जातींची वस्ती ३० टक्के आहे, पण शाळांमध्ये त्यांची मुले ७५ टक्के व कॉलेजांत ७० टक्के आहेत. उलट या भागात ६० टक्के वस्ती असलेल्या बरीगा जातीची फक्त ४ टक्के मुले शाळेत जातात.

सुशिक्षित बेकार निर्माण होऊ द्यावयाचे नसतील तर माध्यमिक शाळांतून निरनिराळ्या प्रकारच्या व्यवसायशिक्षणाची सोय झाली पाहिजे. पश्चिम जर्मनीतील शाळांत असे शिक्षण घेणारांचे प्रमाण ७० टक्के, जपानमध्ये ६० टक्के, तर भारतात फक्त १२ टक्के आहे. पाचव्या योजनेअखेर ते ४० टक्क्यांपर्यंत तरी वाढविले पाहिजे, असे श्री. नाईक यांना वाटते.

शिक्षणप्रसार म्हणजे केवळ शाळा-कॉलेजांची संख्या वाढविणे नव्हे, शिक्षणाचा कस व दर्जाही वाढविला पाहिजे. सध्याच्या एस्. एस्. सी. ला इंटरचा व बी. ए. ला एम्. ए. चा दर्जा आला पाहिजे, ही शिक्षण कमिशनचे अध्यक्ष डॉ. डी. एम्. कोठारी यांची सूचना या दृष्टीने विचारात घेण्यासारखी आहे.

आपली लोकशाही स्थिर पायावर उभी राहावयाची असेल, तर शाळेपासूनच लोकशाही मूल्ये विद्यार्थ्यांत बाणविली पाहिजेत. शिक्षक या बाबतीत आपली जबाबदारी कितपत पार पाडीत आहेत, याची पाहणी उदयपूरच्या विद्याभवन जी. एस्.

टीचर्स कॉलेजने केली. त्यात असे आढळून आले की, लोकशाही व लोकशाही प्रवृत्ती म्हणजे काय, याची शिक्षकांनाच स्पष्ट कल्पना नाही.

## □ कम्युनिझम व विचार–स्वातंत्र्य

पोलंडमधील एक प्राध्यापक अॅडॅम शाफ यांच्या 'मार्क्सिझम अॅंड दि इंडिव्हिज्युअल' ( मार्क्सवाद आणि व्यक्ती ) या नव्या पुस्तकाने त्या देशात खळबळ उडाली आहे. कम्युनिझमची मानवतावादाच्या पायावर उभारणी करण्याची सूचना त्यात केली आहे. सध्याच्या यांत्रिक-युगात बरीचशी कामे यंत्राच्या सहाय्याने करून घेतली जात आहेत. मोठ्या कारखान्यात काम करणारा कामगार गोंधळलेला दिसतो. आपले म्हणणे मांडता येत नाही, अशी चिंता नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसते. आपल्या मनासारखी पुस्तके प्रसिद्ध करता येत नाही, यामुळे आपण बाजूला पडलो आहोत, असे लेखकाला वाटते. या भावना कम्युनिस्ट देशातील लोकांमध्येही आढळतात. हा काही केवळ भांडवलशाहीचा किंवा स्टॅलिनवादी दडपशाहीचा अवशेष नव्हे, असे शाफ यांचे मत आहे. यांत्रिक युगातही समाजाला आपली गरज आहे, अशी भावना व्यक्तीत निर्माण करण्याच्या बाबतीत मार्क्सवादाने भांडवलशाहीवर मात केली पाहिजे, असे त्यांना वाटते. पोलंडमध्ये नागरिकांना अधिक प्रमाणात स्वातंत्र्य आणि मत–प्रकटनाची संधी दिली पाहिजे, अशी सूचना त्यांनी केली आहे. शाफ स्वतः कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे सभासद आहेत. त्यांच्या या पुस्तकाचे व त्यातील मतांचे कम्युनिस्ट पक्षात स्वागत झाले नाही. पक्षाच्या ठराविक चाकोरीबाहेर स्वतंत्रपणाने विचार करण्याचे व कोणी असे विचार मांडल्यास त्यावर मोकळेपणाने चर्चा करण्याचे धैर्य बहुसंख्य कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना अजूनही होत नाही, हाच याचा अर्थ. थोडी निराळी मते मांडल्याबद्दल एकदम पक्षद्रोही, जनताद्रोही, भांडवलदारांचा हस्तक असे शिक्के मारून प्रा. शाफ यांची मुस्कटदाबी अजून तरी करण्यात आलेली नाही, हे सुदैवच म्हटले पाहिजे.

इतर काही विचारवंतांना मात्र याबाबत शिक्षा झालेल्या आहेत. पक्षांतर्गत अधिक खुली चर्चा व्हावी व नवे अधिक धोरण स्वीकारावे, यासंबंधी काही योजनांचा पुरस्कार इतिहासाचे प्राध्यापक कॅरोल मॉझेलेव्हस्की यांनी केला होता. राष्ट्रहितास विघातक मतांचा प्रसार केल्याबद्दल त्यांना साडेतीन वर्षांची शिक्षा झाली. कोर्टात त्यांना हातकड्या घालून आणले होते. इटालियन कम्युनिस्ट पक्षाशी चर्चा करून वरील मते प्रा. मॉझेलेव्हस्की यांनी मांडली होती. त्यांच्याबरोबर आणखी तीन प्राध्यापकांनाही तीन वर्षांची शिक्षा झाली. स्टॅलिनच्या काळातील दहशत गेली असली तरी कम्युनिस्ट राष्ट्रांत मतस्वातंत्र्यावर अजून कसे निर्बंध आहेत, याचेच हे निदर्शक आहे.

● ● ●


# सावरकर पर्व

[ पृष्ठ १५ वरून चालू ]

सिद्ध करण्याचा. एकीकडे हिंदुराष्ट्रवादाचा आग्रहाने पुरस्कार करीत असतानाच सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादाचे स्वागत करण्याचीही अगदी प्रारंभापासूनच तयारी ठेवली होती. १९३६–३७ च्या सुमारास 'हिंदी राज्याचे नागरिक सर्वांआधी आम्ही होऊ, ही भूमिका मांडताना सावरकरांनी निःसंदिग्ध शब्दांत सांगितले होते,

"संयुक्त हिंदी राज्याचे स्वप्न जर पहिल्याने कोणाला पडले असेल तर ते हिंदूनाच होय. आपल्या त्यागांनी आणि झगडयांनी ते राज्य कोणी आजच्या व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेत आणले असेल तर तेही पुन्हा हिंदूंनीच होय. आपल्या बलाबलाचा योग्य विचार करून हिंदू हे एक समान नि संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या हेतूने चाललेल्या या सार्वलौकिक झगडयात आपल्या अहिंदुवर्गातील देशबांधवांची सहकारिता मिळविण्याला केव्हाही अनुकूलच होते व आहेत. हिंदुस्थानात आपली प्रचंड बहुसंख्या आहे, अहिंद धर्म आणि विशेषतः मुसलमान हे राष्ट्रीय झगडा चालू असताना कोठेच आढळत नाहीत नि झगड्याची फळे तोडण्याच्या वेळी मात्र नेमके आघाडीस असलेले आढळतात, आणि आपण एकटेच आजवर सर्व लढा लढत नि त्यातले आघात सोशीत आलो आहोत. या सर्व गोष्टींची जाणीव असूनसुद्धा ते एकीकडे ठेवून, हिंदू हे सर्वांचे संयुक्त हिंदी राष्ट्र बनविण्यास समुत्सुक आहेत, आणि आपले कोणतेही राखून ठेवलेले असे स्वतंत्र हक्क, वा सत्ता, वा अधिकार हिंदुस्थानातील अहिंदुवर्गावर मुळीच लादू इच्छीत नाहीत.

"पण ते हिंदी राज्य मात्र निर्भेळ हिंदीच असू द्या. त्या राज्याने मताधिकार, नोकऱ्या, अधिकाराची स्थाने, कर यांच्या संबंधात धर्माच्या व जातीच्या तत्त्वावर कसल्याही मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळीच थारा देऊ नये. कोणताही मनुष्य हिंदू आहे की मुसलमान आहे, की ख्रिस्ती आहे, की ज्यू आहे, इकडे लक्ष दिले जाऊ नये. या हिंदी राज्यातील सर्व नागरिक सर्वसामान्य लोकसंख्येतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेकडेवारी विचारात घेतली न जाता त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणांनुसार वागविले जाऊ द्या. इंग्लंड किंवा अमेरिकेतील संयुक्त संस्थाने यांसारख्या जगातील इतर प्रत्येक राष्ट्रात असल्याप्रमाणे देशातील प्रचंड बहुसंख्य लोकांना समजत असेल तीच भाषा नि तीच लिपी त्या हिंदी राज्याची राष्ट्रीय भाषा नि राष्ट्रीय लिपी होऊ द्या......कोणतीही जाती किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारात न घेता 'एक मनुष्य एक मत' असा सर्वसामान्य नियम होऊ द्या. अशा स्वरूपाचे हिंदी राज्य जर दृष्टीपुढे धरावयाचे असेल तर हिंदुसंघटनावादी, स्वतः हिंदुसंघटनांच्याच हितार्थ त्या राज्याला अंतःकरणपूर्वक पहिल्याने आपली निष्ठा अर्पितील."





यावरून स्वच्छ दिसते, की ध्येय म्हणून हिंदी राष्ट्रवाद सावरकरांना केव्हाच अमान्य नव्हता; परंतु वस्तुस्थितीकडे डोळेझाक होऊ नये, हा त्यांचा आग्रह होता. कॉंग्रेसप्रणीत हिंदी राष्ट्रवाद अनुनयापोटी, भीतीपोटी जन्मास आला आहे, ही सावरकरांची टीका होती. त्यांना हिंदी-राष्ट्रवादाची स्वाभाविक परिणती अभिप्रेत होती. पण परिणतावस्थेला पोचलेला हिंदी राष्ट्रवाद तर सोडाच, स्वाभाविक व सहजस्वरूप हिंदुराष्ट्रवादही त्या काळात बहुसंख्य जनतेला मानवणारा नव्हता. असे का असावे ? कुठल्याही मत्सरोत्तेजक भेदाभेदांना थारा न देणारा, व्यक्तीचे गुण हीच एकमेव कसोटी मानणारा, राष्ट्रवादाच्या मुळाशी असणारा आधुनिक ऐहिकनिष्ठ हिंदुसमाजच त्या काळी भारतात विकसित झालेला नव्हता. हिंदुस्थान हा शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिशांची वसाहत बनलेला देश होता. म्हणजेच येथील स्वतंत्र आर्थिक कर्तृत्व मारले गेले होते. स्वतंत्र कारखानदारी येथे वाढू शकत नव्हती, स्वतःच्या कर्तृत्वावर पुढे आलेला स्वतंत्र वाण्याचा औद्योगिक समाज येथे अस्तित्वात येऊ शकत नव्हता. असा समाजच आपल्या ऐहिक विकासाच्या आड येणारी जातीबंधने, धार्मिक रूढी इत्यादी भेदाभेदांची बंधने झुगारून आपल्या प्रगतीची वाट मोकळी करून घेत असतो, केवळ अंगच्या कर्तृत्वावर व प्रयत्नांच्या बळावर पुढे येण्याची



ईर्षा बाळगू शकतो. 'गुण' हीच एकमेव कसोटी मानून आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनाची नवी घडी बसविण्याचा धीटपणा प्रकट करीत असतो. राष्ट्रवाद हे अशा स्वयंप्रज्ञ, गतिशील असा नव्या मध्यमवर्गाचे तत्त्वज्ञान आहे व जोपर्यंत असा वर्ग सामाजिक जीवनात प्रभावी होत नाही, तोपर्यंत निर्भेळ राष्ट्रवादाचा आविष्कारही अपूर्ण व खंडितच राहत असतो. सावरकर जेव्हा हिंदुराष्ट्रवादाचा विचार मांडीत होते, तेव्हा तो ग्रहण करणारा असा गतिमान नवा मध्यमवर्गच देशात मोठ्या प्रमाणावर उदयास आलेला नव्हता, पारतंत्र्यामुळे तो येऊच शकत नव्हता. येथे होता तो परकीय नोकरशाहीने पोसलेला कमकुवत पांढरपेशा सुशिक्षित समाज–जो विचाराने जरी सावरकरांच्या मागे जाणारा असला तरी कोणतीही लढाऊ कृती करण्यास असमर्थ होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास आपल्या राष्ट्रीय क्रांतीतील हा कमकुवतपणा स्पष्ट झाला. देशाची फाळणी कोणीही टाळू शकले नाही. गांधी–नेहरू काय किंवा सावरकर–सुभाष काय, कोणालाच फाळणी मनापासून नको होती. मुसलमानांची अरेरावी व अराष्ट्रीय वृत्ती समजत होती, पण फाळणीचे संकट टाळायचे तर या अरेरावी अल्पसंख्याकांनी फेकलेले अराजकाचे, रक्तपाताचे, जातीय व धार्मिक दंगलीचे आव्हान स्वीकारून या अराष्ट्रीय प्रवृत्तीशी समोरासमोर झुंज देण्याइतका येथील 'राष्ट्रीय' समाज प्रगल्भ व प्रखर असायला हवा. गांधी–नेहरू ब्रिटिशांच्या दडपणांना बळी पडले, लीगच्या अराजकाच्या व रक्तपाताच्या धमकावण्यांपुढे त्यांनी गुढगे टेकले हे खरेच; पण हेही खरे नव्हे का, की सर्व हिंदुत्वनिष्ठ संस्थाही फाळणी घडून येत असता स्वस्थ राहिल्या ? सशस्त्र, निःशस्त्र अहिंसक–कोणत्याही मार्गाने फाळणीविरुद्ध प्रतिकाराचे आंदोलन उभारणे यांना का अशक्य वाटले ? लढाऊ विचार असला, तरी लढाऊ कृती करणारा 'राष्ट्रीय' समाज या संघटनांच्या मागे तेव्हा नव्हता, हेच या अक्रियेचे कारण असू शकते. लिंकन जेव्हा दक्षिण अमेरिकेचे बंडाचे, यादवी–युद्धाचे आव्हान स्वीकारतो, तेव्हा त्याच्यामागे उद्योगप्रधान उत्तर अमेरिकेचा प्रगत मध्यमवर्ग उभा असतो. आमच्याकडे हा वर्ग नव्हता, असा कृतिशील समाज नव्हता, त्यामुळे लिंकन असूनही त्याला शेवटी नमावे लागले. हिंदुराष्ट्रवाद तात्त्विकदृष्ट्या अचूक असूनही व्यवहारतः अपयशी ठरला. हिंदी–राष्ट्रवाद तर अस्तित्वातच नव्हता, त्यामुळे त्याचा विचार करण्याचेच कारण नाही.

## ☐ धन्यता, कृतार्थता !

गेल्या १७ वर्षांत, स्वतंत्र भारतात औद्योगीकरणामुळे हा नवा प्रगत मध्यमसमाज उदयास येत आहे. सावरकरांच्या व्यावहारिक यशाची व मान्यतेची ही पायाभरणीच सुरू आहे. सावरकरपर्व आता दूर नाही, कारण समर्थ भारत आता सर्वांचेच साध्य झालेले आहे. ३८ च्या सावरकरांनी दोन घोषणा दिल्या. राजनीतीचे हिंदु-

करण आणि हिंदूंचे सैनिकीकरण. पैकी उत्तरार्ध देशाने मान्य केला. शासनाने सैनिकीकरणाचा अवलंब केला, अगदी सावनशुचिताप्रिय समाजवाद्यांनीही त्याचा पुरस्कार मांडला. ३८ चे सावरकर मान्य नसणाऱ्या या पोक्त आणि पुरोगामी मंडळींची काय ही दैना ! नुकत्याच घडलेल्या भारत-पाक संघर्षात भारतीय फौजा लाहोरमध्ये घुसविण्यात आल्या नाहीत, याबद्दल या मंडळींनी भारत सरकारवर कठोर टीका केली आहे ! चीनने आणखी आगळीक केल्यास तिबेटमध्ये सैन्य घुसवा, असाही यांचा भारत सरकारला सल्ला आहे ! पाकिस्तानच नष्ट केले पाहिजे, असाही या मंडळींचा नवा पवित्रा आहे. काळाने इतक्या लवकर आपला सूड उगवावा ! ६८ साल उजाडण्यापूर्वीच सावरकरांनी यांची अशी दांडी उडवलेली पाहून मोठी मौज वाटते, करमणूक होते. राहता राहिले सावरकरांचे हिंदुत्व. देश जसजसा स्वावलंबनाच्या दृष्टीने प्रगती करू लागेल, या भूमीच्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाला जसजसा आकार व आशय प्राप्त होऊ लागेल, तसतसा येथील जनमानसाच्या मुळाशी असणारा हिंदुत्वाचा मूळ संस्कारच प्रबळ होईल; किंबहुना या संस्काराची बीजभूमी घट्ट पकडल्याशिवाय या देशाचे स्वप्न जागेच होऊ शकणार नाही, स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता या केवळ घोषणाच राहतील. हाच हिंदुत्वाचा वन्ही चेतवावा, हेच बीज फुलवावे, अशी धारणा वाढत जाईल. मग भले त्याला कोणी 'भारतीय' हे नाव देवो किंवा 'हिंदी' या नावाने ओळखो. या नावांच्या आत दडले असेल—कधी सुप्तावस्थेत तर कधी प्रकट—ते सावरकरांचे 'हिंदुत्व'च असेल. शंका आहे सावरकरांचा बुद्धिवाद, सावरकरांची विज्ञाननिष्ठा येथे कितपत रुजेल याची ? सावरकरांचे निर्भय पुरोगामित्व, विज्ञानाधिष्ठित बुद्धिवाद येथे रुजला नाही तर त्यांचे सैनिकीकरण, त्यांचे हिंदुत्व येथील सनातनी प्रतिगाम्यांच्या कोठडीत बंदिस्त होण्यास वेळ लागणार नाही. म्हणून सावरकरांचा हा बुद्धिवादी वारसा, त्यांची सामाजिक समतेची आणि स्वातंत्र्याची आकांक्षा येथे प्रज्वलित राहण्याची नितांत आवश्यकता आहे. बाकीचे सर्व सावरकर मान्य होतील, तोफांच्या चौघड्यांनी त्यांच्या शताब्दया भावी पिढ्या साजऱ्या करतील—कदाचित त्यांना प्राणाहून प्रिय असणाऱ्या त्या सुरसरित सिंधूच्या विस्तीर्ण तीरावरही हे घडून येईल; पण तेव्हा, विजयाच्या त्या अत्युत्कट क्षणी, आमच्या एका हातातील धगधगत्या अग्निगोलकांबरोबरच आमच्या दुसऱ्या हातात सामाजिक समतेसाठी निर्भयतेने झुंजणारी सावरकरी बुद्धिवादाची तळपती असिलता चमकत असेल काय ? ती तशी त्या वेळी असेल तर सावरकरांचे जीवन सर्वार्थाने धन्य झाले, कृतार्थ झाले, असेच म्हणावे लागेल.

● ● ●

## ‘मि झो रॅ म’

[पृष्ठ १७ वरून चालू]

या मुलखावेगळ्या यंत्रणेमुळे या जिल्ह्यातील लोकांच्या स्वतःबद्दलच्या कल्पना भलत्याच विथरलेल्या आहेत. आपल्याला खूष राखण्यासाठी भारत सरकार राज्य-सरकारकरवी झकत आपल्याला पैसा देईल, अशी भाषा येथील लोक खुशाल बोलत असतात. त्यांचे नेते दोन. एकाचे नाव लाल डेंगा आणि दुसऱ्याचे लाल मुन्माविआ. लाल म्हणजे नेता. या दोन्ही नेत्यांना एकदा पाकिस्तानशी संगनमत केल्याच्या आरोपावरून आसाम सरकारने पकडलेही होते. पण वाऱ्याचा बदललेला रोख पाहून दोघेही माफी मागून बाहेर आले मागच्या वर्षी. परंतु आधी त्यांनी ही जिल्हा परिषद-प्रणीत स्वायत्तता अपुरी आहे, असे टुमणे लावून नेहरूंकडून पुन्हा एक अभिवचन काढलेच. १९६४ मध्ये या सर्व सहाही डोंगरी जिल्ह्यांना स्कॉटलंडला ब्रिटनमध्ये आहे तशा स्वरूपाची स्वायत्तता आसमान्तर्गत द्यायचे नेहरूंनी कबूल केले आणि त्यासाठी ना. हरिभाऊ पाटसकर यांच्या अध्यक्षतेखाली एक मंडळ नेमले. या ठिकाणीही पाश्चात्त्य वातावरणात वाढल्यामुळे तिकडील इतिहासाचे आणि अनुभवाचे अनुकरण करण्याचे नेहरूंना नेहमीच वाटत आलेले आकर्षणच प्रभावी ठरले, हे लक्षात घेतले पाहिजे. परंतु स्कॉटिश स्वायत्तता खुद्द स्कॉटलंडच्या लोकांनाही मोठीशी पसंत नाही आणि ब्रिटिश प्रसिद्धी अधिकारी त्या सरकारच्या खर्चाने तेथे जाणाऱ्या पत्रकारांना व इतर लोकप्रतिनिधींना स्कॉटलंडमध्ये नेण्यास मोठेसे उत्सुक नसतात, हे सत्य या मिझोंना चांगले माहीत असल्याचे पाटसकर मंडळाच्या निदर्शनास आले आहे. आणि ती व्यवस्था आपल्याकडील या गिरिजन जमातीच्या विविध प्रकृतिधर्माच्या लोकांना सरसकट कशी लागू करता येईल, हा त्या मंडळापुढेही मोठा प्रश्न आहे.

### निवडणुकांचे राजकारण

मध्यंतरी काही घटना अशा घडल्या की त्यातून राज्यकर्त्यांच्या दूरदर्शीपणाचा प्रत्यय यायला हवा तसा आलाच नाही. भाषावार प्रांतरचनेचे नाव बदलून राज्य-पुनरचनेचा जो पसारा १९५४–५६ या काळात पसरण्यात आला, त्या वेळी जिल्हा परिषद–प्रणीत कारभार चालवीत असलेल्या या जिल्ह्यांतील मंडळींनी पूर्व भारत आदिवासी संघ या आपल्या संस्थेमार्फत राज्यपुनर्रचना मंडळापुढे वेगळ्या डोंगरी राज्याची मागणी मांडली. त्या वेळी आसाम सरकारशी सहकार्य करणारी मिझो युनियन ही मिझो संघटना, कॉंग्रेसचीच मिझो जिल्ह्यातील शाखा म्हणून काम करीत होती. काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्स कॉंग्रेसमध्ये विलीन होण्यापूर्वी-पर्यंत काम करीत होती ना, तशीच ही मिझो युनियन तिथे काम करीत होती. पण या मिझो युनियननेही वेगळ्या डोंगरी राज्याच्या मागणीला पाठिंबा देऊन कॉंग्रेसला चांगलाच शह दिला. तरीही त्यातून घ्यायचा तो बोध न घेता ५६ मध्ये

राज्यपुनर्रचना झाल्यानंतर या जिल्ह्यातील असंतोषाची उपेक्षाच नव्हे, तर उपमर्द करून १९५७ च्या निडणुकीत काँग्रेसने मिझो युनियनला सर्वत्र तीन जागा लढवायला सांगितल्या. मिझो युनियनने स्वतंत्र मिझो राज्याला विरोध मांडून निवडणुकीच्या रिंगणात पाऊल टाकले. तिच्या विरुद्ध लढणाऱ्या युनायटेड मिझो फ्रीडम ऑर्गनायझेशनने मिझो युनियनच्या उमेदवाराचा पराभव केला.

१९६२ च्या निवडणुकी होण्यापूर्वी आसामी ही राज्य सरकारच्या कामकाजाची भाषा करण्यात येताच या जिल्ह्यातील लोक दंगे करून उसळले. त्या वेळी पूर्व भारत आदिवासी संघाचे रूपांतर होऊन सर्वपक्षीय डोंगरी नेते परिषद स्थापन झाली. तीत काँग्रेसवालेही सामील झाले. ६२ च्या निवडणुका या परिषदेच्याच तिकिटावर लढवण्यात आल्या. मिझो युनियनवालेही परिषदेत सामील झाले. आज बंड करून उठलेली मिझो नॅशनल फ्रंट त्या वेळी जन्माला आली होती. पण ६२ च्या निवडणुकीत तिने सपशेल मार खाल्ला. परंतु १९६३ मध्ये डोंगर भागातील दोन सभासदांच्या निधनामुळे पोटनिवडणुका झाल्या आणि त्यात फ्रंटने सर्वपक्षीय परिषदेचा धुव्वा उडवून दोन्ही जागा जिंकल्या. या निवडणुकीत मिझो फ्रंटचे घोषवाक्य एकच होते – 'मिझोरॅम.' याच सुमारास मिझो युनियनच्या मुखाने काँग्रेसवाल्यांनी पुन्हा एक चूक केली. त्यांनी मिझो युनियनलाही वेगळ्या मिझो राज्याचा पुरस्कार करण्याची परवानगी दिली. परंतु हे वेगळे मिझो राज्य भारतीय संघराज्यांतर्गतच राहायचे होते. अशा प्रकारे 'मिझोरॅम' विरुद्ध 'मिझो' राज्य असा केवळ शब्द–भिन्नत्वाचा परंतु समान अर्थाचा हास्यास्पद घाट तिथे रचला गेला. कारण, नकळत काँग्रेसवाल्यांनी मिझो लोकांना स्वतंत्र राज्य हवे आहे, हे नुसते जाणलेच नव्हे, तर पर्यायाने मान्यही केले असाच त्याचा अर्थ झाला. फ्रंटवाल्यांनी यास आपला नैतिक विजय मानले आणि स्वातंत्र्य मिझोरॅमच्या मागणीला आणखी नेट दिला आणि मिझो युनियनला स्वतंत्र मिझो राज्याच्या नावाखाली ६४ च्या पोटनिवडणुकीत मिळालेल्या एकुलत्या जागेवरूनही तिचा प्रभाव कसा लोप पावेल, याचाच ध्यास घेतला. त्याच सुमारास नेहरूंनी पाटसकर–मंडळाची घोषणा केली. पण आता उशीर झालेला होता. कारण खुद्द मिझो युनियननेही या नेहरू–योजनेस पाठिंबा दिला नाही. अशा परिस्थितीत पाटसकर–निवाडा मिझोंना कितपत पटेल याची शंकाच आहे.

या सर्व घटना गेल्या १७-१८ वर्षे हळूहळू घडत आल्या आहेत. परंतु केंद्र सरकारने गंभीरपणे त्यांचा ठाव शोधण्याचा कधी प्रयत्न केला असेल, असे मानायला जागा नाही. प्रश्न घसासच नव्हे तर अगदी गळ्यास येईपर्यंत तो कुजत ठेवायची तीच ती अभद्र व जीवघेणी परंपरा सरकार सोडायला तयार नाही. आसाम सरकारचे दंडनियंत्रण या मिझो जिल्ह्यांत असून नसून सारखेच आहे. या राजकीय गुंत्याहून अगदी वेगळी अशी आणखी एक वस्तुस्थिती येथे सांगणे अगत्याचे आहे. मिझो जिल्हा कचेरीत आणि इतरही सरकारी कचेऱ्यांतून कनिष्ठ जागांवर असणारी

कारकून वगैरे मंडळी राजरोसपणे ब्रह्मदेश व पाकिस्तान यांच्याशी उंची कापडचोपड, सोने, घड्याळे वगैरे मौल्यवान वस्तूंचा चोरटा व्यापार करीत असतात. एकाही अंमलदाराची त्यांच्यावर कायदेशीर इलाज करण्याची प्राज्ञा नाही. लगतच्या काचार आणि मणिपूर व त्रिपुरा 'या केन्द्रशासित प्रदेशांतही कित्येक सरकारी कचेऱ्यांतून मिझो लोक नोकऱ्यांवर आहेत. सर्वात जास्त सुशिक्षित असल्यामुळे नोकऱ्यांत त्यांचे प्रमाण जास्त असणे क्रमप्राप्तच आले. या सर्व लोकांच्या निष्ठा मिझोरॅमला वाहिलेल्या असल्याचे माहीत असतानासुद्धा सरकारचे 'गुप्त डोळे' तिकडे डोळेझाक करीत आले आहेत. नुकत्याच झालेल्या दंगलीत पहिल्या झपेसरशी सर्व सरकारी कचेऱ्या लुळ्या पडल्या आणि एसडीओ व जिल्हा अधिकाऱ्यां-पर्यंतचे अधिकारी 'बेफाम' झाले, हे याच अवस्थेचे द्योतक नाही काय ?

### प्रोत्साहनाचा अभाव

या परिस्थितीत भारतान्तर्गत मिझो राज्याची मागणी करणाऱ्या मिझो युनियनचे हात बळकट करून फ्रंट फोडण्याचा साधा राजकीय डाव खेळणे अत्यंत अगत्याचे होते. पण घोतर पेटल्याशिवाय लागलेल्या आगीची दखल न घेणे हा जणू राज्यकर्त्यांचा स्थायिभाव झालेला असल्यामुळे आता ते जागे झाले आहेत. आणखी एक धावता दृष्टिक्षेप या प्रदेशातील घटनांवर टाकला तर असे आढळेल की राज्यपुनर्रचना मंडळाने 'केन्द्रशासित प्रदेशांची राष्ट्रीय उद्याने' (National parks of centrally Administered Territories) ठिकठिकाणी निर्माण करायला तीव्र विरोध केला असताही सरकारने या भागात चांगली चार 'उद्याने' –ईशान्य सरहद्द भाग, नागालॅण्ड, मणिपूर आणि त्रिपुरा– निर्माण करून मिझो लोकांनाच तो 'हक्क' नाकारला आहे. आपल्या शेजाऱ्याला, तो आपल्याच सारखा असताना वेगळे राज्य मिळाले, हे पाहिल्यानंतर आसामपासून भौगोलिक-दृष्ट्या वेगळ्या पडलेल्या मिझो जिल्ह्यानेच काय व का पाप केले आहे, असा साधा प्रश्न तेथील लोकांच्या मनात एकसमयावच्छेदेकरून उठला आहे आणि आसाम वा केन्द्र सरकारजवळ त्याचे समाधानकारक उत्तर नाही. बरे, आसाम राज्याचा घटक राहिल्यामुळे गेल्या अठरा वर्षांत काय फायदा झाला, असा विचार केला तर फक्त ऐजल या जिल्हाकेन्द्रापर्यंत सिलचरहून येणारा एकमेव पक्का रस्ता, ख्रिश्चन धर्म-प्रसारकांनी चालवलेल्या शाळा व दवाखान्यांव्यतिरिक्त सरकारी यंत्रणेतर्फे या सोयींची जवळजवळ नसल्याइतकीच व्यवस्था, दिल्लीहून शासन करणाऱ्या मंत्र्यां-पैकी एकाचेही या उभ्या अठरा वर्षांत कधी चुकूनही दर्शन नाही, शिलाँग व गोहत्तीचा संबंधही जेमतेमच. इंग्रजांच्या पुढाकाराने रबर, चहा, कॉफी व संत्री यांची बागाईत सुरू झाली असूनही त्यांच्या विकासाला योजनाबद्ध प्रोत्साहन नाही. माग-ण्यांची दखल नाही की गाऱ्हाण्यांची दाद नाही. अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्वातं-त्र्याशी तादात्म्य निर्माण व्हावे कसे ?

ही परिस्थिती वर्तमान आसाम सरकारच्या आवाक्याबाहेरची आहे. याचे कारण असे की आसाम स्वतःच आपला हवा तसा विकास करू शकलेला नाही. केंद्र आसामची उपेक्षा करते, त्याच्या औद्योगिक विकासाबाबत त्याला आस्था नाही, असा उघड आरोप त्या राज्यातील मंत्री दिल्लीला आले की करीत असतात. अशा परिस्थितीत आसाम सरकार मिझो जिल्ह्याच्या विकासाकडे कितीसे लक्ष पुरवू शकणार ? शिवाय या सर्व विकासाची जबाबदारी केंद्रानेच घ्यायची तर मग राज्य सरकारचा संबंध हवा कशाला आणि त्या परिस्थितीत स्थानिक जिल्हा परिषदांना मुलखावेगळी स्वायत्तता देणाऱ्या घटनेच्या सहाव्या परिशिष्टाचे काय ? असे सगळेच त्रांगडे या डोंगरी जिल्ह्यांच्या बाबतीत निर्माण झाले आहे. सशस्त्र उठाव करून किंवा त्याचे पारिपत्य करून हा प्रश्न सुटणार नाही. त्याला राजकीय निरगाठीची उकल करण्याची आणि पुन्हा गुंता होऊ न देण्यासाठी दूरगामी उपाय योजण्याची दूरदर्शिता व खंबीर निर्णय यांची आवश्यकता आहे.

## पुनर्रचना हवी

वस्तुत: ब्रिटिश काळी कूपलॅण्डसाहेबाने ब्रह्मदेशात आणि आता पाकिस्तानात गेलेल्या भागातील आणि आसामातील गिरिजन जमाती लोकांची एक स्वतंत्र ब्रिटिश वसाहत स्थापण्याची योजना मांडली होती. भारताच्या फाळणीच्या काही काळ आधी ही योजना पुढे आली होती. त्याच ब्रिटिशांच्या धर्मप्रसारकांच्या साह्याने या मंडळींना शिकवून मोठे करण्यात आले आणि त्यांच्याच दीर्घसूत्रीपणामुळे त्या मिझो लोकांच्या मनात स्वतंत्र मिझोरॅमची आकांक्षा रुजवण्यात आली. १९३५ च्या घटना कायद्यात ब्रिटिशांनी मुळी या लुशाई टेकड्या भागास भारतीय प्रदेशातून वगळूनच टाकले होते आणि ब्रिटिश पार्लमेंटच्या वतीने व्हाइसरॉयचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर त्या भागाचा कारभार पाहायला नेमला होता. हा सर्व इतिहास दिल्लीश्वरांनी विसरून चालणार नाही. आता परिस्थिती बदलली आहे. स्वतंत्र भारताच्या सरकारने आता त्याच कूपलॅण्ड योजनेला जरा वेगळे रूप देऊन एखादी नवी ' इंदिरा-योजना ' किंवा ' पाटसकर-योजना ' काढून या संपूर्ण पूर्वांचल प्रदेशाची पुनर्रचना करण्यास उशीर लावू नये. ईशान्य सरहद्द भाग आणि खाशी, जयन्तिया, मिकिर व आसाम मिळून एक आणि नागालॅण्ड, मणिपूर, काचार, गारो, त्रिपुरा व मिझो हे जिल्हे मिळून दुसरे अशी दोन नवी घटक राज्ये निर्माण करून ही कटकट मिटविणे अगदीच अशक्य नाही.

भारतातील कोणताही प्रदेश सार्वभौम करण्याची भाषा व्यर्थ आहे असे शस्त्राने आणि शास्त्राने, शराने आणि शापाने, बंडखोरांनाच नव्हे तर सर्व जगाला पटवून देण्याचे सामर्थ्य आणि मुत्सद्देगिरी केन्द्र सरकारने दाखवलीच पाहिजे. हे करायला १८ वर्षांचा उशीर झाला आहेच. आता आणखी उशीर हा देशहिताला मारक ठरल्याशिवाय कसा राहील ?

● ● ●

# हिरवा चुडा

## जुन्या भट्टीतले नवे रसायन

दरिद्री आबा कुलकर्ण्यांची निर्मला ही थोरली लेक. फी भरावयास पैसे नसल्यामुळे कॉलेज सोडण्याची तिच्यावर पाळी येते. फीचे पैसे उभारण्यासाठी निर्मलाची मैत्रीण तिला एक मार्ग सुचविते अन् अगतिक झालेली निर्मला त्या मार्गावरून वाटचाल सुरू करते. चित्रकार विलासपुढे ती मॉडेल म्हणून उभी राहते.

एक दिवस आबांना ही गोष्ट कळते आणि ते खवळून उठतात. "कुलकर्ण्यांच्या घरातल्या कोणत्याही स्त्रीने आतापर्यंत नोकरी केलेली नाही. पैशासाठी ती परपुरुषापुढे उभी राहिली नाही." परंतु दारिद्र्याने खवळलेल्या आबांना वस्तुस्थिती भानावर आणते. निर्मलाही त्यांची समजूत घालते. ("आबा, माझ्यावर विश्वास ठेवा. माझ्या हातून गैर काहीच घडणार नाही.")

परंतु ही गोष्ट पुढे तितकीशी खरी ठरत नाही. निर्मला विलासवर प्रेम करू लागते आणि एका बेसावध क्षणी विलास तिच्या हातात हिरवा चुडा भरतो. बोलपटाचे नाव प्रेक्षकांवर बिंबविण्यासाठी केवढा हा अट्टाहास. विलास आणि निर्मला यांच्या प्रणयचेष्टा आबांच्या कानावर जातात आणि पुन्हा एकदा हा दरिद्री म्हातारा भडकतो. निर्मला पुन्हा एकदा त्यांची समजूत घालते. ("आबा, ते किनई फारफार चांगले आहेत.")

परंतु लवकरच तिचा भ्रमनिरास होतो. विलास गाव सोडून निघून जातो आणि निर्मला बदनाम होते. तिचे लग्न कसे जुळवावे या चिंतेने आबा हैराण होतात. शेवटी सोनगावच्या इनामदाराच्या मुलाशी निर्मलेचे लग्न ठरते. मुलगा मुका आहे, हे लग्नमंडपात आबांना कळते आणि लग्न मोडण्याची भाषा ते बोलू लागतात. येथे निर्मलेने वडिलांना आणि प्रेक्षकांना उद्देशून केलेले आणखी एक प्रवचन आपल्याला ऐकावयास मिळते अन् अपेक्षेप्रमाणे ताशा-वाजंत्रीच्या सुरात मध्यंतर होते.

निर्मलेचे वैवाहिक जीवन सुरू होते. मुका पती, समजूतदार सासरा, खाष्ट सासू आणि तारुण्याच्या सीमेवर रेंगाळणारी नणंद यांच्या भोवती तिची जीवन-कथा सुरू होते. पुन्हा योगायोगांचे आणखी एक पर्व घडते अन् त्यात सर्पदंशामुळे तिच्या सासऱ्याचे निधन होते. मुक्या पतीस वाचा येते. खाष्ट सासूच्या छळाला ऊत येतो. निर्मला सोनगावात असल्यामुळे विलासनेही तेथे येणे क्रमप्राप्तच ठरते. विलास

आपल्या ठरीव तंत्राचा येथेही अवलंब करतो. या वेळी त्याच्या जाळ्यात सापडते शीला–निर्मलेची नणंद.

शीला विलासकडून हिरव्या चुड्याचा स्वीकार करते. निर्मला शीलेला सावध करण्याचा प्रयत्न करते. पण शीला हे सारे ऐकण्याच्या पलीकडे गेलेली असते. (" वहिनी, ते किनई फाऽऽर चांगले आहेत.") परंतु या साऱ्या प्रकारात निर्मला पुन्हा एकदा बदनाम होते आणि नवऱ्याच्या रोषाला बळी पडलेली निर्मला माहेरी परतते. नवऱ्याने टाकलेली बदफैली स्त्री म्हणून तिचा उल्लेख होऊ लागतो.

विलासकडून दिवस गेलेल्या शीलाने आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, ही बातमी कळताच निर्मला चवताळून उठते. त्याच अवस्थेत ती सोनगावला येते आणि विलासच्या घरी जाऊन त्याला चाबकाने फोडू लागते. यापुढचा कथाभाग सांगावयास पाहिजेच असे नाही. निर्मलेच्या नवऱ्याचा गैरसमज दूर होतो. पश्चात्तापदग्ध विलास शीलाचा स्वीकार करतो आणि All is well that ends well या युक्तीची सार्थकता पटविणारा हा बोलपट संपतो. डोळे टिपत बोलपट पाहणाऱ्या (स्त्री) प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर समाधान सांडलेले असते.

### जुने नवे

या बोलपटात नवीन काय आहे, असला खुळचट प्रश्न कोणी विचारू नये, हे चांगले. ' एकच प्याला ' मधील सिंधूच्या मूळ रसायनात कालमानाप्रमाणे थोडासा फरक केला की नव्या बाटलीतील ही जुनी दारूही आपल्या प्रेक्षकाला कैफ आणण्यास पुरेशी ठरते, हा व्यावहारिक हिशोब आपल्या लेखकांप्रमाणे निर्मात्यांनाही पाठ असतो आणि येथे तर लेखकच निर्माता झाला आहे. एका लेखकाने चित्रपट-निर्माता होण्याची जिद्द बाळगावी आणि अल्पावधीतच ती पुरी करावी, याबद्दल हिराकांत कलगुटकरांचे अवश्य अभिनंदन करावयास हवे. परंतु एक लेखक या बोलपटाचा निर्माता आहे, अशी चुकूनदेखील जाणीव होणार नाही, याची दक्षता त्यांनी घेतली आहे. त्यामुळे नव्या लेखकाचा नवा प्रयोग, असे स्वरूप या बोलपटास लाभण्या-


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

ऐवजी 'पात्रे नवी, कथा जुनी' हेच विशेषण या बोलपटास लागू पडते.

निर्मात्याची ही दृष्टी दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांनाही लाभलेली आहे. त्यामुळे या तरुण दिग्दर्शकांनीही बोलपटाला 'नवेपण' न आणण्याची खबरदारी घेतली आहे. दिग्दर्शकाने आपल्या प्रतिभेने एखादा प्रसंग उंचावला आहे, असा प्रकार येथे घडलेला नाही. सारे काही बटबटीत, स्थूल आणि भडक. नवराबायकोचा खासगी संवाददेखील गर्दीच्या टोकाला ऐकू जाईल, इतक्या मोठ्या रीतीने ध्वनिमुद्रित केलेला, मग कॅमेऱ्याच्या सहाय्याने काही घटना सूचित केल्याचा अनुभव येणे कठीण.

मराठी बोलपट अजूनही नाटकातून बाहेर पडलेले नाहीत, हे प्रकर्षाने जाणवते ते अशा वेळी. पिटातल्या प्रेक्षकालाही सारे काही ऐकू गेले पाहिजे व समजले पाहिजे, याच अट्टाहासाने सारे चित्रीकरण होत असते. दिग्दर्शकाच्या या कल्पनेला एक जयश्री गडकरचा उल्लेखनीय अपवाद सोडला तर नवीन साऱ्या कलाकारांनी मन:पूर्वक साथ दिलेली आहे. चित्तरंजन कोल्हटकर काय, रमेश देव काय, किंवा दादा साळवी, वसंत शिंदे यांच्यासारखे जुने अनुभवी नट काय, चेहेऱ्याने बोलावयाचे साफ नाकारतात. साऱ्यांची मदार संवादावर आणि तेही वरच्या पट्टीतले.

पैशाचा सवाल नसणाऱ्या क्षेत्रांतील ही अवस्था, मग पैशाने रडगाणे गाणाऱ्या छायाचित्र, ध्वनिलेखन, कलादिग्दर्शन आदि तांत्रिक विभागांविषयी न बोललेलेच बरे.

**तरीही......**

जयश्री गडकरच्या अभिनयाप्रमाणेच बी. माजनाळकर या नवोदित कलाकाराची लहानशीच भूमिका व जगदीश खेबुडकरांची भाववाही गीते ही 'हिरव्या चुडया'ची आणखी एक जमेची बाज. खेबुडकरांच्या गीतांना समर्थ स्वरकार लाभला असता तर ती आल्पावधीतच लोकप्रिय झाली असती. असो.


हे सारे असले तरीही आपण मराठी बोलपट पाहावयाचा असतो.........

तो मराठी भाषेत असतो म्हणून. ● ● ●

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.


अरे माझे 'पोलादी' हात
तरी कोणी आणा!
सायब, या लूप साठी मास्तरला
पिटाळा, नाही तर याला काय धंदा
आहे.
ग्रामसेवकास लेव्ही 'वसुली-
स मदत करू.मास्तर शिक्ष-
णा पेक्षा पोटाचं पाहील बघा.
RAJENDRA
GAIKAWAD.



ताश्कंद
कोणता शान्तीचा चंद्रमा मानूं मी?
गडे, आपण प्रथम
या गुलाबावर बोलूं या!
काश्मीर
राजेंद्र गायकवाड

MANOOS (Fortnightly) : 15 Mar. 1966 : 40 Paise : Regd. No. M H-649






राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग.
**माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१
नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **श्री. ग. माजगावक**